वर्णमुद्रा

# वर्णमुद्रा

इ–जर्नल
(मुद्रितप्रत, केवळ
खासगी वितरणासाठी)

अंक अठरावा / जुलै–ऑगस्ट २०२४

किंमत : १५०/– देणगीमूल्य (मुद्रितप्रतीसाठी)



# अनुक्रमणिका


। मुखपृष्ठ ।
मिलिंद कडणे
। सुरुवातीचे काही शब्द ।
मनोज सुरेंद्र पाठक
। कविता ।
राहुल पुंगलिया, नंदिनी देशमुख
। स्मरणसूक्त ।
दोन दफनविधी : सआदत हसन मंटो, अनुवाद : वर्णमुद्रा
। चित्रे/रेखाचित्रे/छायाचित्रे ।
मिलिंद कडणे
। कथा/एकांकिका ।
फाल्को पेरेग्रायनस : आदुबाळ
एकेक पान गळावया : डॉ. समीर नारायण मोने
। सहोदरांचा शोध ।
क्लरिस लिस्पेक्टर : महेश्वर लव्हेकर
। लेख/ललित लेख/टिपण/मुलाखत ।
तत्त्वभान दर्शन : लेखांक ३ – सुरेंद्र दरेकर
No Man's Land च्या दिशेने : तत्त्वभान : राहुल राजश्री पोपट
'अधिसत्ता'च्या निमित्ताने : चं. प्र. देशपांडे
'नदीष्ट' विषयी : नंदिनी देशमुख
चित्रपटांतील स्त्री प्रतिनिधित्व, मानधन आणि प्रेक्षकपसंतीचे मानसशास्त्र : अद्वैता देशमुख
। गंभीर किंवा गमतीदार ।
राहुल पुंगलिया यांच्या फेसबुक पोस्टचे टिपण



। संपादन साहाय्य ।
नंदिनी देशमुख, शरद बिन्नोर, अभिषेक वाघमारे
। निर्मिती साहाय्य ।
उमा नाबर, महेश गवाणकर, भाग्यश्री बनहट्टी

# सुरुवातीचे काही शब्द

राहुल पुंगलिया चांगल्या अर्थाने बेसुमार कविता लिहितो.

लिहिलेल्या बहुतेक कविता आधी अवलोकनार्थ, अभिप्रायार्थ वगैरे माझ्याकडे येतातच. मी म्हणतो– ही कविता ह्या अंकात टाकू, ती पुढच्या अंकात.

अशा आजवर बहुतेक कविता टाकून झाल्या आहेत.

राहुल म्हणतो–

हरकत नाही. लोक कशाकशाचं सदर लेखन करतातच, आपण कवितेचं करू.

**मनोज सुरेंद्र पाठक**












## राहुल पुंगलिया



### १

पाठीवर अंगावर चोळतो साबण
आपण आपुलकीने
ती पाठ पुढे कदाचित कालांतराने
कापली जाईल स्कालपेलने
नष्ट करतील कुशल बोटे जन्माचे जिव्हाळे.

फुटपाथवर झोपलेल्याची पाठ,
उन्हात तापलेली आणि
मातीवर वाकलेली पाठ,
जाताजाता बघितल्यावर
माझ्याच आहेत असे वाटते.
तरी घेतो मी उबदार पाणी
माझ्या एकट्याच्याच पाठीवर.

पानं नाचतायत अपार
वेड लागून वाऱ्यावर.
या पानांना सुख मिळतंय कशानं
वेड लावणाऱ्या वाऱ्यानं ?
का पावसानं ?
का डोळ्यांदेखत त्यांच्या,
झिजत चाललोय आम्ही सावकाश, यानं ?

निष्ठुर दिवस उगवतो
आणि भानाचं भांडं
तपशिलांनी भरलं जातं
ओले वाळलेले टॉवेल,
टेबलावरची धूळ,
बिलं भरतो आम्ही
आणि गाणी ऐकतो.

हे जगणं जणू,
रक्त पितंय आमचं
मनाच्या तळाशी
टेकवून स्ट्रॉ.

रात्र सरली तरी
आपण उरलो,
ममत्वानं आंघोळ करून
लिहीत बसलो.
हे उपकारच झालेत आपल्यावर
असं म्हणायचं.

थांबत नाहीत आवाज
बाहेरून आणि मनातले
अन् छापील शब्दांचे तर येतही नाहीत.
आवाज न करूनही
आम्ही बोलत राहतो अविरत
लिहून अन् मनातल्या मनात.
हे आडवाटांचं अर्वाच्य बोलणं
थांबायचं नाही मरेस्तवर.

आठवणींचा गढूळ डोह
का ढवळतोय आम्ही वरचेवर ?
तरंगतात ना, मग निष्ठा जुन्या पृष्ठभागावर
अन् आत गेलो जर खोलवर
तर दिसतो प्रतारणांचा गुंता
केलेल्या स्वतःशी आणि इतरांशी

हलतायत वाऱ्यावर पानं, फांद्या आणि झाडं
वाया चाललंय सगळं
पाऊसही पडतोय.
ढग सरकताहेत पूर्वोत्तर.
खिडकीशी खिळून राहिलीय नजर.
सजग बसावं जसं मांजर
सलग तासनतास एका भिंतीवर.

## २

एका कानातून आत
ते
दुसऱ्या कानातून बाहेर
असा रेल्वेचा दीर्घ प्रवास होता.
जाग आली तेव्हा सात वाजले होते
चौकोनी खिडकीच्या पोलादी दृष्टीतून
दिसले की,
बाहेर पाऊस पडतोय
शेत, शेतातले नांगराचे फाळ,
बांधावरचे झाड आणि दूरवरचे घर
दुःखी माणसांनी दुःख व्यक्त करावं
तसे भिजत होते.

दरवेळी पाऊस असेल असं नाही
कधी ऊन असेल,
कधी धुके असेल.
पण ही शेतं, हे बांध आणि घरं
अन् एक विहीर
निमूटपणे सोसताना दिसतील
जे काही होईल तेंव्हा त्यांना ते.

अंधारात क्षितिजावर
चंद्र उगवला होता नुकता
तिथे तो तसाच उगवला असेल
पुढील वेळी.
अन् जिथे एक हरीण
चरत होतं शेतात
तसंच चरेल पुन्हा.

उन्हं उन्हात असतील
आणि पाऊस पावसात भिजेल
रात्र रात्रीमध्ये गुरफटून
डोकं खुपसून कुशीत
झोपलेली असेल.
दिवस सुस्त बसून
डोंगरांना टेकून
डोळे उघडून बघत राहील
समोरून रेल्वे जाताना.

दूरची गावं नेहमी दूर राहतील
आणि जवळच्या स्टेशनला
वडापावचे उपाशी वास येतील

रात्र दोन दिवसांच्या मिठीत,
आळीपाळीने,
एका दिवसाच्या खांद्यावर डोकं ठेवून हसेल
दुसऱ्या दिवसाच्या खांद्यावर डोकं ठेवून रडेल.

वाटेवरचे गाव, घरांच्या खिडक्या डिट्टो
रस्ते डिट्टो.
दोन घरांमधून जाणारे रस्ते
तसेच जातील वर्षांनुवर्षे.

परत परत ट्रेनमधून येताना
खिडकीच्या पोलादी नजरेतून
हे असे दिसेल.

आमचे शहर
अळ्या ज्यात वळवळत आहेत
त्या ब्रेडच्या लोफसारखे
उताणे पडलेले असेल,
जेव्हा रेल्वे स्टेशनला येईल तेव्हा.

मग आम्ही उतरू
आणि आमच्या पिशव्या
जड हातांनी घेऊन
बाहेर पडू.
वाहन शोधू
जे
या प्रचंड शहरातल्या
लहानशा घरी नेऊन सोडेल.

बंद घरेही
तशीच्या तशी असतील
चेहऱ्यावरची एक रेष हलली नसेल.
कुंड्यांमधली झाडं
मधल्या काळात
श्वास उच्छ्वास सोडत
वाढत गेली असतील.
यांच्या फांद्यांमध्ये मनं
पक्षी होऊन बसून राहतील

आमची घरं
ही होती तशी, जागच्या जागी
परत मिळाली
हेच फलित होतं
या लांबच्या प्रवासाचे.

प्रत्येक गाव अटळ नियतीसारखं
सोसत राहतं
पाऊस, उन्हाचे चटके
आणि उत्तर दुपारीचं
आल्हाददायक नवीन वारं

मनांसारखी दुकानं ओळीने
रस्त्यावरती उघडतात
थोड्या पैशांच्या मोबदल्यात
आतल्या वस्तूंचा
विनिमय करायला तयार असतात
किंचित सहानुभूतीच्या बदल्यात
जसे कळावेत अनुभव
अपरिचितांचे तशी


ही गावं अशीच राहतील इथे
त्यांच्या आकाशांमधून
कितीतरी चंद्र, सूर्य
रोज पश्चिमेकडे प्रवास करतील.

## नंदिनी देशमुख



### १

माझ्याआत एक कासव
शर्यतीत भाग घ्यायला
अजिबात तयार नसलेलं
कोणी कितीही खडे मारले, ढोसलं
तरी न हलता
अंग कवचाखाली दडवून
निवांत.... दगडागत स्थिर
डोळ्यांवर कातडं ओढून
जिवंत नसल्यासारखं वर्षानुवर्षे
निपचित पडून
मधूनच हळूच एक पाय
लांबवून अंदाज घेत
पुन्हा निश्चल शरीर
तिथेच तसंच चिकटून राहिलेलं ...



### २
### भयंकराच्या खुणा

भेदरून, गच्च धरून ठेवलेले हात
पुढे जाताना सुटले -- सोडावेच लागले...
आता आधारासाठी आजूबाजूला
शोधूनदेखील सापडत नाही काही --
समोर भयानक घसरण...
बघूनच कापरे भरतेय !
काहीजण चालताना दिसतायत ...थरथरत
एकमेकांच्या मनगटांना घट्ट पकडून
त्या भीतिदायक निसरड्यावरून ...
बरेचजण कितीतरी दूर पोचलेयत
धडपडत, घसरून पडलेले पुन्हा उठत ...
कुणी तर जणू घसरगुंडीवरून गेल्यासारखे
मजेत, आरामात, उभे राहण्याचा
प्रयत्नही न करता...निर्भयपण दाखवतायत !!
सर्वत्र भयप्रद खुणा...घसरून खोल खाली पडल्याच्या
कसं जाणार आता पुढं ...
घबराट मनात दबा धरून
आपलाही पाय घसरला तर --?
नजर पोचतेय जिथपर्यंत...
शेवाळच शेवाळ माजलंय !!!



# दोन दफनविधी

## सआदत हसन मंटो, अनुवाद : वर्णमुद्रा

बासितची अजिबात इच्छा नव्हती, परंतु आईसमोर त्याचं काहीच चाललं नाही.

अलीकडे अलीकडे तर एवढ्या लवकर लग्न करण्याचीसुद्धा त्याची इच्छा नव्हती, शिवाय ती मुलगीसुद्धा त्याला अजिबात आवडली नव्हती; जिच्याशी लग्न करण्याचा आई हट्ट धरून होती.

तो खूप दिवस टालमटोल करत राहिला, वेगवेगळे बहाणे बनवत राह्यला. पण एक दिवस त्याची आई अडूनच बसली आणि त्याला तिच्यासमोर मान झुकवणे भाग पडले.

खरं म्हणजे 'नाही, नाही' म्हणता म्हणता तो चिरडीला आला होता. त्याने विचार केला की एकदाची आईची ही किटकिट संपली तर बरं होईल. लग्नच तर होत आहे ना फार तर, काही पहाड नाही कोसळत, नेऊ कसंबसं निभावून.

त्याची आई प्रचंड खूश झाली. मुलीवाले तिच्या जवळचे होते आणि जमाना होऊन गेला होता, तिने कधीचे त्यांना ते वचन दिलेलं होतं.

बासितचा होकार आल्या आल्या लग्नाची तारीख पक्की करण्यासाठी ती मुलीवाल्यांकडे गेली, परंतु मुलीवाल्यांकडून अनपेक्षितपणे तिला एकूणच निरुत्साही प्रतिसाद मिळाला. ते बघून तिला फार राग आला. ''सईदाच्या आई, मी एवढ्या मुश्किलीने बासितला कसंबसं राजी केलंय आणि आता तारीख ठरविण्याची वेळ आली आहे तर तुम्ही चालढकल करत आहात. हे बघा लग्न व्हायचं असलं तर ते या महिन्याच्या वीस तारखेलाच होईल, नाही तर होणार नाही. आणि ही पक्की खूणगाठ समजा. कळलं?'' ती म्हणाली.

ही धमकी कामाला आली. मुलीची आई कशीबशी तयार झाली. सर्व तयारी लगबगीने केली गेली. वीस तारखेला वधू आपल्या घरात होती.

बासितला मुलगी आवडलेली तर नव्हतीच, परंतु आता तिच्यासोबत निभावून नेण्याचा निर्णय तो करून चुकला होता. तो तिच्याशी अतिशय प्रेमाने वागला. त्याने अजिबातही असं कुठे जाणवू दिलं नाही की तो ह्या लग्नासाठी तयार नव्हता म्हणून आणि जणू काही हे लोढणे त्याच्या गळ्यात अडकवल्या गेले आहे म्हणून.

'नववधू बहुधा लाजतच असतात.' त्याने विचार केला; पण मग त्याच्या असे लक्षात आले की, सईदा काहीशी जास्त लाजाळू आहे आणि त्या लाजण्यामध्ये काहीसं भीतीचं मिश्रणसुद्धा आहे. जणू काही ती त्याला घाबरते आहे.

सुरुवातीला त्याला असं वाटलं की, हळूहळू ही भीती तिच्या मनातून निघून जाईल. पण उलट झालं, दिवसेंदिवस ती वाढतच गेली.

त्याने काही दिवसांसाठी सईदाला तिच्या माहेरी पाठवून दिलं. ती परत आली, तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, तिची भीती आणि लाजाळूपणा बऱ्यापैकी कमी झालेला आहे. बासितने विचार केला की, अशीच आणखी एक दोनदा माहेरी गेली की सगळं काही ठीक होऊन जाईल. पण त्याचा अंदाज चुकीचा निघाला, ती पुन्हा भीतिग्रस्त राहू लागली. एक दिवस त्याने तिला विचारलं, ''सईदा, तू अशी सतत घाबरलेली का असतेस''? सईदा चमकली आणि ''नाहीतर, तसं काही नाही.'' म्हणाली. त्याने पुन्हा प्रेमळ स्वरात विचारले, ''काय गोष्ट आहे? खुदाची कसम, मला खरं खरं सांग, कशाची भीती मनात दडली आहे तुझ्या? माझी आई एवढी चांगली आहे, ती तुझ्याशी सासूसारखे अजिबात वागत नाही. मी तुझ्यावर एवढं प्रेम करतो, तरी तू सतत अशी दुर्मुखलेली का राहतेस? असं वाटतं, की जणू काही ही भीती तुला मारून टाकेल एक दिवस, अशी भीती आता मलाच वाटते बघ.'' असं म्हणत त्याने तिचं एक चुंबन घेतलं. सईदा गुपचूप राहिली. तिच्या डोळ्यांमध्ये आणखी भीती दाटून आली. त्याने सईदाला आणखी जवळ घेतलं. ''खरं म्हणजे तुला तर सतत सुहास्यवदनाने राहायला पाहिजे. हे बघ इकडे, हं हस हस, जरा हस माझी राणी!'' सईदाने कसाबसा हसण्याचा प्रयत्न केला. त्याने हलकेच तिची पाठ थोपटली. ''शाब्बास! बस अशीच हसती खेळती राहा. चेहरा प्रफुल्लित असू दे.'' तो म्हणाला.

साहजिकच त्याचं हे प्रेम एक प्रकारचं नाटक होतं. सईदासाठी त्याच्या मनात फार आतून असं काही प्रेम नव्हतंच. शेवटी ती एक तडजोड होती. आईसाठी केलेली. त्यामुळे तो विचार करत होता की, सईदासोबतचं त्याचं नातं हे टिकावं; कारण त्याला माहिती होतं की, जर का यामध्ये काही विक्षेप आला तर त्याची आई ते सहन करू शकणार नाही. त्याच्या आईने खरं तर आयुष्यात असा कोणता घाव सहनच केलेला नव्हता; त्यामुळे हरेक प्रकारे तो प्रयत्न करत होता की, कसंबसं सोबत आयुष्य ढकलायचं, त्यामुळे वरवर का होईना, त्याने फार प्रयत्नपूर्वक सईदाविषयी आपल्या मनात प्रेमभाव जागवला होता. तो सईदाच्या छोट्या-मोठ्या गोष्टींकडे फार जाणीवपूर्वक लक्ष द्यायचा. आईजवळ सईदाच्या एवढ्यातेवढ्या गोष्टींचीही तारीफ करायचा आणि ज्यावेळी त्याच्या लक्षात यायचं की, त्याची आई हे सगळं ऐकून आनंदित होते आहे की, 'आपण आपल्या मुलाला निवडून दिलेली मुलगी ही अत्यंत योग्य आहे.', तर त्याला फार आनंद व्हायचा.

लग्नाला हळूहळू एक महिना होऊन गेला. सईदा या दरम्यान अनेकदा माहेरी जाऊन आली.

त्यालाही सईदाच्या माहेरी जाण्यावर कधी काही आक्षेप नव्हताच. तो विचार करायचा की, जेवढा जास्त वेळ ती बाहेरच्या जगाच्या संपर्कात राहील, तितकी तिची भीती आणि लाजाळूपणा दूरच होत जाईल, पण पालथ्या घड्यावर पाणी! सईदा जसजशी माहेराहून परत यायची, तसतशी तिची भीती अधिकाधिक वाढतच जायची. एक प्रकारे कसलं तरी दडपणच ती तिकडून घेऊन आली आहे, असंच वाटायचं. बासित हैराण झाला, 'असं काय आहे हे?' परंतु त्याने आईला हे सांगितलं नाही. त्याला माहीत होतं की आईच त्याच्यावर भनकेल आणि म्हणेल की, 'मला माहीत होतं की एक ना एक दिवस तू सईदामध्ये काही ना काही कमतरता काढशीलच म्हणून.'

एक दिवस सईदाला तो एकाएकी म्हणाला, ''माझे राणी, तू मला खरं सांगत का नाहीस?'' सईदा एकाएकी चमकली. सईदाचं ते चमकून उठणं पाहून त्याच्या लक्षात आलं की, त्याने सईदाच्या कोणत्यातरी दुखऱ्या नसेवर बोट ठेवलंय. आपल्या आवाजामध्ये अधिक प्रेमळपणा भरत तो म्हणाला, ''मी विचारतो आहे की तू जसजशी माहेराहून परत येतेस, तसतशी अधिकाधिक भीतिग्रस्त झालेली वाटतेस. अखेर गोष्ट काय आहे ते तर सांग.'' थोडा वेळ शांत राहून मग सईदा म्हणाली, ''खरं म्हणजे असं तर काही नाही. मी जरा आजारी आहे!''

''मग तू मला हे कधी कळवलं नाहीस? कशाचा आजार आहे तुला?''

सईदाने दुपट्टा आपल्या बोटाभोवती गुंडाळत उत्तर दिलं, ''अम्मीजान इलाज करते आहे. लवकरच सगळं काही ठीक होईल.''

बासितने या दिवसापासून सईदाकडे अधिकाधिक लक्ष देणं सुरू केलं. तर त्याच्या लक्षात आलं की, सईदा लपून-छपून कोणतंतरी औषध घेत असते. एक दिवस ती कुलूप लावलेल्या आपल्या ट्रंकेतून औषध काढून खाणारच होती की, तेवढ्यात बासित सईदाच्या जवळ पोहोचला व सईदा जबरदस्त चमकली आणि कसल्यातरी चूर्णाच्या पुड्या तिच्या हातून खाली पडल्या.

बासित म्हणाला, ''हे औषध घेतेस का?''

आवंढा गिळून सईदा म्हणाली, ''जी हां! अम्मीजाननी हकीम साहेबांकडून हे मागवलं आहे.''

''काही फायदा आहे का याचा पण?''

''हो.''

''ठीक आहे घेत जा मग, पण आराम आला नाही तर मला सांग, मी तुला चांगल्या डॉक्टरांकडे घेऊन जाईन.''

सईदाने फरशीवर विखुरलेल्या पुड्या उचलल्या आणि मान हलवत म्हणाली, ''जी हां!''

बासितने विचार केला, ठीक आहे, काही इलाज तर होतो आहे. देव करो आणि लवकरात लवकर बिचारी बरी होवो. भीती भीती काही नाही, बस आजारपण आहे एकप्रकारे. इन्शाल्ला लवकरच दूर होऊन जाईल. सईदाच्या ह्या आजारपणाबद्दल त्याने पहिल्यांदाच आपल्या आईला सांगितलं. तर ती म्हणाली, ''काय म्हणतोस? देवाच्या कृपेने एवढी चांगली धट्टीकट्टी आहे. कशाची बिमारी आली तिला?''

तो म्हणाला, ''मला काय माहीत? सईदालाच विचार. तीच सांगू शकेल.'' बेपर्वाईने त्याची आई म्हणाली, ''हां हां, विचारेल तिलाच.'' जेव्हा बासितच्या आईने सईदाला विचारलं तर, सईदा म्हणाली की, ''काही नाही, थोडं डोक्यामध्ये दुखणं असतं माझ्या. अम्मीजाननी हकीम साहेबांकडून ही दवा

मागवून दिली आहे. खरं म्हणजे बासित साहब वहमी आहेत, सतत मला म्हणत राहतात की, मी भ्यायलेली वाटते. मला कशाची भीती असेल सांगा बरं?''

बासितची आई म्हणाली, ''हो ना, विनाकारण बकबक करत राहतो. त्याच्या फिजूल गोष्टींकडे तू लक्ष नको देत जाऊ.''

काही दिवसांनी बासितच्या लक्षात आलं की, सईदा आता जरा जास्तच घाबरलेली आहे. सईदाची भीती तिच्या रोमारोमांतून बाहेर पडत होती जणू.

एक दिवस दुपारनंतर सईदा म्हणाली, ''आईला भेटावं असं वाटतेय, मला माहेरी सोडून देता का?''

बासित म्हणाला, ''नाही. आज तुझी तब्येत काही फार चांगली दिसत नाही.''

सईदाने पटवण्याची कोशिश केली, ''तुम्ही मला तिथे सोडा तर खरं. मी बरी होऊन जाईन तिथे.''

बासित म्हणाला, ''जर तिथे बरी होऊ शकत असशील तर मग इथे काय आहे? इथे पण बरी होऊ शकशील. जा आत आराम कर.''

एवढ्यात बासितची आई आली. बासित आईला म्हणाला, ''अम्मीजान देखो, सईदा जिद कर रही हैं. कहती हैं, तबियत ठीक नहीं. अम्मीजान के पास ले चलो.''

बासितची आई लापरवाहीने म्हणाली, ''उद्या जा गं पोरी माहेरी.''

सईदा काही न बोलता बाहेर अंगणात निघून गेली. थोड्यावेळाने बासित खोलीतून बाहेर आला तर त्याच्या लक्षात आलं की, सईदा अंगणात नाहीये. त्याने इकडे तिकडे शोधलं पण ती कुठेच नव्हती. त्याने विचार केला की, वरच्या खोलीत गेली असेल. तो वर गेला तर त्याच्या लक्षात आलं की, न्हाणीघराचा दरवाजा बंद आहे. त्याने जोरजोरात दरवाजा वाजवला. आवाज दिले. ''सईदा! सईदा!!'' परंतु आतून काहीच आवाज आला नाही, मग तो पुन्हा जोरात म्हणाला ''सईदा!''

आणि आतून एक विचित्र असा दुखरा, कण्हणारा आवाज आला,

''जी!''

त्याने विचारलं, ''काय करते आहेस?'' पुन्हा विचित्र अशा दुखऱ्या आवाजात सईदा आतून म्हणाली, ''जी नहा रही हूं.''

मग तो खाली उतरून आला. सईदाच्याच विचाराविचारात तो मागील गल्लीमध्ये फिरायला गेला.एकाएकी त्याचं लक्ष नालीकडे गेलं, त्यातून रक्तासारखं काही वाहत होतं. ती नाली त्यांच्या घरामागचीच होती, आणि वरच्या नहाणीमध्ये जिथे सईदा आंघोळ करत होती, तिथलाच पाईप त्या नालीत सोडलेला होता.

त्याच्या डोक्यात आता घण घण शब्द वाजू लागले –

'औषधरक्त. रक्त. औषध'

हळूहळू त्याला आठवत गेलं, सईदाची अम्मी लग्नाची तारीख पक्की करण्यासाठी कां कू करत होती. ती जरा दोनेक महिने थांबा म्हणत होती. नंतर सईदाचं ते वारंवार माहेरी जाणं, सईदावरचं ते भीतीचं सावट, आजची तिची जरा जास्तच वाढलेली भीती.

त्याचा लक्षात आलं की, लग्नानंतर पहिल्यांदाच दिसलेलं सईदाचं पोट काहीसं गरगरीत होतं.

'तेव्हा अजिबातच हे लक्षात कसं आलं नाही?' त्याने विचार केला.

तो मनाशी वेडसर हसला, 'अच्छा तर मायलेकींना एक गर्भपात करून घ्यायला दोन महिने हवे होते तर. आणि आज त्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.'

त्याला वाटलं, वर जाऊन सईदाला पाहावं, आईला दाखवावं.

आईचा विचार मनात येताच तो हादरला, 'नको, ती हा धक्का पचवू शकणार नाही. माझ्या नजरेत पडणंसुद्धा तिला पेलवणार नाही. ती काही खाऊन मरूनच जाईल कदाचित.'

तो दुविधेत चालत राहिला.

तसाच घरी परतला.

आई घरात नसल्याचं त्याच्या लक्षात आलं, आतल्या खोलीत जाऊन तो दोन्ही हातांनी डोकं गच्च धरून बसला.

तो विचार करत राहिला, 'देव जाणे वर ती कशा स्थितीत असेल, तिच्या देहावर, मनात काय घडत असेल. कसं लपवू शकेल बिचारी हे सगळं.' जसजसा तो जास्त विचार करू लागला, तसतशी सईदाप्रती त्याच्या मनात अनुकंपा वाढत गेली.

त्याला आता तिची दया येऊ लागली, 'बिचारी बेशुद्ध तर पडली नसेल? कशी अवस्था असेल तिची? खाली आपली आपण येऊ तरी शकेल का ती?'

बराच वेळ तो विचारात बुडालेला होता. किंचितसं कण्हणं ऐकून तो भानावर आला. सईदा खाटेवर बसून आढ्याकडे पाहत होती. ती अगदी फिकुटलेली दिसत होती, इतके पांढरीफटक की, जणू काही ती जिवंतच नाही. कशीबशी खाटेवर बसलेली आणि पाय थरथर कापत आहेत अशा अवस्थेत. बासितने थोडा विचार केला आणि तिचा बुरखा वर उचलत तो म्हणाला, ''सईदा, हिमतीने काम घे. चल मी तुला सोडून येतो.'' सईदाने कसंबसं बळ एकवटलं आणि हळूहळू चालत त्याच्यासोबत बाहेर गेली. थोडं पुढे सडकेवर जाऊन टांग्यामध्ये बसली. तो तिला तिच्या आईकडे सोडून आला.

घरी परतल्यावर त्याच्या आईने त्याला विचारलं, ''सईदा कुठे आहे?''

''आई, ती फारच अडून बसली होती म्हणून तिला माहेरी सोडून आलो.'' तो म्हणाला. त्याची आई फणकारली, ''अशाने तू तिच्या सवयी बिघडवून टाक आणि मग मला म्हण की, मी चुकीची मुलगी तुझ्या गळ्यात बांधली म्हणून. हट्ट करत होती तर करू द्यायचा असता थोडा वेळ.'' तो म्हणाला, ''नाही नाही, तसं नाही, आई ती खरोखर एक खूप चांगली मुलगी आहे.'' त्याची आई हसली, ''मी तुला आधीच म्हणाले होते ना, की ती एक खूप नेक मुलगी आहे. मला विश्वास होता की, तुला आज ना उद्या ती पसंत पडेलच.''

मग थोडावेळ ती पुढ्यातल्या भाज्या निवडत बसली आणि मग एकदम म्हणाली, ''बासित, वर त्या बाथरूममध्ये ते रक्ताळलेलं असं काय होतं?''

तो एकदम सकपकला, ''अं, माझा घोळाना फुटला होता आई.'' त्यावर तडक रागावून ती म्हणाली ''अरे, तू हे मसालेदार अन्न सोडून दे, सदोदित दोन्ही खिसे मुंगफलीने भरलेले असतात तुझे.''

तो वर गेला. न्हाणीघर नीट स्वच्छ केलं. त्याला दिलासा होता की, आईसोबत तो सईदाच्या बाबतीत काही उलट सरळ बोलला नाही ते, आणि नाही त्याने याची चाहूल लागू दिली की, 'त्याला काही आतील गोष्टसुद्धा माहीत आहे म्हणून.'

तो मनात निर्णय करून चुकला होता की, सईदाचं हे जे काही गुपित आहे ते कायमचं तो त्याच्या मनामध्ये गाडूनच ठेवेल. खूप त्रास सहन केलाय बिचारीने आणि तिच्या कर्माची सजा तिला मिळून

चुकली आहे. ह्यापेक्षा जास्त सजा नकोही आहे, देव करो ती लवकरात लवकर बरी होवो आणि तिच्या मनातली ती भीती निघून जावो. तो विचारच करत होता की, खालून एक जोरदार किंकाळी त्याला ऐकू आली, जी त्याच्या आईची होती. तो दडदडत खाली उतरला आणि खालच्या खोलीत पोहोचला. समोर ओसरीत त्याची आई फरशीवर पालथी पडलेली होती. जवळपास बेशुद्धशी. आणि समोरच्या कचऱ्याच्या डब्यामध्ये कापडात गुंडाळलेलं एक अर्भक मृत पडलेलं होतं.

भयानक हादरा बसूनही त्याने कसंबसं स्वतःला सांभाळलं. घरातून जुनी फाटकी कापडं आणून बाळाचं ते मुटकुळं त्याने त्यात गुंडाळलं आणि आत जाऊन एका खोक्यामध्ये ठेवून दिलं. मग मेलेल्या आपल्या आईला दोन्ही हातांवर अलगद उचलून आतल्या खोलीत आणून त्याने खाटल्यावर झोपवलं. बराच वेळ तो तिच्या उशाशी बसून राहिला.


सईदाला निरोप गेल्यावर तिच्या आईसोबत ती परत आली, पण यावेळी ती अधिकच फिकी पडलेली आणि गलितगात्र झालेली होती. त्याला पुन्हा दया आली, तो म्हणाला, ''सईदा, जे अल्लाहला मंजूर होतं ते झालं. तुझी प्रकृती ठीक नाहीये. हे रडणं पडणं बंद कर आणि आत जा आणि आपल्या खोलीमध्ये जाऊन आराम कर.''

सईदा खोलीत जाण्याऐवजी ओसरीत आली आणि परत आली तर तिचा चेहरा अधिकच पिवळसर पडला होता. तो गप्प झाला. सईदाकडे त्याने पाहिले, तेव्हा तिच्या डोळ्यात अश्रू जमा झाले होते. बासित प्रेमळपणे म्हणाला, ''फार रडणंसुद्धा प्रकृतीसाठी चांगलं नसतं. सईदा, जे खुदाला मंजूर होतं ते झालं.''

दुसरे दिवशी बासितने दोन दफनविधी उरकले– एक आईचा आणि त्याआधी पहाटेच्या अंधारात ओढ्याच्या काठावर एका नवजात अर्भकाचा.

❑

(दस्तावेज मंटो भाग (१) मध्ये समाविष्ट मंटोच्या मूळ 'बासित' ह्या कथेचे रूपांतर.)





# फाल्को पेरेग्रायनस

आदुबाळ

## एक

त्या लांबरुंद डाकबंगल्याला लांबरुंद व्हरांडा होता. त्याच्यापुढे एक चौकोनी जमिनीचा तुकडा होता. त्यात तंबू टाकून शोल्टो बसायचा. दिवसभर त्याच्या तंबूसमोर कमरेला फडकं लावलेल्या लोकांची रांग लागायची. त्या लोकांचा एखादा सरदार असायचा. आमच्या हायलँड्समध्ये क्लॅन चीफ असतात ना, तसा त्या मळक्या लोकांचा प्रमुख. कनाती लावलेल्या तंबूत शोल्टोसमोर एकेक जण जायचा. हे लोक सही वगैरे करू शकतील असं वाटत नाही. पण काहीतरी कागदावर करून द्यायचे. शोल्टो करून घ्यायचा. दिवसभर हेच चालायचं.

शोल्टो माझा आत्येभाऊ. माझ्यापेक्षा चांगला पंधराएक वर्षं मोठा असेल. आत्याच्या नवऱ्याने त्याला पब्लिक स्कूलमध्ये घातलं. पण युनिव्हर्सिटीपर्यंत काही तो पोचू शकला नाही. त्याच्याबद्दल इकडे काही बरं ऐकू यायचं नाही. आत्याचा नवराही कोणी मोठा जमीनदार वगैरे नव्हता – तो सिंगापूरला पोस्ट खात्यात होता. एकुलत्या एक पोराला इंग्लंडला पाठवून शिक्षण देण्याइतपत जमलं. पैसे आणि प्रेम संपलं, तेव्हा बॉम्बेच्या एका फर्ममध्ये त्याला नोकरी मिळवून दिली.

सोळाव्या वर्षी माझी प्रेप स्कूल संपली. आई म्हणाली, ''आता तुझ्या लग्नाची खटपट करायला हवी.'' बाबांनी टेकू दिला. त्यांना धडपडे कर्तबगार लोक आवडतात – ''आणि कर्तबगार लोक कॉलनीत जातात, आणि नशीब काढतात'', असं ते कायम म्हणत असत. ''नाहीतर एवढ्या मोठ्या

'ब्रिटिश राज'चा आपल्याला उपयोग काय?'' असा प्रश्न ते विचारत.

शोल्टोचं आणि त्यांचं कधी फारसं जमलं नाही, पण तो हिंदुस्थानात नोकरीला गेल्यावर एकदम लाडका झाला. त्यांच्या डोळ्यांसमोर हिंदुस्थानात, किंवा सिंगापूरमध्ये सरकारी नोकरीत असलेला कोणी होता. नाहीतर लेव्हांटमधला कोणी, अगदीच काही नाही तर बर्मा. नोकरी शक्यतो सरकारी हवी, पण तीही अपेक्षा सोडायला ते तयार होते. गेल्या युद्धाने त्यांचं मत बदललं असावं.

त्यांनी लगोलग शोल्टोला पत्र लिहिलं. शोल्टोचा तसा जम बसला होता – म्हणजे तेव्हा तसा समज होता. त्याच्या हिंदुस्थानात ओळखीही होत्या – परत : असं तोच स्वत: म्हणत असे. बाबांनी त्याला गळ घातली, ''बाबा रे, तुझ्या 'डियरेस्ट कझिन आयोना'चं लग्न जुळवायला मदत कर.'' चारपाच महिन्यांनी हिंदुस्थानातून त्याचं उत्तर आलं : '' 'वी आयोना' एवढी मोठी झाली? वा वा! तिला इकडे पाठवून द्या. माझ्याकडे राहील. इथल्या सोसायटीत वावरेल. क्लबांत येईल. ओळखी होतील, आणि अनुरूप कोणी मिळेलच. पाठवून द्या.''

बाबांनी ऐकलं. त्यांना माहीत नव्हतं.

## दोन

'शॅपरोन'ची मुलाखत बाबांनी स्वत: घेतली. आईने नेहमीप्रमाणे मान डोलावली. तिला नेहमीप्रमाणे तिचं मत नव्हतं. चांगली पोक्ती-पुरवती मिस हॉकिन्स बाबांना पसंत पडली. तिला मद्रासच्या एका शाळेत गव्हर्नेस म्हणून नोकरी मिळाली होती. त्या शाळेने बोटीचं भाडंही पाठवलं होतं, पण थर्ड क्लास!

''मी तसल्या लोकांबरोबर प्रवास करूच शकत नाही,'' नाक उडवत मिस हॉकिन्स म्हणाली. तिच्या कोटावर एका टोकदार चोचीच्या पक्ष्याच्या आकाराची ब्रूच-पिन होती.

तिसऱ्या आणि दुसऱ्या वर्गाच्या बोटीच्या तिकिटांतला फरक आणि बॉम्बे मद्रास पहिल्या वर्गाचं रेल्वेभाडं यावर मिस हॉकिन्स मला पत्करायला तयार होती. बाबांनी लगोलग मला तिच्या हवाली केलं.

प्रवासात मी मिस हॉकिन्सला त्या ब्रूच-पिनबद्दल विचारलं.

''पेरिग्राईन फाल्कन,'' ती म्हणाली. ''माझ्या एका विद्यार्थिनीने आपल्या मृत्युपत्रात माझ्यासाठी ही पिन लिहून ठेवली होती. इट्स स्ट्रेंज – मी त्या पोरीला फारशी ओळखतही नव्हते. एक दिवस लंडनमधल्या एका सॉलिसिटर फर्मने बोलावलं आणि ही पिन माझ्या हवाली केली.''

''महागाची असेल ना!'' मी म्हणाले.

''मला नाही वाटत. पिन मिळाल्या-मिळाल्या मी चौकशी केली – न्यू मार्केटमधल्या ज्यूलरने मला फक्त दहा शिलिंग देऊ केले! व्हाईटचॅपलच्या लॉजमध्ये तासाला तेवढे मिळाले असते,'' ती डोळे मिचकावत म्हणाली. ''म्हणजे, मला जायची हौस असती तर!''

बॉम्बेच्या बंदरावर शोल्टो आम्हाला घ्यायला आला होता. शोल्टोचे काही फोटो घरी होते, त्यापेक्षा तो आता वेगळाच दिसत होता. नाजूक हनुवटी त्याने दाढीत लपवून टाकली होती, आणि त्या दाढीतही पांढरे केस उगवायला लागले होते.

शोल्टो हॉटेलात उतरला होता, कारण त्याची फर्म जरी बॉम्बेची असली तरी म्हणे शोल्टोचं काम

बॉम्बेत नव्हतं. ते कुठेतरी आतल्या भागात होतं. ''मफ़ऽसिल – यू विल लाईक इट,'' शोल्टो वारंवार म्हणत राहिला.

तीन दिवसांत शोल्टोने आम्हाला बॉम्बे दाखवलं. आमच्याबरोबर बॉम्बे दाखवायला एक अँग्लो मुलगी होती. 'रुबी' नावाची. दिसायला गोड होती एकदम. ''त्यांच्यातच असली नावं असतात. ज्युली, रोमा, शीला,'' मिस हॉकिन्स आपलं नाक उडवत म्हणाली. ''तुझ्या भावाला सांभाळ – या चटकचांदण्या चिकटून बसतात.''

पण इथे शोल्टोच लघळपणा करत होता, आणि रुबी त्याला फारसा भाव देत नव्हती. शोल्टो चिडत होता, कावत होता, आणि तिला आणखी चिकटू पाहत होता. लहानशा हालचालींतून, मानेच्या झटक्यांतून ती त्याला त्याची जागा दाखवून देत होती.

आणि ती जागा तरी काय होती? बॉम्बेच्या एका मोठ्या ब्रिटिश फर्ममध्ये शोल्टो डेप्युटी मॅनेजर होता. इथे आल्यापासून, म्हणजे गेली दहाएक वर्षं. रुबीच सांगत होती. त्याच्या हाताखाली काही इंडियन लोक होते; एकही युरोपियन नव्हता. तिकडून आलेली नवी नवी पोरं शोल्टोच्या हुद्द्याला रुजू व्हायची, आणि वर्षा-दोनवर्षांत वर-वर चढून जायची. फर्मची ऑफिसेस सगळ्या एशियात होती. तिकडे बदलून जायची, ब्रँच हेड बनून. शोल्टो आमचा तिथेच आला, तिथेच राहिला. रुबी फर्ममध्ये टायपिस्ट होती. त्या टायपिस्ट पोरींमध्ये जोक होता, की पाचेक वर्षांत शोल्टोला फर्निचरमध्ये जमा करतील.

शोल्टो आम्हाला एस्प्लनेडवर एका रेस्तरांमध्ये जेवायला घेऊन जात असे. तिथे बॉम्बेतले बरेच तरुण युरोपियन लोक यायचे. तरुण मुलं आणि मुलीही. शोल्टो घुम्यासारखा बसून राहायचा कोपऱ्यात. त्याची कोणाशी फारशी ओळख नव्हती. जणू तोही इथे प्रथमच येत होता. त्या मानाने रुबीच जास्त मोकळेपणाने वावरायची, तरुण पोरांबरोबर नाचायची. शोल्टो तिच्याबरोबर नाचायला पाहायचा. ती नकार द्यायची. नाचलीच, तर तिच्या हालचालीत एक लाकडी कठीणपणा जाणवायचा. जणू रुबीभोवती एक तेजाळ लाल माणिकवलय होतं, आणि शोल्टो त्यात शिरायचा केविलवाणा प्रयत्न करत होता. त्याचा वारंवार तेजोभंग होत होता, आणि नेमकं मिस हॉकिन्सने त्या जखमेवर मीठ चोळलं.

''हिच्यासाठी कोणी पाहून ठेवलंयस का, की...'' मिस हॉकिन्स माझ्याकडे बोट दाखवत थोड्या कुजक्या आवाजात शोल्टोला म्हणाली.

आवाजातली खर शोल्टोला झोंबली.

''मी नोकरड्यांकडून हुकूम घेत नाही,'' चमचा टेबलवर फेकत तो मोठ्याने म्हणाला. ''आयोना, तुझ्या नोकराणीला हे कळायला पाहिजे.''

आसपासच्या टेबलांवरचे लोक बघायला लागले. लंडनमध्ये असलं काही झालं असतं तर बाबांनी शोल्टोला उभं आडवं तासलं असतं. चिडचिड करत शोल्टो रेस्तरांमधून चालता झाला.

नशिबाने तीन दिवसांतच मिस हॉकिन्सची मद्रास गाडी होती, त्यामुळे हा विषय फारसा वाढला नाही. मी तिचा निरोप घेतला. नाही म्हटलं तरी चारपाच महिने एकमेकांबरोबर राहून आपुलकी वाटतेच. माझ्या डोळ्यांत पाणी आलं. मिस हॉकिन्सने मला जवळ घेतलं, आणि माझ्या ड्रेसवर आपली फाल्कनची ब्रूच-पिन लावली.

''नाही, नको नाही म्हणायचं!'' तिने दटावलं. ''तुला आवडली होती ना!''

''सगळं होईल ना नीट, मिस हॉकिन्स?'' मी भाबडेपणाने त्यांना विचारलं.

‘‘धिस इज अ बर्ड ऑफ प्रे. शिकारी पक्षी आहे हा,’’ मिस हॉकिन्स म्हणाली. ‘‘कायम लक्षात ठेव, स्वत:ला मदत फक्त आपण स्वत: करू शकतो. मारणारे खूप असतात, स्वत:ला तारणारे आपणच. मे धिस बर्ड टीच यू दॅट.’’

मी डोळे पुसत असताना मिस हॉकिन्स माझ्याकडे एकटक बघत होती. बोलावं की न बोलावं असं द्वंद्व तिच्या मनात चालू असावं. नाही बोलली.

बोलली असती तर काय बोलली असती? पुढे घडणाऱ्या घटना तिच्या अनुभवी दृष्टीला जाणवल्या होत्या का?

## तीन

मफ़ऽसिलला पोचायला तीन दिवस लागले. आधी रेल्वेने, मग पालखीने. उंच डोंगर होते, आपल्या हायलँड्ससारखे. गर्द झाडी. त्याच्या मध्यावर हे मफ़ऽसिलचं गाव. त्या गावाच्या खाली कुठेतरी खाणकाम होणार होतं, आणि तो कोळसा बंदरापर्यंत वाहून न्यायला रेल्वे लागणार. जवळचा रेल्वेमार्ग पन्नास मैल लांब होता. तिथपर्यंत रेल्वेरूळ बांधायचं काम शोल्टो काम करत असलेल्या बॉम्बेच्या फर्मला मिळालं होतं. रेल्वे बांधायला जमीन लागणार होती. त्याचा हिशोब फर्मच्या अधिकार्यांनी केला होता. ती जमीन आता ताब्यात घ्यायची होती. पण त्यावर त्या मफ़ऽसिल भागातले लोक राहात होते, शेती करत होते. त्यांच्याकडून कागदपत्रांवर सही घेतल्याशिवाय फर्मच्या नावावर जमीन होणार नव्हती. हे काम अवघड नव्हतं, पण किचकट होतं. शोल्टोला हे कागदी घोडे नाचवायला फर्मने पाठवलं होतं.

मफ़ऽसिल भागातले बरेच लोक डाकबंगल्यापर्यंत यायचे. काही ठिकाणी शोल्टोला स्वत: जायला लागायचं. त्याला तो ‘राउंड’ म्हणत असे.

शोल्टो मलाही मफ़ऽसिलला घेऊन गेला. खरं तर त्याने ‘एलिजिबल बॅचलर्स’ची रांग लावतो असं बाबांना पत्रात कबूल केलं होतं. हे सगळे लोक शोल्टोला कुठे भेटले काय माहीत : बॉम्बेला तरी तसल्या लोकांशी त्याचा काहीच संबंध नव्हता. आणि इथे मफ़ऽसिलमध्ये तर प्रश्नच नाही.

तसं हे मफ़ऽसिल जगापासून अगदी तुटलेलं नव्हतं. पंधरा मैलावर एक हिल स्टेशन होतं. पन्नास वर्षांपूर्वी, म्हणजे ‘राज’च्या सुरुवातीच्या काळात या हिल स्टेशनवर आपले लोक पालख्या-मेण्यांतून यायचे. एकदा आले की चारचार महिने राहायचे.

‘‘आता तिथे कोणी जात नाही,’’ शोल्टो सांगत होता. ‘‘कारण बॉम्बेपासून जवळ तीनचार हिल स्टेशन्स झाली आहेत. आता त्या ठिकाणी फारसं काही नाही, जुने बंगले आहेत तीनचार. नेटिव्ह्ज तिथे कधीच राहायचे नाहीत, ते त्या डोंगराला काळा डोंगर समजतात. सिली सुपर्स्टिशन्स...’’

मफ़ऽसिलमध्ये आल्यापासून शोल्टो वेगळाच वागायला लागला होता. त्याच्या मनातली कोणतीतरी गाठ उलगडली होती जणू. बॉम्बेमध्ये भिरभिर हिंडणारे त्याचे डोळे इथे स्थिर झाले होते. त्यात काही खोल खोल दिसायला लागलं होतं.

सकाळी आम्ही एकत्र ‘छोटी हाजरी’ घ्यायचो. म्हणजे ब्रेकफास्ट. डाकबंगल्यात खानसामा आणि त्याची बायको राहायचे, तेच आमच्या तैनातीला. मग शोल्टो आपल्या कामाला लागायचा तो

सूर्य बुडेपर्यंत. मी तशीच व्हरांड्यात बसलेली असायचे. समोर दिसायचा, काम करताना, पण इकडे बघायचाही नाही. दुपारी जेवायला कधी यायचा, कधी खानसाम्याकडून जेवण तंबूतच मागवायचा. त्या सरदार लोकांबरोबर जेवायचा, कधी. सूर्य त्या उंच उंच डोंगरांआड बुडाला की यायचा, आपल्या खोलीत जाऊन बसायचा. जेवायची वेळ झाली की मीच बोलवायचे. जेवून आम्ही गप्पा मारत बसायचो.

तो सांगायचा त्या आठवणी. इंग्लंडमधल्या त्याच्या शाळेच्या, मित्रांच्या आठवणी. बेकायदा 'हूच' बोर्डिंग हाऊसमध्ये नेल्याच्या, आणि डीनची तंबाखू चोरून ओढल्याच्या आठवणी. आणि स्वप्नं – आधी युनिव्हर्सिटीची, मग नव्या देशात जायची, फर्ममध्ये वर वर चढत जाऊन नाव–पैसा–सत्ता कमवायची स्वप्नं. त्या स्वप्नांना लागलेली कीड. फर्ममधलं राजकारण. सोबत खानसामा 'छोटा पेग' कायम पुरवत राहायचा.

''प्रत्येकाला एक 'गार्डियन एंजल' असतो बघ, आयोना. आपल्या डोक्यावर कायम छत्री असते त्याची. हाच एंजल आपल्याला आयुष्यात पुढे नेतो, धोक्यांपासून वाचवतो. माझा गार्डियन एंजल माझ्यासारखाच सामान्य असणार. अनरिमार्केबल. म्हणून मी जिथे होतो तिथेच राहिलो.''

''आता या नेटिव्ह लोकांचा गार्डियन एंजल घे. इथे बसून कळत नाही. माझ्याबरोबर राउंडला चल कधीतरी. पिढ्यान्‌पिढ्या, वर्षानुवर्षं, ते जिथे राहिले तिथून आता फर्म त्यांना बाहेर हाकलणार. कारण : इथे सरकारला रेल्वे करायची आहे. फर्म त्यांच्या जमिनींच्या बदल्यात काहीतरी पैसे फेकणार, आणि तेही त्यांना मिळणारच नाहीत बहुतेक. त्यांच्या सरदाराच्या घशात जाणार. काय बोलतोय यावर यांचा गार्डियन एंजल? काहीही नाही, कारण तोही त्यांच्यासारखाच नेटिव्ह असणार.''

''डु यू हेट देम?'' मी विचारलं.

''हेट? नाही नाही!'' शोल्टो हसायला लागला. ''मला साला फरकच पडत नाही. आय ॲम जस्ट अ पेपर पुशर. हुकमाचा ताबेदार. फर्म सांगेल ते करणार. तरच प्रगती होते फर्ममध्ये.''

''रुबी?'' मी अशाच एका संध्याकाळी धीर करून विचारलं.

''ओह! दॅट प्रिटी हार्लट!''

रुबी आणि शोल्टो एकेकाळी फर्ममधलं गाजलेलं प्रेमप्रकरण होतं म्हणे. एका ख्रिसमस पार्टीत ते पहिल्यांदा एकत्र आले. रुबी तेव्हा फर्ममध्ये नवीनच आली होती. जवळजवळ सहा महिने ते एकत्र होते. इतके, की रुबी कित्येकदा शोल्टोच्या बॉम्बेमधल्या फ्लॅटवरच राहायची आणि थेट फर्ममध्ये यायची. हळूहळू तिला लक्षात आलं की शोल्टो ही गाडी फार लांब पल्ल्याची नाही. एके दिवशी तिने गाडी बदलली. शोल्टोच्या मनात कडवटपणा राहिला, आणि रुबीला परत मिळवायची अभिलाषाही गेली नाही. रुबीनंतर कोणी त्याच्या आयुष्यात आली नाही.

रुबीचा विषय बराच लांबला. त्याने अनेक छोट्यामोठ्या गोष्टी सांगितल्या. काही अत्यंत खाजगी. सांगू नयेत अशा. ऐकवल्या नाहीत अशा.

त्या रात्री माझ्या खोलीचा दरवाजा मध्यरात्री खडखडला. प्रथमच. तकलादू होता.

## चार

स्वप्नं पडायला सुरुवात यानंतरच झाली. बहुधा त्या रात्रीपासूनच.

एक दृश्य कायम स्वप्नात दिसे. एक फाल्कन – माझ्या पिनवर होता तसाच – उंचच उंच आकाशातून विहरतो आहे. त्याचे डोळे अर्धवट उघडे, अर्धवट मिटलेले आहेत. खालच्या आकाशातून एक पक्षी एकटाच चालला आहे. फाल्कन सावध होतो. त्याच्या पंखांत ताठरपणा येतो. खालच्या पक्ष्याचा वेग ताडून पाहत तो आपला डावपेच ठरवतो. आपले पंख वाकडे करत फाल्कन वळतो – ठरवलेल्या ठिकाणी येतो, आणि पंख मिटून झेपावतो.

त्या बिचाऱ्या पक्ष्याला तो फाल्कन दिसतो, पण झेप थेट त्याच्या अंगावर घेतलेली नसते, त्यामुळे पक्षी निर्धास्त राहतो. आपला रस्ता थोडासा बदलतो, आणि उडत राहतो. फाल्कन जवळजवळ त्याच्या पातळीवर येतो, आणि निमिषात स्वत:चा मार्ग बदलून, पंख पसरत त्या पक्ष्यावर झडप घालतो.

हे स्वप्न मला इतक्या वेळेला पडलं, त्याची गणतीच नाही. कधी मी शिकार झालेली पक्षी असे, कधी मी दुरून ही घटना बघणारा दुसरा पक्षी असे. पण मी कधीही ही शिकार थांबवू शकले नाही.

इकडे ऋतू बदलत होता. थंडीची चाहूल लागायला लागली. उंच पहाडांच्या मागून धुकं उसळायला लागलं. दिवसभर मफ़ऽसिलच्या खोलगट भागांमध्ये साचून राहायला लागलं.

अशातच एका पहाटे काळपट तपकिरी घोड्यावरून 'ती' आली. शोल्टो आपल्या खोलीत झोपला होता. पहाटेच्या प्रकाशात तिने घातलेला लाल–पिवळ्या उभ्या धांदोट्या शिवून केलेला पायघोळ स्कर्ट ज्वाळेसारखा दिसत होता. तिच्या अंगावर भरडी शाल होती. गळ्यात वेगवेगळे मणी. तिचा चेहरा म्हटलं तर युरोपियन, म्हटलं तर इंडियन ठेवणीचा होता. उन्हाने रापून तिचा रंग तपकिरी झाला होता.

मी मंत्रमुग्ध होऊन डाकबंगल्याच्या कुंपणापर्यंत आले. तिने वाकून तिचा हात माझ्या हातात दिला. तिच्या हातातल्या जाड्या अंगठ्या मला टोचल्या.

''ससिमा,'' तिच्या गळ्यातून खरखरीत आवाज आला. मी बघत राहिले. तिला इंग्लिश येत होतं, पण भाषेला वेगळाच लहेजा होता. यापूर्वी मी कधीही न ऐकलेला.

आठवड्यातून एकदोनदा, त्याच पहाटेच्या वेळी, ती यायला लागली. नेहमी स्वत:बद्दल सांगायची. ससिमा त्या ओसाड हिल स्टेशनमध्ये राहायची. शेवटच्या काही अँग्लो लोकांपैकी होती. तिचा जन्म इथलाच होता. वडील ब्रिटिश होते, आई इंडियन. वडील कधीच सोडून गेले, आई काही वर्षांपूर्वी गेली. ससिमा घोड्यांवरून आसपासच्या गावागावात फिरायची. औषधपाणी द्यायची, भविष्य सांगायची.

मलाही स्वत:बद्दल सांगावंसं वाटायचं. इंडियामध्ये काय करण्यासाठी आले होते? 'मेमसाब' होण्याचं स्वप्न कसं दूर बॉम्बेला राहिलं. आणि इथे काय होऊन राहिले आहे.

पण उजाडता उजाडता ससिमाला पुढे निघायला लागायचं. पुढच्या गावाकडे. माझ्याबद्दल बोलणं काढायला मलाच धीर झाला नाही.

पण तिला कळलं. कसं ते माहीत नाही, आपल्याआपण कळलं. मी न सांगता.

''हेल्प युवरसेल्फ, गर्ल,'' ती म्हणाली. ''स्वत:ला मदत स्वत:च करायला लागते.''

''पण कसं?'' मी विचारलं.

पण मला उत्तर नको होतं. मला मिस हॉकिन्स आठवली. आणि तिने दिलेली पेरिग्राईन फाल्कनची ब्रूच-पिन.

## पाच

हल्ली शोल्टो मला राउंडलाही घेऊन जात असे. उंच डोंगरांतल्या खिंडींमधून छोट्या गावांमध्ये जायला लागायचं. माझ्यासाठी शोल्टोने एक साईड-सॅडल मागवून घेतलं होतं. दोघेच असायचो, रस्ते निर्मनुष्य : दुर्गम, कच्चे.

एक दिवस पहाटेच राउंडला निघालो. मला खरं तर जायचं नव्हतं. धुकं दाट पडलं होतं. अशाच धुक्यात ससिमा येते. पण शोल्टोच्या हुकमाची ताबेदारी न करण्यात अर्थ नव्हता. दोन वळणं घेतल्यावर डाकबंगला दिसेनासा झाला. नेहमीचा डोंगरी पट्टा सुरू झाला. एका बाजूला डोंगर, दुसऱ्या बाजूला दरी.

शोल्टो पुढे होता, मला त्याची पाठ दिसत होती. घोड्याच्या मागे दोन्ही बाजूंना खाकी दप्तरं लटकवली होती - शोल्टोच्या कामाच्या कागदपत्रांनी भरलेली. शोल्टो मागे वळून बघता तरी त्याला दप्तरांच्या आडचं काही दिसलं नसतं.

मी सहज वर पाहिलं. वर डोंगरातही आमच्या रस्त्याला समांतर जाणारा एक रस्ता होता. कदाचित हाच रस्ता वळून तिथे जात असेल. त्या रस्त्यालाही दुतर्फा झाडोरा होता, पण मधल्या मोकळ्या जागांमधून थोडं दिसत होतं. त्या रस्त्यावर एका घोड्याचं अंग तपकिरी चमकलं. पिवळ्या-तांबड्या धांदोट्या दिसल्या.

दीर्घ श्वास घेऊन मी पुढे पाहिलं. आमच्या उजव्या बाजूला डोंगर होता, आणि त्याला वळसा घालत रस्ता वर वर चढत होता. वळसा घालायचं वळण होतं त्या ठिकाणी जवळजवळ तीन बाजूंना दरी होती. खोल. धुक्याने भरलेली.

मी पंख मिटून घेतले, आणि ड्रेसला लावलेली ब्रूच-पिन काढली. ती टाचायचा आटा सुटा केला, म्हणजे मागची लांब अणकुचीदार टाचणी हातात यावी. ब्रूच उलटा करून मुठीत घेतला. दहा शिलिंगांच्या त्या पेरिग्राईन फाल्कनने माझ्या अंगात आपलं बळ सोडलं. दोन बोटांच्या मधल्या भेगेतून टाचणी बाहेर आली.

पंख पसरून झडप घ्यायला आता थोडीशीच वाट बघायला लागणार होती. समोरचा घोडा वळण घ्यायची.

❑



# एकेक पान गळावया

## (फ्लोरियन झेल्लरच्या ‘फादर’ नाटकावरून प्रेरित)

## डॉ. समीर नारायण मोने

### अंक पहिला

### प्रथम प्रवेश

(पडदा उघडतो. रंगमंच उजळतो. एक खोली, घरातला दिवाणखाना असावा. सामानाने अस्ताव्यस्त भरलेली. जागोजाग विविध प्रकारचे सामान बांधून ठेवलेले आहे. पुस्तकांचे गठ्ठे, वर्तमानपत्रांचे ढीग तर आहेतच, पण त्यासोबतच काही खुर्च्या, एखादे टेबल कापड पांघरून झाकून ठेवले आहे. गोदामाची कळा आली आहे. एका कोपऱ्यात काहीशी स्वच्छ बैठक– सतरंजी अथवा जाजम अंथरलेले आहे. त्यावर एक लोड. त्या सतरंजीवर एक विचित्र माणूस बसला आहे. त्याच्या डोक्याला मुंडासे एखाद्या टापशीसारखे बांधलेले आहे. अंगात पुराणकालीन कोट आणि गुंड्यांचा अंगरखा त्याने घातलाय, धोतर नेसलेले आहे. त्याच्यासमोर पेटी. प्रेक्षकांना सन्मुख एका आरामखुर्चीवर एक टक्कल पडलेले साधारण ७० ते ७५ वर्षांचे गृहस्थ स्वच्छ बंडी आणि पायजमा घालून बसलेले आहेत. सगळे लक्ष त्या विचित्र अशा गृहस्थाकडे. तो आपल्या तंद्रीत मग्न. कधी पेटीचा भाता दाबून धरून एखादा सूर वाजवत पेटीच्या भात्यातील हवा काढून टाकतोय, तर कधी सगळ्या सुरांवरून सरसर बोटे फिरवतोय. जणू काही तो त्या पेटीचे लाड करत बसलाय. गृहस्थ आतुरतेने

त्याच्याकडे बघतायत. त्याच्या परफॉर्मन्सची वाट बघतायत. पडदा उघडतो, तशी ते बोलू लागतात)

**गृहस्थ** : आत्माराम, जादू आहे बाबा तुझ्या बोटात.

(माणूस त्यांच्याकडे बघून आपल्या गळ्याला हात लावून 'याचे काय' असा खुणेने प्रश्न विचारतो) तुझं नरडं.. उसका तो जवाब ही नहीं, भैया. तिन्ही सप्तकात मुलायमपणे फिरतो तुझा आवाज. कसलाही त्रास नाही का सायास. (आत्माराम वरती छताकडे बोट करतो.) हो हो, खरंच दैवी देणगी आहे बाबा. भलेभले गायक ज्या ठिकाणी धडपडत पोचतात, तिथं तू सहज जातोस. किती सहज जागा घेतोस एकेक. (आत्माराम हाताने 'छान' अशी खूण करत पेटीवरून हात फिरवतोय) तुला कशाचंच वावडं नाही रे. ठुमरी म्हणू नका, लावणी म्हणू नका, सगळ्यांत सहज संचार असतो तुझा. (परत आत्माराम हसून बघतो.) मला तर तुझा तो हेवा वाटतो बाबा. मला सगळ्याची आवड आहे. अगदी गाणीसुद्धा म्हणावीशी वाटतात. पण तोंड उघडलं की भसाड्या सुराशिवाय सूर बाहेर पडत नाही. (आत्मा छातीवर हात मारतो). हो.. हो.. तू आहेस बाबा.. म्हणूनच निभतंय बघ सारं. सोबतही मिळते आणि मैफिलीही सजत राहतात. (आत्माराम थंडपणे त्यांच्याकडे पाहतोय). अरे, आता गप्प का? प्रख्यात गायक मैफिलीत विश्रांतीसाठी मध्ये आपल्या वादकांना वाजवायला लावतात.. तसा तू मला बोलायला वाव देतो आहेस का? खूप झाली तुझी विश्रांती. चढ्या सुरातील लावणी फक्कड म्हणालीस. आता होऊन जाऊ दे एखादं झकास नाट्यगीत. (आत्माराम उठून कडेला जाऊ लागतो) आता कुठे निघालास? (आत्माराम ओठांचा चंबू करून दाखवतो). अच्छा, तोंड रिकामं करायचंय.. कधी तंबाखूचा तोबरा भरतोस, कळतही नाही. पण, बाबा रे, त्या खिडकीकडे जाऊ नको. इकडे जा. परवा तिकडून थुंकलास. त्या खालच्या नेनीणीनं बोंब मारली. आजोबा तंबाखू खाऊन जागोजाग थुंकतात, आमच्या सुनेला सांगितलं. मग घरात हे तारांगण. जान्हवीला काय संधीच मिळाली. अद्वातद्वा बोलली ती मला. (आत्माराम हसून दुसऱ्या बाजूला जातो. माणूस हलकेच डोळे मिटून घेत) वा वा, काय सुरेख वाऱ्याची मंद झुळूक आलीये! ( आत्माराम परत येऊ लागतो). पण लावून टाक बाबा ती खिडकी. परत नाही तर व्हायचं आमचं तर्पण. खिडकी उघडी टाकलीत, डास आले, वगैरे वगैरे. तुझं बरंय.. करतोस तू.. भोगावं लागतं मला. तू आल्याचं सांगता येत नाही ना.. नाहीतर आहेच परत आमची षष्ठी. (आत्माराम परतून त्यांच्यासमोर येतो. गाय छापाची पुडी समोर करतो) नको रे बाबा.. गेले आता ते दिवस. साध्या दहीभातानं नाकाची सालं जातात.. सर्दी होते. या दहीभातानं तोंडाची सालं जातात (आत्माराम त्यांना 'गप्प' अशी खूण करतो) हो हो, गप्प बसेन, पण तू गायला सुरुवात तर कर. म्हण एखादं छानसं नाट्यगीत (तो जाऊ लागतो तशी त्याला थांबवून त्याच्याकडून तंबाखूची पुडी घेतात. हातातच ठेवतात. तो जाऊन बसतो. पेटी वाजवायला सुरुवात करतो आणि मग ताल धरून गायला)

**आत्माराम** : मंद, मंद ये समीर जागवीत आठवणी...

**गृहस्थ** : वाह, क्या बात है.. खरे रे बाबा. वाऱ्याच्या झुळकीसोबत विहरत येतात आठवणी.

झेपत नाहीत त्या. म्हणून मग खिडक्या ठेवायच्या बंद.

**आत्माराम** : शू...

**गृहस्थ** : हो हो, तोंडाची कवाडं आधी बंद ठेवायला पाहिजेत. मुस्कटदाबीची सवय व्हायला हवी (आत्माराम पेटी बंद करून उठायच्या तयारीत) माफ कर, बाबा.. चालू दे तुझं.. माझं आता तोंड बंद.. कायमचं का नाही होत कुणास ठाऊक? (तंबाखू मळायला लागतो. आत्माराम हसून पुढे गाऊ लागतो.)

**आत्माराम** : मंद, मंद ये समीर जागवीत आठवणी. विकसित मधुगंध बहर स्वर्गसुखाच्या लहरी (दोन-तीनदा त्याच ओळी रिपीट करतो. नंतर पेटीचा सूर धरून विचाराक्रांत मुद्रा.) अप्पासाहेब..

(अप्पा गप्प बसून राहतात.) मंद मंद ये समीर जागवीत आठवणी. अप्पा..

**अप्पा** : विसरलास ना, मेल्या? आणि मला तेवढं तोंड बंद ठेवायला सांगतोय. आता तंबाखू चघळत कसं बोलणार मी..

(आत्माराम जोरात 'हूं' करतो) बरं बरं, बरोबर गाऊन दाखवतो. थांब जरा (तोंडात बोट घालून आतील मसाला काढून भिरकावून देतात. अंगाला हात पुसतात. आत्माराम चेहरा वाकडा करत 'याक' असं म्हणतो.) असू दे. मारू दे त्या नेनीण बाईला बोंब. आणि घरात पडलं असेल तर नंतर भागी.. आमची मोलकरीण करेल साफ. तिला द्यावी लागेल गप्प बसण्यासाठी थोडी लाच. म्हणजे तंबाखूचीच एक पुडी. पण बसेल गप्प..

**आत्माराम** : (काहीशा जोरात) हूं.

**अप्पा** : हो, हो, सांगतोय. पण मला जरा आठवू दे ना. (समोरच्या बाटलीतले पाणी हातावर घेतात. हात झटकतात. कपड्याला पुसतात. मग पाणी पितात.)

**आत्माराम** : मी आहे.

**अप्पा** : हा.. काय बरं गाणं.. मंद मंद ये समीर.. पुढचं काही आठवतच नाही.

**आत्माराम** : मंद, मंद ये समीर जागवीत आठवणी...

**अप्पा** : जरा तालासुरात नीट म्हण की मगासारखं. आठवायला काही किक तर बसायला पाहिजे.

**आत्माराम** : (लय पकडून पेटी वाजवत) मंद, मंद ये समीर जागवीत आठवणी.

**अप्पा** : अंग्गाश्शी.

**आत्माराम** : मंद, मंद ये समीर जागवीत आठवणी. विकसित मधुगंध बहर स्वर्गसुखाच्या लहरी...

**अप्पा** : झक्कास. जमतंय की. मस्तय. गात राहा आता पुढे.

**आत्माराम** : अप्पा.

**अप्पा** : अरे, खरंच की. पुढचे येतच नाही ना तुला. विसरभोळा. आठवणींचा खंड कुठला, आत्माराम, गा.

**अप्पा** : सुगावा द्या.

**आत्माराम** : विकसित मधुगंध बहर, स्वर्गसुखाच्या लहरी...

**अप्पा** : हा. मंद मंद ये समीर, जागवीत आठवणी (पेटी वाजतीये. त्याच्यासोबत भसाड्या

आवाजात गाऊ लागतात.) विकसित मधुगंध शिशिर...

**आत्माराम** : बहर.

**अप्पा** : तेच ते. आता डिस्टर्ब करू नकोस हं मध्ये मध्ये. विकसित मधुगंध.. काय.

**आत्माराम** : बहर, स्वर्गसुखाच्या लहरी...

**अप्पा** : हा.. घे.. पुढचं (एकदम टिपेच्या सुरात, भसाड्या आवाजात गाऊ लागतात) कैलासाचा कळस.. ध्वजा कौपीनाची, अढळ त्या पदावरती (आत्मा पेटी थांबवतो आणि जोरजोरात मान हलवत 'नाही नाही' म्हणतो) आता काय झालं तुला? पुढचे शब्द आठवतायेत मला. सुंदर गातोय मी. झोंबतंय वाटतं तुला? ऐक मुकाट्यानं.. गाऊ दे मला. कैलासाचा कळस.. ध्वजा कौपीनाची, अढळ त्या पदावरती.. दृष्टी यात्रिकाची.. गा.

**आत्माराम** : (पेटी वाजवत पुढे गाऊ लागतो) मला नाही उरली आता ओढ प्रपंचाची, साद देती हिमशिखरे शुभ्र पर्वताची.

**अप्पा** : (त्याला थांबवत) अरे अरे, काय चाललंय? कुठून कुठं घुसतोयस? 'मंद मंद ये समीर'मधून 'साद देती हिम शिखरे'? क्रमिन वाट एकाकी? हो, पडलोय मी एकटा.. माझी मत्स्यगंधा कधीच सोडून गेली मला.. पण कावेरी गेलीये याची सारखी चरचरून आठवण करून द्यायची तुला गरज काय? कोरले ते काळाने माझ्या मनावर. तुला काय करायचंय? का तू 'मंद मंद समीर' सोडून घुसलास 'साद देती'मध्ये?

**आत्माराम** : (गाऊ लागतो.) अढळ त्या पदावरती दृष्टी यात्रिकाची, मला नाही उरली आता ओढ प्रपंचाची. (अप्पांकडे रोखून पाहू लागतो.)

**अप्पा** : (ओशाळत) oh my fault. मीच तुला चुकीच्या मार्गाला की रे लावलं (हसत) अरे, हे वसंत देसाई म्हणजे नं परत परत स्वतःला रिपीट करतात. त्यांच्या एका गाण्यातून त्यांच्याच दुसऱ्या गाण्यात सहज घुसतो आपण (गातो) मंद मंद ये समीर.. अढळ त्या पदावरती.. बघ येतंय ना लक्षात? ही चूक.. चूक नाही म्हणता येत त्याला.. किमया.. वसंत देसाईंची.. त्यांचंच ना रे संगीत?

**आत्माराम** : बुवा.. अभिषेकी.

**अप्पा** : काय?

**आत्माराम** : संगीतकार .. अभिषेकीबुवा.

**अप्पा** : खरंच की रे.. जितेंद्र.. मत्स्यगंधा ते महानंदा. काय रेंज होती माणसाची. त्यात मध्येच हे नाटक 'धाडिला राम तिने का वनी' त्यातलं हे 'मंद मंद' आणि 'मत्स्यगंधा'तलं महान गाणं 'साद देती हिमशिखरे' अभिषेकीबुवांची कमाल. बरोबर नं?

**आत्माराम** : हो.

**अप्पा** : बघ, विसरलो नाहीये मी. फक्त कधी कधी गोंधळ होतो. इकडच्या खोलीतलं सामान त्या खोलीत घुसतं. असं का होतं माहितीये का?

**आत्माराम** : म्हातारपण.

**अप्पा** : छट्. वय झालं तरी बुद्धी तेजतर्रार आहे. पण ज्ञान, विशेषतः माहितीचं कसं आहे ना,

की ती सतत ब्रशअप करायला लागते. त्यावरची धूळ झटकायला लागते. तू म्हणतोस ते एका अर्थी बरोबरच आहे. वाढतं वयच कारणीभूत आहे माहितीवर धूळ साठायला, त्यावर कोळिष्टकं जमायला.

**आत्माराम** : ते कसं ?

**अप्पा** : अरे वयानुसार, खूप माहिती, ज्ञान गोळा होत जातं.. आणि मग ते हळूहळू अडगळीत पडायला लागतं.. आजूबाजूला समजूतदार लोकं नसले की गोळा होणाऱ्या सामानाचे गठ्ठे बांधून ते कुठेही टाकले जातात. या खोलीत पडलेत ना तसे. मग रसेल शेजारी अगाथा ख्रिस्ती येते, तर जीएंशेजारी वि. आ. बुवा. सगळेच थोर पण एकमेकांशी संबंधित नाहीत. सगळंच असंबद्ध होऊन जातं मग. मेंदू संगती तरी कशी लावणार?

**आत्माराम** : असं का बरं होतं?

**अप्पा** : घरातल्या तरुण मंडळींना म्हाताऱ्यांची नसते फिकीर. त्यात त्यांचाही दोष नाही. ते आपल्या व्यवधानांत मग्न असतात. अडगळ असते म्हातारे म्हणजे त्यांच्यासाठी. म्हाताऱ्यांना गरज म्हाताऱ्यांची. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ. बाकी आमच्या पोरांसाठी आम्ही असून अडचण नसून खोळंबा

**आत्माराम** : खोळंबा?

**अप्पा** : बघ ना, रे. घर माझं.. म्हणून मी खोळंबा.. संभाळायला लागतंय म्हणून अडचण. तरुणपणापेक्षा म्हातारपणी बायकोची जास्त गरज बघ.

**आत्माराम** : कावेरी बाई.

**अप्पा** : ती तर माझं गलबत होती. माझ्यासारख्या घोंगावणाऱ्या तुफानालाही ती बरोबर मार्ग दाखवे. निघालो होतो तिच्या मागोमाग किनाऱ्याकडे पण माझं गलबत वाटेतच डुबलं.. अगदी समोरच किनारा दिसत असताना.

**आत्माराम** : मग?

**अप्पा** : धडकलो तसाच किनाऱ्यावर. पण त्या धडकेने ताकदच संपली माझी.

**आत्माराम** : मग काय आता घर शोधताय वाटतं?

**अप्पा** : नाही. घर मिळालं मला. पण फक्त पंख मिटून पडण्यापुरतं. जरा पंख फडफडायला लागले की भिंती थरथरतात. माणसं हेलपाटायला लागतात आणि मग वाचण्यासाठी जगण्याच्या धडपडीत बोचकारायला लागतात. तुफान आला म्हातारपणाची जाणीव करून देत, हे रावण त्याचे पंख छाटू बघतात जटायूसारखे.

**आत्माराम** : तुम्ही वातापी आहात.

**अप्पा** : म्हणजे?

**आत्माराम** : वातापी, जटायूचा भाऊ. स्वतःची कुवत कळली नाही त्याला. प्रचंड उंचीवरून, सूर्याच्या जवळून उडायला गेला. उड्डाण करताक्षणी जळून गेले त्याचे पंख. जाळून घेतले त्याने स्वतःचेच पंख.

**अप्पा** : असू दे, रे बाबा. पण तू आहेस ना माझ्या मदतीला, सावरत जा मला.

**आत्माराम** : होय. तेच तर माझं काम आहे. त्यासाठीच मी आहे.

**अप्पा** : मग आता काय ऐकवतोस मला?

**आत्माराम** : साकडं घालतो परमेश्वराकडे तुमच्यासाठी. मागणं मागतो त्याच्याकडे

**अप्पा** : पसायदान?

**आत्माराम** : नाही. नटसम्राट तुम्हाला फार आवडते असे दिसतंय. त्याच लेखकाचं दुसऱ्या एका नाटकातलं तुमच्या अभिषेकीबुवांनीच संगीतबद्ध केलेलं एक पद म्हणणार आहे मी.

**अप्पा** : म्हण रे म्हण. तुलासुद्धा एवढं बोलायला भाग पाडणारं ते पद खरंच महान असेल. गा.

**आत्माराम** : (पेटीवर वाजवत गाऊ लागतो) सर्वात्मका, सर्वेश्वरा, गंगाधरा शिवसुंदरा; जे जे जगी जगते तया...

(एक प्रौढ माणूस धाडकन तावातावाने प्रवेश करतो. बरम्युडा पॅन्ट आणि पोलोनेक, बिन बाह्यांचा टी-शर्ट).

**माणूस** : काय कडकड लावली आहेत? मला जरा शांतपणे काम करू देणार आहात की नाही?

**आत्माराम** : माझे म्हणा करुणाकरा.

**माणूस** : माझ्यावर करुणा करा आणि गप्प बसा.

**अप्पा** : अरे अनिरुद्ध, जरा शांत हो.. अशी चिडचिड-चिडचिड करू नकोस, रे. तुझ्या अशा वागण्यानेच तुला ब्लडप्रेशरचा त्रास जडलाय. जरा शांत हो.

**अनिरुद्ध** : तुम्ही शांत बसलात तर मला शांतता मिळेल, कामं होतील, जिवाला शांती लाभेल.

**अप्पा** : त्यासाठी मला कायमचंच शांत व्हावं लागेल.

**अनिरुद्ध** : एवढं कुठलं आमचं भाग्य. आम्हाला पोचवाल आणि तरी जगत राहाल. कधी कधी वाटतं की मी सिंदबाद आहे आणि माझ्या मानेवर बसलेला म्हातारा तुम्ही आहात. तुम्हाला तर्र करण्याची दारूही नाही सापडते मला. एक दिवस तुमच्या वाळक्या मांड्या माझा गळा दाबून टाकणारेत. श्वास गुदमरायला लागलाच आहे माझा.

**आत्माराम** : साहेब

**अनिरुद्ध** : ए, तू गप हं. माझ्या न माझ्या वडिलांच्या मध्ये बोलायचं तुला काहीच कारण नाही. अप्पा, तुम्ही तरी कसले बाजारबुणगे गोळा करून आणता हो.

**अप्पा** : (कडाडत) अनिरुद्ध, फार होतंय हे. माझ्याकडे आलेले हे माझे पाहुणे आहेत. सन्माननीय. त्यांचा तू सन्मान करू शकत नसशील तर कमीत कमी अपमान तरी करू नकोस.

**अनिरुद्ध** : काय करतात म्हणे हे तुमचे सन्माननीय पाहुणे? येतात कशाला इथं ते? भिका मागायला?

**आत्माराम** : मी निघतो.

**अप्पा** : दोन मिनिटं थांब, आत्माराम. अनिरुद्ध, नीट कान उघडे ठेवून ऐक. माझ्यासाठी हा आत्माराम खूप महत्त्वाचा आहे. तो पूर्ण लक्ष देतो माझ्याकडे. माझं मन रिझवतो. माझी करमणूक करतो, माझी गाऱ्हाणी ऐकतो.

**अनिरुद्ध** : तुम्हाला हे करायला, अशा एखाद्या माणसाची, परक्याची गरजच काय? आम्ही काय मेलोत?

**अप्पा** : हो.

**अनिरुद्ध** : काय ?

**अप्पा** : होय. पण तुम्ही माझ्यासाठी नाही तर मी तुमच्यासाठी मेलेलो आहे. तुम्ही लक्षही देत नाही माझ्याकडे. अडगळीच्या या खोलीत मला टाकून देऊन मोकळे झालायत तुम्ही. अशावेळी हा देतोय मग मला आधार.

**अनिरुद्ध** : तुमच्या नेमक्या अपेक्षा तरी काय आहेत हो आमच्याकडून ? सगळी कामंधामं सोडून सारखं काय तुमच्याच नादी लागायचं की काय ?

**अप्पा** : दिवसातून एकदा नुसती चौकशी केली, दोन गोड शब्द बोलले तरी पुरेल.

**अनिरुद्ध** : आहेत की हे तुमचे भाट त्यासाठी.

**अप्पा** : मग त्यांना अद्वातद्वा बोललेलं मला खपणार नाही. या घरात त्यांचा अपमान सहन केला जाणार नाही.

**अनिरुद्ध** : मग बसा त्यांनाच कवटाळून, आमची कामं जाऊ द्या बोंबलत. तुमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी work from home घेतलं आज. काल त्या नर्सला, त्या मुलीला घालवलं तुम्ही. त्यामुळे आज माझ्यावर ही वेळ आली.

**अप्पा** : ती नालायकच होती.

**अनिरुद्ध** : या वर्षातली सहावी. तुमच्यामुळे गेलेली. तुम्ही घालवलेली.

**अप्पा** : मला नाही कुणाच्या मदतीची गरज.

**अनिरुद्ध** : मग मी पण जातो आता. या तुमच्या गलक्यात इथं काम करणं अशक्य आहे. ऑफिसमध्ये जाऊनच काम करतो. बसा तुम्ही तसेच.
(मार्गाबाहेर जातो)

**अप्पा** : बघितलंस ना, हे आमचे दिवटे.. चिरंजीव.

**आत्माराम** : तुफानसाहेब, मी आता निघतो. पडा पंख मिटून.

**अप्पा** : आता, परत ?

**आत्माराम** : मी काय म्हणतो, अप्पा, आता निरंतर मैफली सजवूया की आपण. कशाला या दुनियेच्या मोहात अडकून पडताय. सोडा सगळं. चला तिकडं. तिथे कावेरीबाईसुद्धा वाट बघतायेत तुमची. बाकी साजिंदेही तयार आहेत. आता या असल्या जगण्याचा मोह सोडा आणि चला.. येताय का ? (हात पुढे करतो. आप्पा मानेने 'नाही नाही' म्हणत मागे सरकतात. हळूहळू अंधार)

## अंक पहिला
## प्रवेश दुसरा

(प्रकाश. अप्पा काहीतरी करण्यात दंग आहेत. अतिशय तल्लीनपणे काम करत आहेत. मागील प्रवेशापेक्षा खोलीतले काही गठ्ठे आता कमी झालेत. आप्पा काम करता करता काहीतरी शोधू लागतात. संपूर्ण रंगमंच पालथा घालतात, पण हवी ती गोष्ट सापडत नाही

बहुतेक. मग प्रचंड आरडाओरडा सुरू करतात.)

**अप्पा** : काय घर आहे का भुताटकी? एक गोष्ट काही जागेवर सापडत नाही. मी माझ्या खुणेनं गोष्टी ठेवतो. या कावेरीलाही उद्योग नाहीत. नको त्यावेळेला आवरासावर करते. हव्या त्या गोष्टी नेमक्या सापडत नाहीत. कुठे गेले ते बिजागरी स्क्रू? मी इथे इथे ठेवलेले (दोन चार ठिकाणी जाऊन तपासतात)? नाहीच मिळत. काय करू आता, मी काय करू (घरातल्या आतल्या भागाकडे तोंड करून ओरडतात) माझे ते विशिष्ट स्क्रू कुठे आहेत? (काही उत्तर नाही. परत पुढे जाऊन तोंडापुढे कर्णा धरल्यासारखे पंजे धरत ओरडतात) माझे ते नीट ठेवायला दिलेले स्क्रू कुठे ठेवलेत? की टाकलेत पेपरसोबत रद्दीत.. अं.. ऐकू येत नाही (पुढे सरकतात आणि अडखळतात. पायाला ठेच लागते) अंऽऽ, गेला माझा पाय (खाली वाकून बघत) च्यायला, ही हातोडी वाटेत कोणी टाकली? फुटला न .. माझा पाय. च्यायची कटकट (खाली वाकून हातोडी उचलतात आणि विंगेच्या दिशेने फेकतात. मग एका ठिकाणी जाऊन बसतात. पायाचा तळवा दुसऱ्या पायाच्या मांडीवर ठेवून त्याचा अंगठा कुरवाळू लागतात. आतून एक ४५ ते ५० वर्षांची बाई बाहेर येते. वाटेतली हातोडी उचलते. हे स्वतःच्या अंगठ्यातच मग्न. पाचवारी साडी नेसलेली ती प्रौढा काहीशी संत्रस्त. घरातली साडी आहे. पदर खोचलेला आहे. स्वयंपाकघरात कामात असावी बहुतेक. जाऊन ती हातोडी एका ठिकाणी व्यवस्थित ठेवते. अप्पा स्वतःतच गुंतलेले. त्यांनी ठेवलेल्या ठिकाणीच जाऊन ती काहीतरी शोधते. एक कागदी पुरचुंडी बाहेर काढते आणि त्यांच्यासमोर येते. त्यांचे लक्ष नाही. ती त्यांच्यासमोर पुरचुंडी करते. तरी त्यांचे लक्ष नाही. मग त्यांच्या दंडाला हात लावते. ते दचकून तिच्याकडे बघतात)

**अप्पा** : (खेकसत) काय आहे ? (ती त्यांच्यासमोर पुरचुंडी धरते. ते ती घेऊन उघडतात.. चेहऱ्यावर लहान बाळासारखा आनंद) वाह... स्क्रू.. थँक्यू थँक्यू .

(पटकन कामाला लागतात. ती एकही अक्षर न बोलता परत आत निघून जाते. ते कामात गुंग. मध्येच ओरडतात) तो स्क्रू ड्रायव्हर कुठे आहे? (ती परत येऊन देऊन जाते. असे अजून एकदोनदा घडते. ती बिचारी येते. गुपचूप काहीतरी त्यांना देऊन जाते. काहीही बोलत नाही. आप्पा कामात मग्न. मधेच त्रागा करतात. मध्येच खुश होऊन शिट्टी वाजवत बसतात. अखेर ती बाई खोचलेला पदर सोडून त्यालाच हात पुसत पुसत बाहेर येते. अप्पांचे काम चालूच. त्यांच्यासमोर येऊन उभी राहते)

**बाई** : काय होतंय का नाही आज?

**अप्पा** : श् .. श्श् .. अजिबात बोलू नका.. फक्त एकच मिनिट (ती बाजूला कुठेतरी जागा करून बसते. एका गठ्ठ्यातलं एक पुस्तक काढायला जाते तर सगळा गठ्ठा कोलमडतो. थोडासा आवाज. ते रागाने वर बघतात) काय चाललंय? थोडा वेळ शांत बसता येत नाही?

**बाई** : सॉरी, सॉरी.

(त्यांनी तिचे 'सॉरी' ऐकलेले नाही इतके ते आपल्या कामात गर्क आहेत. बाई पुस्तक

वाचायला सुरुवात करणार तोच आप्पा टाळी वाजवत उठतात, गिरकी घेतात आणि एकदम विंगेपाशी जाऊन हाका मारायला लागतात.)

**अप्पा** : कावेरी, ए कावेरी.. चटकन बाहेर ये बघू.

**कावेरी** : (उठत) अहो, असं काय करता? मी बाहेरच आहे.

**अप्पा** : अरेच्चा, तू कधी आलीस बाहेर ?

**कावेरी** : मगाशीच.

**अप्पा** : मगाशीच ? मग मला दिसली कशी नाहीस?

**कावेरी** : तुम्ही माझ्या अंगावर हे जोराने खेकसलासुद्धा नाहीत का?

**अप्पा** : खेकसलो ? चल, काहीतरीच.. मला नावं ठेवायची सवयच झालीये तुला. आत्ताच दिसलीस तू मला.. पण तू बाहेर कशी काय?

**कावेरी** : स्वयंपाक झाला. बाकी सगळं आवरूनही झालं. चला, जेवायचंय का आता? तयार आहे सगळं.. घेऊ का पानं?

**अप्पा** : थांब गं.. सारखं कसलं तुला जेवायचं असतं? मी कशाला बोलवलं तुला.. आणि तू करतेस काय?

**कावेरी** : बोला, कशाला बोलावलं होतं?

**अप्पा** : तुला काहीतरी दाखवायचं होतं.

**कावेरी** : दाखवा की मग.

**अप्पा** : (एकदम चिडत) नको.. काही गरज नाही.. झालय ना सगळे जेवण तयार.. मग वाढा. चला गिळू या.. मग तुम्ही करा वामकुक्षी.. दुपारी चहा घेऊ. त्यानंतर रात्रीच्या जेवणाची तयारी. मध्ये मिळाली थोडी सवड.. असेल थोडा फावला वेळ.. तर दाखवतो तुम्हाला आमची कारागिरी.

**कावेरी** : (कळवळत) अहो, का उगा त्रागा करता? आता मला काय माहीत तुम्ही काय केलंयत? दाखवा बरं आता.

**अप्पा** : उगाच उपकार नकोयत. अगदी मर मर मरून, हौसेनं आणि खूप कष्टाने केलंय मी ते तुझ्यासाठी. आनंदाने बघणार असशील तर दाखवतो. नाहीतर राहू दे.

**कावेरी** : माझ्यासाठी केलंयत ? खरंच.. दाखवा बरं.. खूप आनंद झालाय मला.

**अप्पा** : कुणी ऐकलं तर म्हणेल नवरा बायकोसाठी काहीच करत नाही.. अगदीच अप्रूप दिसतंय.

**कावेरी** : चला.. बास झालं करवादणं. उगाच उत्सुकता ताणू नका. इथं जीव थोडा थोडा होतोय्.

**अप्पा** : ते बघ तिकडं.. ढ्या ट्या ण्यां.. (कावेरी तिकडे जाते) ती बघ, ती बॉक्स केलीये.

**कावेरी** : अरे देवा.. काय छान आहे हो ही.. रंगीबेरंगी.. सुरेख.. कशासाठी केलीत हो अप्पा– तुझ्यासाठी. वेगवेगळे रंगीत कोरगेटेड शीट वापरून तुझ्यासाठी ही बॉक्स केली आहे.. तुझ्या औषधांसाठी.

**कावेरी** : माझ्यासाठी.. खूप भरून आलंय.. पण माझ्या औषधांसाठी? मला औषधं.

**अप्पा** : काल रात्री पोट दुखत होतं ना तुझं.. त्यावेळी पोटदुखीची गोळी नाही सापडली तुला.. त्यासाठी आता ही बॉक्स.. तो कप्पा, केशरी रंगाचा सकाळच्या गोळ्यांसाठी.. तो पिवळा, त्यात दुपार आणि संध्याकाळच्या गोळ्या ठेवायच्या आणि ते काळं झाकण आहे की नाही त्यात रात्रीच्या गोळ्या ठेवायच्या.

**कावेरी** : अहो, पण तीन वेळा गोळ्या.. कशासाठी.. कुणाला चालू आहेत?

**अप्पा** : तू जरा नीट समजून घे. लक्षात घे बरं जरा. दोन वर्षांत मी रिटायर होईन. आपली पोरं आपल्या जवळ नाहीत. आपणच आपले एकमेकांसोबत. ब्लड प्रेशर आहे, डायबिटीस आहे.. होतीलच ना अशा व्याधी.

**कावेरी** : शुभ शुभ बोला की जरा.

**अप्पा** : अगं, वयानुसार या गोष्टी होणारच. कुणाला आधी, कुणाला नंतर. त्यात परत विस्मरण झालं की कुठल्या गोळ्या कधी घ्यायच्या, हेही लक्षात राहणार नाही. त्यासाठी ही तजवीज.

**कावेरी** : वेडे आहात झालं.

**अप्पा** : असू दे. शहाणपणाऐवजी वेडेपणाच फायद्याचा ठरतो. असं काहीतरी तयार होतं. कसं झालंय?

**कावेरी** : झालंय ते सुंदरच झालंय. पण सगळा नादिष्टपणाच.

**अप्पा** : कसला नादिष्टपणा? कालची तुझी तळमळ बघवली नाही मला. म्हणून मग आज सुट्टीचं.

**कावेरी** : तुम्ही उगाच काळजी करता. अहो दुखतं असं बायकांना अधूनमधून ओटीपोटात. विशेषतः या वयात.

**अप्पा** : पण, कावेरी, आजकाल तुझी ही पोटदुखीची तक्रार वारंवार उपटायला लागलीये.

**कावेरी** : वारंवार कुठली... काहीतरी अरबट चरबट खाल्लं की होतं असं. बाहेरचं खाल्लं की, होतो त्रास आणि तुम्ही तर सतत बाहेरचं खातात आणि मला खायला लावतात. वडे, भजी, पावपॅटीस. नाही सोसत हो मला आता.

**अप्पा** : खरंच. आज रविवार. चल जाऊ कुठेतरी बाहेर. तो नवीन डायनिंग हॉल झालाय. अरबट चरबट नको. वडा भजी नकोत. सरळ जाऊन थाळी खाऊ. वर मस्त स्वीट डिश. कशी काय आयडिया?

**कावेरी** : बेकार. मी इथं मर मर मरून सगळा तुमच्या आवडीचा स्वयंपाक केलाय. मटार करंज्या, मसालेभात, काल आम्रखंडही करून ठेवलेय्. स्वीट डिश. मुकाट्याने घरात जेवायचेय्.

**अप्पा** : चला, घरी तर घरी. नुसता आगडोंब उसळलाय् पोटात. कावळे कोकलायला लागले आहेत.

**कावेरी** : (तिचा चेहरा वेडावाकडा) अहो...

**अप्पा** : कावेरी... काय होतंय कावेरी?

**कावेरी** : प...पोटात... क...कळ येतेय.

**अप्पा** : कावेरी, डॉक्टरांकडे जाऊ या का डॉक्टरांना बोलवायचं घरी?

**कावेरी** : त...तुम्ही आधी जेवून घ्या... मग बघू डॉक्टर का काय ते... आधी जरा निवांत बसते... होईल हळूहळू कमी.

**अप्प** : आणि तुझं जेवण?

**कावेरी** : मी जेवेन नंतर.. जरा हे पोटाचं कमी होऊ दे... आता थोडं पाणी पिते... बघू...पण तुम्ही मात्र जेवून घ्या... बघितलं का, किती वाजले...? (कष्टाने आत निघून जाते. अप्पा फेऱ्या मारू लागतात.)

**अप्पा** : बघितले का, किती वाजले? अरे, मला भूक लागलीये... कोणी वाढणार आहे का मला? खायला घालणारे का? बघितले का, किती वाजले? जवळपास दोन वाजायला आले असतील. (हात वर करून मनगटाकडे नजर टाकतो. मनगटावर घड्याळ नाही. आतून एक २२-२३ वर्षांची मुलगी येते.)

**मुलगी** : आजोबा, आरडाओरडा करू नका. जेवण तयार आहे.

**अप्पा** : जान्हवीनं सकाळीच राधाक्कांकडून तयार करून घेतलेय्. मग जेवण तयार आहे, हे तू कशाला सांगायला पाहिजेस?

**मुलगी** : हां, पण मी तुमचं ताट वाढून ठेवलेय्. जा आत आणि जेवा.

**अप्पा** : वाढून ठेवलंय ताट? सगळे जेवण एकदमच वाढून टाकलेस की काय? ते काय वाढणं वाढायचेय.

**मुलगी** : पहिलं वाढलंय आणि बाकी सगळे डबे तिथेच ठेवलेत. लागलं काही तर घ्या त्यातून. नाही जमलं तर मला हाक घाला. येऊन वाढून जाईन.

**अप्पा** : मग, आत्ता कुठे चाललीस तू?

**मुलगी** : आत्ता, सव्वा दोनला लागणारी सीरियल बघायची आहे मला. दररोज बघते की हो.

**अप्पा** : तुला कसं कळलं किती वाजले?

**मुलगी** : माझं घड्याळ आहे. शिवाय किचनमध्येही घड्याळ आहेच की.

**अप्पा** : सगळ्यांकडून घड्याळं आहेत. त्यांना वेळा कळतात. पण मलाच वेळ कळत नाही. कारण...

**मुलगी** : काय बडबडताय, आजोबा?

**अप्पा** : श्रद्धा, माझं घड्याळ कुठंय?

**श्रद्धा** : मला काय हो माहीत?

**अप्पा** : मग कोणाला माहिती? आपणच तर असतो सदैव बरोबर. म्हातारा माणूस मी. इकडे तिकडे काढून ठेवतो घड्याळ. विसरून जातो मग. तू सांग ना मला, कुठंय माझं घड्याळ?

**श्रद्धा** : सीरियल संपली की शोधून देईन हं.

**अप्पा** : पाच मिनिटे तर लागतील शोधायला.

**श्रद्धा** : काय सांगता येतंय. कदाचित दोन-चार तासही जातील.

**अप्पा** : पाच मिनिटांत हजर कर माझं घड्याळ.

**श्रद्धा** : काय बोलताय, आजोबा. पाच मिनिटांत सापडेल असं थोडीच आहे. देते ना मी नंतर शोधून.

**अप्पा** : बऱ्या बोलानं पाच मिनिटांत हजर कर, नाहीतर तुझं काही खरं नाही. पोलिसांच्या ताब्यात देईन तुला. ते बरोबर बोलतं करतील.

**श्रद्धा** : त... तुम्ही काहीही बरळताय... मी...मी

**अप्पा** : हो, हो, तू... तू चोरलंस ते घड्याळ.

**श्रद्धा** : (ओरडत) आजोबा...

**अप्पा** : ओरडू नकोस. तुझ्यासाठी ती पैशांची गोष्ट असेल पण माझ्यासाठी... माझ्या खूप भावना जुळलेल्या आहेत त्याच्याशी.

**श्रद्धा** : आजोबा... आजोबा... मी खरंच नाही हो घेतलंय घड्याळ... मला माहीतही नाही ते.

**अप्पा** : पाया पडतो मी तुझ्या... पोरी, ते घड्याळ फार महत्त्वाचंय माझ्यासाठी. कावेरीनं, माझ्या बायकोने पै नं पै जोडून अनिरुद्धच्या बारशाला भेट दिलंय ते... दोन भेटी दिलेल्या तिनं मला... एक अनिरुद्ध आणि दुसरं ते घड्याळ. अनिरुद्ध तर हरवलाच आहे. कावेरीची आठवण आता ते घड्याळ फक्त उरलंय. वाटलं तर पैसे देतो मी तुला, पण ते घड्याळ परत कर मला.

**श्रद्धा** : खरंच नाही हो ते माझ्याजवळ. मी नाही घेतलेलं.

**अप्पा** : (कडाडत) ताबडतोब चालती हो... माझा हात तुझ्यावर मी उचलायच्या आत नाहीशी हो तू माझ्या नजरेसमोरून... चांडाळणी, एखाद्या म्हाताऱ्याचं सर्वस्व लुटून तू काय मिळवणार आहेस?

**श्रद्धा** : आजोबा, आपण मिळून शोधू या तिकडे ते घड्याळ. मी मदत करते तुम्हाला.

**अप्पा** : मला कोणाच्याही मदतीची गरज नाही. आभारी आहे मी तुझा. माझी बायको अस्तित्वात नाही याची चरचरीत जाणीव करून दिलीस तू मला. खोट्या भ्रमात जगत होतो मी. कावेरी नाहीतर तिच्या आठवणींशी निगडित वस्तूंच्या कुबड्यांवर आयुष्याच्या रस्त्यावर खुरडत चालत होतो. ती शेवटची कुबडीही तू मोडून टाकलीस. आता माझं मलाच चालावं लागेल. नाहीतर संपून जावं लागेल. धन्यवाद.

**श्रद्धा** : आजोबा...

**अप्पा** : ताबडतोब चालती हो. एखाद्या चोरट्यासोबत मला राहायचे नाही.

**श्रद्धा** : पण साहेब, बाई कुणीतरी येईपर्यंत तरी...

**अप्पा** : मी एकटा राहू शकतो. अजून काही उचलायसाठी वेळ नाही मिळू देणार मी तुला. गेट आऊट. (तिच्या अंगावर धावून जातात. ती घाबरून पळून जाते. उद्विग्न होऊन ते फेऱ्या मारू लागतात.) माझं घड्याळ...माझं घड्याळ... गेलं ते माझं घड्याळ. (हताश होऊन बसतात. काही वेळानं ताडकन उठतात.) मी असा हरणार नाही. तसंच घड्याळ मिळवेनच मी. पण कसं... ते करता येईल... एक काम करू (घरातल्या लँडलाईनजवळ जाऊन फोन उचलून डायल करणार तोच एक प्रौढ माणूस, हातात जेवणाचं भरलेलं ताट घेऊन प्रवेश करतो, त्याच्याकडे त्यांची पाठ. चाहूल लागताच हातात रिसीव्हर तसाच

ठेवून ते विचारतात.) कोण आहे?

**माणूस** : मी विश्वंभर, अप्पा.

**अप्पा** : विश्वंभर? अरे, मी तुलाच फोन करणार होतो.

**विशू** : फोन कशाला करायचा? ताट घेऊन मी येतच होतो. सॉरी हं अप्पा... कामाच्या गडबडीत थोडा उशीर झाला. दोनचे सव्वादोन झाले. विसरूनच गेलो वेळेचं. सहज लॅपटॉपच्या कोपऱ्यात लक्ष गेले तर दोन वाजून गेलेले. तस्सा उठून तुमचं जेवणाचं ताट घेऊन आलो.

**अप्पा** : श्रद्धानं केलेलं?

**विशू** : श्रद्धा? पण ती तर..

**अप्पा** : असो. तो विषयच नको आपल्याला. मला जेवायचं नाहीये.

**विशू** : हे काय नवीन? का नाही जेवायचं?

**अप्पा** : कारण माझी जेवायची वेळ झालीये की नाही हे मला कळत नाहीये.

**विशू** : सॉरी, अप्पा... थोडा उशीर झाला... पण तुमची जेवायची वेळ झालीये... रादर उलटून गेली आहे.

**अप्पा** : कशावरून?

**विशू** : म्हणजे?

**अप्पा** : वेळ उलटून गेलीये, कशावरून? वेळेची जाणीवच नष्ट झालीये... कारण माझं घड्याळ नाहीसं झालंय.

**विशू** : ओ... असंय तर... अप्पा.. तुमचं घड्याळ नाहीसं वगैरे झालेलं नाही. ते माझ्याकडे आहे. (खिशातून एक जुनं मनगटी घड्याळ काढत) हे बघा, चालू आहे. दोन वीस झालेत. जेव्हा आता...

**अप्पा** : पण हे तुझ्याकडे कसं?

**विशू** : तुम्हीच ठेवायला दिलेलं, सुरक्षित राहावं म्हणून.

**अप्पा** : मोठे पाप झालं विश्या माझ्याकडून.

**विशू** : पाप, कसलं पाप?

**अप्पा** : अरे त्या पोरीवर की रे मी आरोप केला, हे...हे घड्याळ चोरल्याचा. रडत ओरडत गेली रे निघून बिचारी.

**विशू** : अहो पण, अप्पा, त्याला खूप दिवस झाले.

**अप्पा** : काय सांगतोस... अरे आत्ताची की रे ही गोष्ट... तू येण्याआधीची.

**विशू** : खरंय, मी यायच्या अगोदरचीच. पण बरेच दिवस झाले त्याला. कंपनीच्या कामासाठी मी दोन दिवस बाहेर काय गेलो तर तुम्ही त्या मुलीला घालवली. असो. पण तेव्हापासून कोणी हेल्परच नाही मिळत आहे तुमच्यासाठी. म्हणून मग मीच.

**अप्पा** : असं म्हणतोस? पण मग मला असं का...

**विशू** : बरं. असू दे. जेवा आता. मला मीटिंग अटेंड करायची आहे. अर्धवट सोडून आलोय.

पण तुम्हाला लवकरच नवीन मदतनीस...

**अप्पा** : नकोय... कोणीही नकोय.

**विशू** : बघू ते नंतर. आता जेवा न् झोपा. लागलं काही तर हाक मारा... येतो. (निघून जातो. अप्पा जेवायला लागणार तोच पुन्हा अनिरुद्ध येतो.)

**अनिरुद्ध** : वा मज्जाय. परत परत गिळताय.

**अप्पा** : दिवसभरात आत्ता पहिल्यांदाच जेवतोय. तू काय नजर ठेवायला आलायस?

**अनिरुद्ध** : तुमची खबरबात घ्यायला. च्यायला ही बटाट्याची भाजी कधी केली... तुमच्या पानात कशी काय?

**अप्पा** : तुझ्याच बायकोने केलीय... तुलाच माहीत...

**अनिरुद्ध** : मला एवढं माहितेय की आज जान्हवीने बटाट्याची भाजी केलेली नाही. ही तुम्ही कोणाकडून तरी भीक मागून आणलेली आहे.

**अप्पा** : काय बोलतोस?

**अनिरुद्ध** : मग काय, तुम्ही ताळतंत्र सोडलंय. जणू काही आम्ही तुम्हाला जेवायलाच घालत नाही. कोणाकडूनही भीक मागून आणता... माधुकरी मागता... आता वारही लावाल. अगदी लाज लावताय. अशानं लोक शेण घालतील आमच्या तोंडात.

**अप्पा** : अरे, पण मी...

(संगीत. अनिरुद्ध बडबडत असतानाच अंधार. प्रवेश दुसरा समाप्त.)

## अंक पहिला
## प्रवेश तिसरा

(कसला तरी गहन, गंभीर आणि गूढ प्रकाश. अप्पा काहीसे चाचपडत इकडे तिकडे फिरतायत. जणू काही अंधारात वाट शोधत आहेत. कुठेतरी एकदम अडखळतात.)

**अप्पा** : आं... काहीतरी लागलं वाटतं पायाला. ठेच लागली बहुतेक. चांगलीच इजा झालेली दिसतेय्.. पन्नास वेळा सांगितलेय की वाटेत काही टाकू नका. काही दिसत नाहीये. किती किट्ट काळोख हा. (खाली वाकून हाताने चाचपडून बघतात.) अरेच्चा, मला इथं काहीच जाणवत नाहीये. वाटलं होतं हातोडी पडली असेल वाटेत. कावेरी... कावेरी हातोडी उचललीस का गं? कावेरी... कावेरी कुठे आहेस तू? कावेरी (आर्त टाहो. अचानक त्यांच्या डोळ्यांवर विजेरीचा प्रकाश येतो. डोळे दिपल्यासारखे ते डोळ्यांवर हात ठेवतात.) क... कोण आहे? (अनिरुद्ध येतो.)

**अनिरुद्ध** : कोण असणार अप्पा? असं काय करताय भांबवल्यासारखं. आपण दोघेच तर आहोत तर माझ्याशिवाय दुसरं असणारे कोण?

**अप्पा** : (डोळे किलकिले करत) पण तू...तू... कोण?

**अनिरुद्ध** : कमाल करता अप्पा... मी तुमचा लाडका मुलगा...शेंडेफळ... अनिरुद्ध.

**अप्पा** : अरे, डोळे दिपल्यामुळे नं दिसला नाहीस नीट.

**अनिरुद्ध** : म्हातारे झालात तुम्ही, अप्पा.

**अप्पा** : (हसत) म्हातारा असेल तुझा बाप.

**अनिरुद्ध** : (हसत) खरंच... म्हातारा झालाय माझा बाप. ठाई ठाई विसरतोय. आपण दोघेच बाहेर पडलोय, हेही विसरतोय. मी तुमचा मुलगा आहे हे विसरताय.

**अप्पा** : नाही रे... सांगितलं ना ते अंधारात एकदम प्रकाशझोत आल्यामुळे.

**अनिरुद्ध** : पण माझा आवाज, तोही विसरलात... विसरायला होतंय तुम्हाला.

**अप्पा** : आता इथं परत तो विषय नको, बरं का.. तुम्ही म्हातारे झालात. तुम्हाला मदतीची गरज आहे.

**अनिरुद्ध** : पण खरंच तुम्ही का नाकारताय मदतनीस?

**अप्पा** : अरे, तुम्ही त्या पोरींना आणून बसवता. त्यांची उमलण्याची वयं. कंटाळतात त्या आम्हा म्हाताऱ्यांच्या सहवासात.

**अनिरुद्ध** : बघा, कबूल करताय, तुम्ही म्हातारे आहात हे.

**अप्पा** : पण टणक आहे अजूनही. मुद्दा असा की, माझी भाषा त्या मुलींना कळत नाही आणि त्यांची मला. अवघड असतं दोघांसाठीही एकमेकांसोबत राहणं. शिवाय त्या कुठून आलेल्या... कुठे राहतात... त्यांच्यावरचे संस्कार... चोरट्याही असू शकतात.

**अनिरुद्ध** : बास आता हे, अप्पा. आत्तापर्यंत एकाही मुलीनं आपल्या घरातली काडीसुद्धा उचलून नेलेली नाही.

**अप्पा** : खरोखर, या मुली इकडची काडीही तिकडं करत नाहीत बाबा, बरोबर आहे तुझं.

**अनिरुद्ध** : तुमची या मुलींबद्दल एवढी तक्रार का? कधी त्यांना चोरट्या म्हणता, कधी कामचुकार. बिचाऱ्या राबत असायच्या. तुमचं सगळं खाणंपिणं, कपडे बदलणं, ठाकीत करत असत. शिवाय तुम्ही त्यांच्यावर ज्या गोष्टी चोरल्याचे आरोप लावलेत, त्या गोष्टी घरातच इकडे तिकडे, तुम्हीच कुठेतरी दुसरीकडे ठेवता आणि नंतर विसरून जाता.

**अप्पा** : (सुस्कारा) खरंय रे, बाबा (हात वर करत) आता हे घड्याळ... किती बोललो याच्यावरून त्या... हिला ... काय नाव तिचं... असो... पण मिळालं भलतीकडेच. म्हणून आता कायम मनगटावर बांधून ठेवतो. हे बघ (बघतात), किती वाजलेत बरं? विश्या, जरा प्रकाश टाक बरं तुझ्या विजेरीचा यावर.

**अनिरुद्ध** : आता हा विश्या कोण? तुम्ही कोणाला काहीही म्हणता.

**अप्पा** : बरं बरं... अनिरुद्धराव, जरा माझ्या घड्याळावर प्रकाश टाकता का? किती वाजलेत बघायचंय. (तो त्यांच्या हातावर प्रकाश टाकतो. ते बघतात.) अरे बापरे... बारा वाजलेत, अनू... एवढी रात्र झाली का रे?

**अनिरुद्ध** : (स्वतःचं घड्याळ बघत) छे, बारा कुठले वाजतायत... अजून खूप अवकाश आहे. तुमच्यासारखंच तुमचं घड्याळ... तुम्ही काहीही बोलता, ते काहीही वेळ दाखवतं.

**अप्पा** : (कानाला घड्याळ लावत) अरे, बंद पडलंय ते. (डोळे बारीक करून बघतात.) हे काय सेकंद काटा एकाच जागी ठप्प आहे. (कपाळाला हात लावतात.) अरे देवा, बिघडलं वाटतं हे. आता कुठे दुरुस्त करून मिळणार? इतकं जुनं घड्याळ... कावेरी... तुझ्या

आईने दिलेलं.

**अनिरुद्ध** : माहितीये. माझ्या बारशाच्या वेळेला. पाठ झालंय.. चावी मारलीये का त्याला... किती दिवस झाले?

**अप्पा** : किल्ली तर मी नियमित पिळतो. पण अरे... बरोबर. बऱ्याच दिवसांत दिलेली नाही. सापडतच नव्हतं ना ते. मिळाल्यावर तसेच घालून ठेवलंय हातात. (घड्याळ काढून किल्ली देऊ बघतात. पण जमत नाही. घड्याळ खाली पडतं.) अरे देवा... विश्या...

**अनिरुद्ध** : मी अनिरुद्ध... अनू.. शोधतो.

**अप्पा** : पडून फुटलं नसलं म्हणजे मिळवली.

**अनिरुद्ध** : खाली वाळूय् सगळी अप्पा. म्हणून फुटणार नाही. मात्र वाळूत मिसळून खाली जाऊन गडप झालं नसलं पाहिजे. (बॅटरीचा झोत खालती टाकतो.)

**अप्पा** : मिळालं?

**अरुिद्ध** : (बॅटरी फिरवत) शोधतोय, अप्पा.

**अप्पा** : बघ रे, लवकर.

**अनिरुद्ध** : तेच करतोय. तुम्ही गप्प राहा बरं जरा. (बॅटरीचा झोत इकडे तिकडे फिरवतो.) मिळालं... मिळालं.

**अप्पा** : (पुढे सरकत) बघू बघू.

**अनिरुद्ध** : मी बघतोय ना... तुम्ही आता एका जागी शांत उभे राहा. (खाली वाकून घड्याळ उचलतो. त्याला किल्ली देतो आणि अप्पांकडे परत करतो.) घ्या... सांभाळा.

**अप्पा** : (हातावर घड्याळ बांधतात.) धन्यवाद.

**अनिरुद्ध** : आता तरी मान्य करा, तुम्हाला मदतीची गरज आहे.

**अप्पा** : अजिबात नाही. तुला चटकन ओळखलं नाही, हे घड्याळही खाली पडले, ते मी भांबावून गेलोय म्हणून. कोणीही जाईल. कसलं वातावरण आहे हे. भयाण, घनगर्द काळोख. भणाण सुटलेला वारा... कुणीही भांबावून जाईल, मी गेलो, त्यात नवल ते काय. पण याचा अर्थ मला कोणाची मदत हवी असा होत नाही. त्या नटमोगऱ्या असल्या परिस्थितीत काय मदत करणार? त्यांनाच मदत करावी लागेल.

**अनिरुद्ध** : तुम्हाला त्या मुलींवर राग असेल तर एखादा पुरुषमाणूस ठेवू तुमचा मदतनीस म्हणून.

**अप्पा** : वन्स अँड फायनल बजावतोय. मला मदतनीस म्हणून कोणीही नकोय. माझा मी स्वतंत्र आहे माझं मला सांभाळायला.

**अनिरुद्ध** : पण त्यामुळे तुम्ही आम्हाला अडकवून ठेवताय ना. मला आणि जान्हवीला. तुमच्या या असल्या स्वभावामुळे आम्हाला दोघांना आलटून पालटून वर्क फ्रॉम होम करावे लागते. आमच्या प्रोग्रेसला तुम्ही अडथळा आणताय.

**अप्पा** : मग करा दूर तुमच्या मार्गातला हा अडथळा, व्हा प्रगत. सोडा मला एकटे.

**अनिरुद्ध** : एकटे? काय दिवे लावता ते दिसलंच की. त्या दिवशी फक्त अर्ध्या तासासाठी तुम्हाला एकटं ठेवून गेलो तर चहाचं भांडं गॅसवर ठेवून, गॅसचं बटन चालू करून गॅस पेटवायचा मात्र विसरलात. चहा करायचासुद्धा विसरलात. परत आलो तर हा गॅसचा वास

पसरलेला. वेळच्या वेळी लक्षात आलं म्हणून बरं. नाहीतर अनर्थ झाला असता.

**अप्पा** : मोकळे झालो असतो आपण सगळेच.

**अनिरनुद्ध** : तुमचं ठीक आहे हो. तुम्ही मरायला मोकळे आहात. पण आम्हाला जगायचंय् अजून... आमचं करियर व्हायचंय... स्वातीला मोठं करायचंय.

**अप्पा** : तिलाही तोडलीच आहेत नं माझ्यापासून... शिक्षणाच्या नावाखाली कुठे टाकलंयत तिला कोणास ठाऊक?

**अनिरुद्ध** : एक नंबरची इन्स्टिट्यूट आहे तिची. छान निवांत शिकेल. घरातल्या असल्या वातावरणाचा परिणाम नकोय तिच्यावर व्हायला. शिवाय कसला धोकाही नाही.

**अप्पा** : धोका, धोका. एक दिवस गॅस चालू राहिला हे किती दिवस उगाळणार आहेस? तुमच्या हातून होत नाही का असं? ती जान्हवी गॅसवर दूध ठेवून मोबाईल बघत बसते. तिकडे ते दूध उतू जाऊन गॅस विझतो तरी तिच्या लक्षात येत नाही. गुपचूप यऊन गॅस बंद करताना कित्येक वेळा मी तुला पाहिलंय. तेव्हा नसतो का धोका?

**अनिरुद्ध** : तुमचं म्हणणं काय आहे?

**अप्पा** : मला एकटं सोडा.तुम्हाला माझी अडचण होत असेल. तुमच्या प्रगतीत मी अडथळा होत असेन... तर तुम्ही निघून जा.. मी राहीन एकटाच्या एकटा. माझ्या माझ्या घरात.

**अनिरुद्ध** : ठीके. बघूच यात आपण. घरात एकटं राहायच्या अगोदर आधी इथं एकटे राहून दाखवा.

**अप्पा** : म्हणजे हे घर नाही? कुठे घेऊन आलायस तू मला?

**अनिरुद्ध** : किट्ट काळोखात दिसत नसेल, पण समुद्राची गाज तर ऐकू येत असेल ? का बहिरेपणामुळे तोही आवाज ऐकू येत नाही? छे, छे, पण तुम्ही बहिरे कसे असाल? तुम्ही कुठे म्हातारे आहात? तेव्हा हे युवका, तरुण माणसा, बस आता इथं एकटा... रौद्र समुद्राचा आवाज ऐकत, भणाणता वारा अंगावर घेत.. मी चाललो.

**अप्पा** : अरे पण मुर्दाडा, नेमके आलोय कुठे आपण?

**अनिरुद्ध** : तुम्हालाच या समुद्रातल्या आतल्या बेटावर यायचं होतं नं? गेले कित्येक दिवस पिच्छा पुरवून पुरवून वात आणला होतात अगदी. आईसोबत यायचात नं तुम्ही... तुमच्या तरुणपणात... म्हणून घेऊन आलोय.

**अप्पा** : अरे, पण मला दिवसाउजेडी यायचं होतं रे इथं. ही घनदाट रात्र, हा किर्र अंधार.

**अनिरुद्ध** : मला वेळ होणार तेव्हाच आणणार ना मी तुम्हाला इथं? फेरी, प्लेन, हेलिकॉप्टर फक्त संध्याकाळीच असतात. (घड्याळाकडे बघतो.)चला,शेवटच्या फेरीची वेळ झाली. मला जायला हवं.

**अप्पा** : आणि मी?

**अनिरुद्ध** : तुम्ही राहा इथेच. घ्या हा अनुभव. पटलं तर कायमचे इथे राहा. नाही जमलं तर सकाळी या फेरीबोटीने परत. जरा अनुभवा एकटेपण.

**अप्पा** : अरे, पण मला घरात एकटं राहायचे रे. कावेरीनं आणि मी उभारलेलं ते घरटं... तिच्या मायेची, कष्टाची ऊब आहे त्या घरात.

**अनिरुद्ध** : इथंही येतच होतात ना तुम्ही दोघं. मग आईच्या त्या आठवणींनी ऊब असेल इथेही तुमच्यासोबत.

**अप्पा** : असं नको रे वागू राक्षसासारखा. येतो मी तुझ्यासोबत परत. विमानानं... हेलिकॉप्टरनं.

**अनिरुद्ध** : एकच रिटर्न तिकीट काढलंय मी... माझ्यापुरतं. तुमचं सिंगल काढलेलं. तुम्हाला येताच येणार नाही.

**अप्पा** : का असं केलंस तू?

**अनिरुद्ध** : तुम्हीच बोललेला. या बेटावर एक रात्र काढायची आहे म्हणून. मग एक वेळचंच तिकीट काढलं तुमचं. तसंही तुमचं दोन्ही वेळचं हेलिकॉप्टरचं तिकीट मला परवडणारं नाही. आता माझी वेळ भरत आली. तुम्ही बसा त्या झाडाच्या बुंध्याशी. ही पिशवी. (एक पिशवी पुढे करतो. अप्पा हात पुढे करत नाहीत. हा ती पिशवी भिरकावून देतो.) ती पिशवी तिथे ठेवलीये. त्यात बिस्किटं, सुकामेवा आणि पाणी ठेवलंय. भूक लागली तर खा. पांघरूण ठेवलंय. थंडी वाजली तर पांघरा.

**अप्पा** : वारा घोंघावतोय. तुफान येऊ घातलंय. मला अशा वातावरणात सोडून नेऊ नकोस, रे पोरा.

**अनिरुद्ध** : अप्पा, वादळ तर तुम्ही आहात. आमचं घर या वादळात कोलमडून पडायच्या आत तुम्हाला  दूर जायला पाहिजे. तुफानाची दिशा बदलायला हवी.

**अप्पा** : मी बदलेन. तुमच्यासाठी म्हणेन, मी थकलोय. तुफान आता म्हातारं झालंय. पडून राहीन मी माझ्या घरात... पंख मिटून... घेऊन जा मला.

**अनिरुद्ध** : उद्या या तुमचे तुम्ही (तरतरा निघून जातो. हे विंगेपाशी त्याच्या मागोमाग जाऊ बघतात, पण त्यांना अंधारात काही जाता येत नाही. धडपडून पडतात.)

**अप्पा** : (पडता पडता) अनिरुद्ध, अनू (विंगेतून मुलीच्या हसण्याचा आवाज. अप्पा घाबरतात. धडपडत उठून बसतात. कसेबसे खुरडत कोपऱ्यात जातात. त्यांच्या हाताला पिशवी लागते. चाचपडत त्यातली बॅटरी बाहेर काढतात. परत हसण्याचा आवाज.) क... कोण आहे?

**आवाज** : म... मी आहे.
(पायांचा आवाज. अप्पा तिकडे बॅटरीचा झोत टाकतात. दुसऱ्या प्रवेशातील त्यांची मदतनीस मुलगी, श्रद्धा प्रवेश करते. आता ती एकदम बदललेली आहे. फ्रॉक घातला आहे तिने. उत्फुल्ल, प्रसन्न नाचरी मुलगी.)

**मुलगी** : मी आहे अप्पा.

**अप्पा** : त...तू... म... माफ कर मला...श्रद्धा (ते तिला लोटांगण घालू बघतात. जमत नाही. हातातली बॅटरी सटकते. घरंगळत तिच्या पायाशी येते. बॅटरी उचलून ती अप्पांपाशी. अप्पा घाबरून अजून मागे सरकतात. ती जाऊन त्यांच्यापाशी बसते. त्यांना जवळ घेते. ते आक्रसलेले.)

**मुलगी** : असं काय करताय, अप्पा आजोबा. एवढे का घाबरताय? अहो मी तुमची नात, स्वाती. भेटायला आले तुम्हाला.

**अप्पा** : त...तू... खरंच स्वाती आहेस?

**स्वाती** : हो... पटत नाहीये? सॉरी अप्पा, खूप बिझी होते प्रोजेक्ट्स वगैरेमध्ये. भेटताच आलं नाही तुम्हाला. इट्स नॅचरल की तुम्ही मला नाही ओळखलंत.

**अप्पा** : तू रागावली नाहीस, तुला मी ओळखलं नाही म्हणून?

**स्वाती** : वाईट वाटलं थोडं. पण राग नाही आला. चूक माझीच आहे. खूप दिवसांत दिसले नाही मी तुम्हाला. माझ्यातही खूप फरक पडलाय... कसे ओळखाल?

**अप्पा** : पण आत्ता तू इथं कशी?

**स्वाती** : वाटलं भेटावंसं, आले उठून.

**अप्पा** : पण तुला वेळ नसतो म्हणालीस. त्यात हे असं वेगळं बेट, विचित्र वेळ, जमलं कसं तुला यायचं, खरं खरं सांग.

**स्वाती** : तुम्ही कळवळून मारलेली हाक माझ्यापर्यंत पोचली.

**अप्पा** : पण मी तुला...

**स्वाती** : तुम्ही बाबाला हाक मारत होता. तो ढुंकून बघत नव्हता तुमच्याकडे. त्याने इग्नोर मारलं. पण त्याने तसं करायला नको होतं. तुम्हीच म्हणता ना, बापाची कामं पोरांनी पार पाडावीत, म्हणून मग मी आले.

**अप्पा** : सो नाईस ऑफ यू. एवढी धावत पळत आलीस, काय देऊ तुला... या अडाणी बेटावर, अडनिड्या स्थळावर काही करूही शकत नाही तुझ्यासाठी.

**स्वाती** : तुम्ही ती कविता म्हणा, लहानपणी माझ्यासाठी म्हणायचात ती.

**अप्पा** : कुठली गं... आठवत नाही पोरी आता मला.

**स्वाती** : असं काय करता अप्पा... आठवेल... तुम्ही काही म्हातारे नाही झालेला अजून.

**अप्पा** : हो नं, हो नं... हे सांग तुझ्या बापाला.

**स्वाती** : कविता म्हणून दाखलीत तर...

**अप्पा** : थोडी हिंट दे... काहीतरी क्लू... एखादं वाक्य

**स्वाती** : ती तुमच्या आवडत्या नाटकातील... नटसम्राट... ते तुमच्यासारखे आजोबा माझ्यासारख्या नातीसाठी म्हणतात ती.

**अप्पा** : अरेच्चा, ती होय... ऐक की...म्हणतो.
सूर म्हणतो साथ दे, दिवा म्हणतो वात दे. उन्हामधल्या म्हाताऱ्याला फक्त तुझा हात दे.आभाळ म्हणतं सावली दे, जमीन म्हणते पाणी दे. माळावरच्या म्हाताऱ्याला फक्त तुझी गाणी दे. (एकदम गप्प बसतात.)

**स्वाती** : अप्पा, म्हणा नं पुढे, गप्प का बसलात?

**अप्पा** : नको गं पोरी, सगळी उमेद सरली. बघ, आत्ता इथं तुझी साथ आहे. (बॅटरी पेटवतो) या दिव्यात वात आहे.अंगावर येईल एवढी सावली, हा प्रचंड अंधार आहे... काहीही उपयोग नसलेलं... घाबरवणारं प्रचंड पाणी समोर आहे. म्हाताऱ्याला माळावर टाकून, फेकून जग निघून गेलंय... आता कसली गाणी म्हणायची आणि मागायची?

**स्वाती** : कावळा म्हणतो पंख दे, चिमणी म्हणते खोपा दे
माझ्यासारख्या आजोबाला फक्त तुझा पापा दे
आजोबा, अप्पा... मी आहे नं... मग का उदास होता?

**अप्पा** : तू... तूच आहेस का याचीही खात्री नाही, गं पोरी.

**स्वाती** : काय बोलताय अप्पा, काय होतंय तुम्हाला?

**अप्पा** : तो काळराक्षस सूड उगवतोय. प्रतिमांची सरमिसळ होतीये डोक्यात. खरं सांगू, तू स्वाती आहेस की श्रद्धा? माझ्यावर सूड उगवायला आलीस आणि माझी कीव करून त्यातला विकृत आनंद घेते आहेस?

**स्वाती** : मगाचपासून तुम्ही श्रद्धा म्हणताय... आहे कोण ही श्रद्धा?

**अप्पा** : होती, तुझ्यासारखीच एक मुलगी होती. नाही नाही तू आरोप केले मी तिच्यावर. चोरीचा बालन्ट आणायचा प्रयत्न केला. मला वाटतं तू श्रद्धाच आहेस. आमहत्या केलीस तू. माझ्या आरोपांनी व्यथित होऊन आणि आता माझ्या नातीच्या, स्वातीच्या नावानं येऊन माझ्या अवस्थेची टर उडवते आहेस.

**स्वाती** : काहीही बोलताय. तुम्ही मला ब्लेम करताय. पण तरी आयडिया भारी आहे. आत्महत्या... सुसाईड... जाते मी...सुसाईड करून मोकळी होते.

**अप्पा** : आता मूर्खासारखं तू बोलते आहेस.

**स्वाती** : नाही अप्पा, आजोबा... यू आर ग्रेट. मस्त आयडिया दिलीत. छान वादळ आहे. खवळलेला समुद्र आहे. धिस इज द टेम्पटिंग टेम्पेस्ट... आय एम गोइंग...बाय अप्पा (निघून जाते.)

**अप्पा** : अगं, पोरी, थांब, थांब, तूच आहेस, मान्य आहे मला... जाऊ नकोस आपल्या आजोबाला सोडून (पाण्यात काहीतरी पडल्याचा आवाज) काय केलंस तू हे स्वाती (अचानक एक आवाज येतो.)

**आवाज** : चला, तुफानानं अजून एक बळी घेतला. अभिनंदन. (डोकं वर उचलून बघतो. कावेरी प्रवेश करते.)

**अप्पा** : जान्हवी.

**कावेरी** : बायकोलाही विसरलात? जान्हवी कधी साडी नेसते का? ती कायम ड्रेसमध्ये.

**अप्पा** : सारखी तीच समोर असते म्हणून मला प्रत्येक बाईत तीच दिसते.

**कावरेरी** : त्यामुळे मग मलाही विसरलात? सगळे पुरुष सारखेच. बायांचा फक्त बळी घेतात. मग बायको असो, नाहीतर नात.

**अप्पा** : मी स्वातीला थांबवायचा खूप प्रयत्न केला कावेरी.

**कावेरी** : पण प्रवृत्तही तुम्हीच केलंत.

**अप्पा** : तुला तर मी वाचवण्यासाठी धडपडत होतो.

**कावेरी** : आणि अजून यातना देत होतात. तुम्हाला कळत कसं नव्हतं की मरण हीच माझी सुटका आहे. हट्ट धरून माझ्यावर उपचार करत बसलात. येणारं मरण तर टळलं नाहीच. मात्र त्याची रखडत रखडत वाट पाहावी लागली.खूप यातना भोगाव्या लागल्या.

**अप्पा** : मला तू हवी होतीस कावेरी. तुझ्यासाठी मी...

**कावेरी** : तुम्ही केलंत फक्त स्वतःसाठी. बायकोसाठी मी सगळं केलं हा अहंकार कुरवळायचा होता तुम्हाला. माझ्यासाठी करायचं असतं तर मला मरणाच्या स्वाधीन करून यातनांतून सुटका करायची होती माझी. पण नाही. त्याला धाडस लागतं. भित्रे, भेकड आहात तुम्ही.

**अप्प** : मग आता मी काय करू?

**कावेरी** : स्वतःच्या अवस्थेला स्वीकारा. जगण्याचा मोह सोडा. माझ्याकडे माझ्या जगात या आता. पुरे झालं असलं जगणं.

**अप्पा** : नाही शक्य मला ते... मला जगायचंय् अजून.

**कावेरी** : मग जगा... जगतच राहा. (तरातरा निघून जाते.)

**अप्पा** : (तिच्या पाठोपाठ) कावेरी.. कोवरी... मला सोडून जाऊ नकोस गं. (वर तोंड करून ओरडतो) कोणी आहे का? मला इथून बाहेर काढा...प्लीज... या विचित्र ठिकाणी मी अडकून पडलोय... मला माझ्या घरी पोचवा... हेल्प मी. मदत करा मला. (हातात तोंड खुपसून ओक्साबोक्शी रडू लागतात. तिथंच बसतात. अचानक लाईटच्या बटनाचा आवाज. साधा प्रकाश. अप्पांची खोली. अप्पा गुडघ्यात मान खुपसून घाबरून बसलेत. विश्वंभर कमरेवर हात ठेवून उभा आहे.)

**अप्पा** : (मान वर करून बघत) मला... मला इथे टाकून जाऊ नका हो... या अज्ञात बेटावर.. मला घरी घेऊन जा... पाया पडतो मी तुमच्या.

**विश्वंभर** : अप्पा, तुम्ही घरीच आहात.

**अप्पा** : त...तू...तू..

**विश्वंभर** : मी विश्वंभर

**अप्पा** : देवासारखा धावलास पोरा, कावेरी... कावेरी कुठंय?

**विश्वंभर** : ती गेली केव्हाच निघून.

**अप्पा** : मला हात दे रे जरा पोरा, म... मला उठताच येत नाही.

**विश्वंभर** : तुम्ही इथं काय करताय... एवढ्या रात्रीचे... तुमच्या बेडरूममध्ये झोपायचं सोडून (त्यांच्याकडे जाऊन त्यांना उठवतो.) आणि हे काय कपडे ओले कसे झाले एवढे.

**अप्पा** : (कसंबसं हसत) मी नाही रे केले ओले. घाबरलो होतो पण मुतलो नाही पायजम्यात. ते...ते... बेटावर पाणी साचलं होतं नं... भरतीचं, त्यातच बसलो मी...अनिरुद्ध सोडून गेला मला तिथं... कावेरीही टाकून गेली. तू आला नसतास तर

**विश्वंभर** : बरं असू दे... चला बदलू या कपडे... मग झोपा.

**अप्पा** : कुठं?

**विश्वंभर** : तिकडं...बेडरूममध्ये...बेडवर.

**अप्पा** : नको, नको, तिकडं तो असेल दैत्य, अनिरुद्ध.

**विश्वंभर** : अप्पा, काळजी करू नका, मी आहे ना, चला.

**अप्पा** : तू...म.. पुरता ओळखत नाहीस माझ्या मुलाला, अनूला... तुलाही जुमानणार नाही तो... माझा मुलगाय.

**विश्वंभर** : (स्फोट होत) अप्पा, तुमचा मुलगा मी आहे, थोरला, विश्वंभर. अनिरुद्ध तुमचा धाकटा मुलगा... होता. माझी आई... कावेरी... तुमची बायको... होती. पण ते दोघं आता अस्तित्वात नाहीत. ते गेले.. मेले. मेलेल्यांच्या आठवणी काढण्यापेक्षा जिवंत माणसांची कदर करा... चला.. आवरू या.

**अप्पा** : (अविश्वास) तू...तू..म...

**विश्वंभर** : रात्र बरीच झालीये...अप्पा

(दोघांवर प्रकाश. दोघे स्तब्ध. संगीत. हळूहळू पडदा. प्रवेश तिसरा, अंक पहिला समाप्त.)

## अंक दुसरा
## प्रवेश पहिला

(पडदा उघडतो. खोली तीच. पण काहीशी वेगळी. फर्निचरमध्ये थोडाफार फेरफार. खोलीतले काही गठ्ठे कमी झालेत. प्रत्येक प्रवेशागणिक सामान कमीच होत जाणार आहे. फक्त एक हॉस्पिटलसारखा बेड मात्र वाढलाय आता तिथे. प्रकाश येतो तेव्हा अस्वस्थ विश्वंभर आपल्याला दिसतो. तो फेऱ्या मारतोय. बेल वाजते. जाऊन दार उघडतो. ड्रेसमधली कावेरी येते.)

**बाई** : का बोलावलंस, विश्वंभर? टेन्शनमध्ये दिसतोयस.

**विश्वंभर** : अप्पा. परवाच्या प्रकाराने तर मी हादरूनच गेलोय, सुकन्या.

**सुकन्या** : फार उशीर झालाय. त्यांच्यापायी आपल्या चांगल्या करिअरचं तू वाटोळं मात्र करून घेतोयस. तू परतच यायला नको होतंस.

**विश्वंभर** : प्लीज. परत तोच विषय आणि तेच तेच बोलू नकोस गं. त्यावेळी कशी परिस्थिती होती. तेही तुला चांगलंच माहिती आहे. आई गेली तेव्हा कंडिशन एवढी बेकार नव्हती. ठीक होते बाबा. पण मग अनूला जान्हवी सोडून गेली, स्वातीला घेऊन. अनिरुद्ध दारूत पूर्ण बुडाला आणि खलास झाला. त्यामुळे बाबांचं डोकं अजून अजून बिघडत गेलं.

**सुकन्या** : डोन्ट टॉक लाईक अ लेमॅन. हा डिमेंशिया आहे. आघाताने मनावर होणारा परिणाम नव्हे. तुला लवकरच काहीतरी डिसिजन घ्यायलाच लागेल.

**विश्वंभर** : (सुस्कारा) होय, घ्यायला लागणारच आहे. कदाचित... कदाचित मला..

**सुकन्या** : तुला... तुला काय... जावं लागतंय का परत? विशू, अरे तुला त्यांना...

**विश्वंभर** : ऐक ना.. मी काय म्हणतो, गिव्ह हिम अ फेअर चान्स. आपण आधी परत एकदा बाईच ठेवून बघू नं...पूर्ण वेळ.

**सुकन्या** : अरे, ते कुठे टिकू देतात बाईला. किती पळवून लावल्या त्यांनी.

**विश्वंभर** : परत एकीला बोलावलंय. ती कळवणारे कधी येतेय ती...

**सुकन्या** : विशू, सगळ्यात महत्त्वाचं आहे अप्पांनी तिला ॲक्सेप्ट करणं. पण ते बाई ठेवणं, मदतनीस राखणं पत्करतील का नाही, शंकाय् मला. हट्टीपणा वाढलाय त्यांचा. त्यात तुझी सवय झालीय् त्यांना. मला काही होप्स नाहीत.

**विश्वंभर** : पण मला आहे अजून आशा शिल्लक. ठेवायलाच पाहिजे. परिस्थिती सुधारेल; किमान या वेळेला तरी असं वाटतंय मला, कारण माझी ती गरज आहे. खूप बिकट आहे सध्या परिस्थिती. ते आता बऱ्याचदा मलाही ओळखत नाहीत.

**सुकन्या** : एवढा का निराश झालायस, विशू?

**विश्वंभर** : कात्रीत सापडलोय मी. मदतनीस–मदत अप्पा पूर्ण झिडकारतात. मला ओळखत नसले तरी माझ्यावर अवलंबून राहतात. पण कंपनीने मला परवा अल्टिमेटम दिलाय. ऑस्ट्रियात पोस्टिंग केलंय माझं. जॉब सोडू शकत नाहीये मी. कॉन्ट्रॅक्ट आहे तसं. काय, करू काय मी?

**सुकन्या** : योग्य निर्णय घे.

**विश्रवंभर** : बरोबर. योग्य निर्णय. जसं इकडे यायलाच नको होतं. नाही का? पण खरंतर तिकडं जायलाच नको होतं. पण त्यावेळी अनिरुद्धचं प्रेमप्रकरण, दारूप्रकरण, ही सगळी प्रकरणं बघितली. त्यातच आईच्या आजाराची सुरुवातही. तिडीकच आली सगळ्याची.

**सुकन्या** : म्हणून पळून गेलास?

**विश्वंभर** : हो. आईच्या आजारपणाने घाबरलेले अप्पा तिला साथ देण्याऐवजी सतत चिडचिड करत असत. त्यात नुकतंच लग्न झालं असूनही सतत भांडत अनिरुद्ध. नको ते लग्न आणि नको तो संसार म्हणून गेलो निघून. पण यावं लागलंच परत आणि आता अशी ही वीयर्ड सिच्युएशन.

**सुकन्या** : तुला धीट व्हायलाच लागेल.

**विश्वंभर** : पण इथं धीरच होत नाही. अप्पा समोर आले की गळपटायला होतं. तिकडं गेलो की त्रयस्थपणे निर्णय घेता येईल.... पण तोवर...

**सुकन्या** : बाई ठेवू या... मुलगी, मदतनीस... ओके. तू आजचं मरण उद्यावर ढकलतोयस... ठीक आहे... मी मदत करेन तुला.

**विश्वंभर** : थँक्यू, सुकन्या.

**सुकन्या** : अप्पांसाठी तुला न्, तुझ्यासाठी मला मनाविरुद्ध गोष्टी करायलाच लागतायत. पण कधी ना कधीतरी त्यांना नर्सिंग होममध्ये ॲडमिट करावेच लागेल. (अप्पा येतात.)

**विश्वंभर** : ओके. मग ठरलं. मी इथं असेपर्यंत सगळी तजवीज करतो. मग ऑस्ट्रियाला गेल्यावर तू सांभाळ पुढचं काही दिवस... मग ठरवू पुढचं.

**सुकन्या** : हो, ठरवू. २५ वर्षांनंतर. तू, मी, अप्पा सगळ्यांसाठीच ठरवेल कोणीतरी. (निघते.)

**विश्वंभर** : सुकन्या.

(त्याच्याकडे रोखून बघू लागते. अंधार. अंक दुसरा, प्रवेश पहिला समाप्त.)

## अंक दुसरा
## प्रवेश दुसरा

(प्रकाश. तीच खोली. आता त्याच्यातली अडगळ बरीचशी कमी झालेली. अप्पा सगळ्या खोलीभर काहीतरी शोधत फिरतायत. अचानक पलंगासमोर येऊन थबकून उभे राहतात. त्याकडे आश्चर्याने बघतात. परत काहीतरी शोधत फिरायला लागतात. विश्वंभर घाईघाईने येतो.)

**विश्वंभर** : अप्पा, काय बघताय?

**सुकन्या** : मला तुझ्या भावना कळतायत. पण त्या दुसऱ्या पर्यायाचा आता तू विचार करायलाच हवास. नव्हे निर्णय घ्यायला पाहिजेस. ते पूर्णपणे हरवलेत. त्यांचा मेंदू सगळा कामातून गेलाय.

**विश्वंभर** : असं नको बोलूस.

**सुकन्या** : त्यांना घरच्या घरी नाही सांभाळू शकत. विशेषतः तू नसताना. (अप्पा दाराशी आलेले. यांचे लक्ष नाही.)

**विश्वंभर** : मग करायचं काय?

**सुकन्या** : तुला माहितीये.

**विश्वंभर** : आरोग्यधाम.

**सुकन्या** : हो. परिहार केंद्र, नर्सिंग होम.. त्यांच्यासाठी तेच योग्य.

**विश्वंभर** : पण आजपासून ती, येईलच थोड्याच वेळात.

**सुकन्या** : हो. येणारे ती. त्या मुलीमुळे कदाचित वळणावर येतील ही गोष्टी. पण तू नसणारेस इथं. या सगळ्याचा ताण येईल तिच्यावर. तिचा चांगुलपणा गळून पडेल. हा आजारच असा आहे नं, ती कितीही कर्तव्यदक्ष असली तरी पुरे नाही पडू शकत या आजाराला. मग त्यापेक्षा... (अप्पांकडे त्यांचे लक्ष जाते. विशू त्यांच्यापाशी जातो.)

**विश्वंभर** : अप्पा, असे का उभे? या नं आत.. लवकर जागे झालात?

**अप्पा** : मला वाटलं, सकाळ झाली. नसेल तर जातो परत. झोपतो जाऊन.

**विश्वंभर** : नको, कशाला; या बसा ना इथं. आम्हाला म्हणजे मला असं वाटतं.. की ती मुलगी, विभा.. येईलच आता इथं. तर मग बघू तुमचं कसं जमतंय तिच्याशी.

**सुकन्या** : मी निघते.

**अप्पा** : मुली, थांब, माझं एक काम करशील?

**सुकन्या** : सांगा नं, अप्पा.

**अप्पा** : माझ्यासाठी खोली बघ कुठेतरी.

**विश्वंभर** : अप्पा...

**सुकन्या** : विश्वंभर, गप्प बस. ते काय म्हणतात, ऐकून घे.

**अप्पा** : तू बघच खोली. विश्वंभर चाललाच आहे बर्फ पडणाऱ्या देशात. तो बर्फ डोक्यावर घेऊन वावरायला पाहिजे मला. हे घर त्याचं. माझ्याकडून नुकसान नको व्हायला घराचं.

माझ्यासाठी एखादी छान खोली बघ. माझा मी एकटा राहीन तिथं.

**विश्वंभर** : अहो पण, अप्पा...

**सुकन्या** : एक मिनिट विशू. बरं अप्पा. मी बघते तुमच्यासाठी खोली.

**अप्पा** : ती तसली टाकलेल्या म्हाताऱ्यांसाठीची नको.

**सुकन्या** : अगदी छान खोली बघेन. त्या खोलीला एक मोठी खिडकी असेल. त्या खिडकीतून समोरचा पार्क दिसेल. (विशूची ट्यूब पेटते आहे.)

**विश्वंभर** : पार्क? फारच मस्त. एखाद्या हॉटेलच्या रूमसारखं दृश्य. अप्पांना हॉटेलमध्ये राहिल्यासारखं वाटेल.

**अप्पा** : मला हॉटेल नाही, घर हवंय.

**विश्वंभर** : या निर्णयावर आपले एकमत असलं तर बरं पडेल नाही का? खरं तर आनंदानं जर तुम्ही इथे राहायला तयार झालात तर जास्त चांगलंय. किंवा माझ्यासाठी कमी दुःखदायी होईल ते.

**अप्पा** : इतके दिवस पोसलंस की रे मला. आता अजून कशाला बापावर उपकार करतोयस. पोरी...

**सुकन्या** : आपण मधला मार्ग काढू, अप्पा. मी बघते खोली. पण तोवर तुम्ही इथे थांबा. विभा त्या मुलीची मदत घ्या. वाटलं तर खोली मिळाल्यावर तिलाही तिकडं

**विश्वंभर** : पण तिच्याशी जमलं तर इथेच थांबतील की अप्पा.

**सुकन्या** : (करुण) तुझी आशा काही सुटत नाही, विश्वंभर. अरे घरी रहाणं, असो. अप्पा, मी बघते.

**अप्पा** : लवकर, लवकर बघ गं पोरी, सोय कर माझी. (बेल वाजते) ती आली?

**विश्वंभर** : मला तरी तीच वाटतेय. (पुन्हा बेल वाजते.)

**सुकन्या** : मीच जाऊन दार उघडते आणि जाते.

**विश्वंभर** : अप्पा, तुम्ही बोला तिच्याशी, मी हिला सोडून येतो.

**सुकन्या** : अरे, कशाला?(बेल वाजतेच आहे.)

**अप्पा** : अगं.. आम्हाला दोघांना एकटं सोडायचंय आणि तुझ्याबरोबर एकटं यायचंय. (बेल वाजते. सुकन्या हसत निघून जाते.)

**विश्वंभर** : अप्पा.

**अप्पा** : हो, मी नीट वागेन तिच्याशी. दोन दिवसांची पाहुणी. कशाला वाईट वागू?

**विभावरी** : (येत) गुड मॉर्निंग.

**विश्वंभर** : मॉर्निंग. मी निघालोय; सुकन्याला सोडून तसाच जरा बाहेरची कामं करून... येईन. काही लागलं तर मला सेलवर कॉन्टॅक्ट कर. चहा थर्मासमध्ये भरून ठेवलाय. दुपारी डबे येतील. तू आणि अप्पा जेवून घ्या.

**विभावरी** : मी बघते सर, तुम्ही निघा. (विशू जातो.) काय अप्पा आजोबा, कसे आहात?

**अप्पा** : अप्पा आजोबा नको म्हणूस, स्वाती म्हणायची तसं नुसतं अप्पाच म्हण.

**विभावरी** : बरं.. अप्पा, झोप झाली का नीट?

**अप्पा** : हो.

**विभावरी** : चहा आणू का मग?

**अप्पा** : चहा मगातून आण. पण मग, आधी औषधं, औषधांची वेळ झाली आता बहुतेक.

**विभावरी** : बरं. (आत जाते. अप्पा मनगटाकडे बघतात. घड्याळ नाही. इकडेतिकडे शोधू लागतात. विभा येते. तिच्या हातात ट्रे, त्यात एक पाण्याचा ग्लास, चहाचा कप आणि औषधाची डबी आहे) अप्पा, मी सगळेच घेऊन आले. आता ओळीने घ्या. (अप्पा वळून तिच्याकडं निर्विकार मुद्रेने बघू लागतात.)

**अप्पा** : तू..

**विभावरी** : आधी पाण्यासोबत औषधं आणि मग चहा.

**अप्पा** : अनिरुद्ध, आपलं, विशू कुठंय?

**विभावरी** : बाहेर गेलेत.

**अप्पा** : इतक्या लवकर?

**विभावरी** : हो.

**अप्पा** : किती वाजले?

**विभावरी** : येणारेत ते घरी लवकर. संध्याकाळी. तुमचं जेवणखाण, औषधांची वेळ सगळं मी सांभाळेन.

**अप्पा** : का, कशासाठी? तू जरा गप्प बस बरं.

**विभावरी** : काय? काय होतंय अप्पा, चहा, गोळ्या घ्यायच्यात नं.

**अप्पा** : वेळ, वेळ झालीये का त्याची? माझं घड्याळ.. घड्याळ सापडत नाहीये. परत कुठेतरी गळपटलंय. काय करतोय मी? कसं चाललंय? ती येणारे आणि मी गलिच्छ अवतारात आहे. ती मला नको असली तरी तिच्यासमोर मला नीटच राहायला पाहिजे.

**विभावरी** : आपण एक काम करू या, तुम्ही औषध घ्या. चहा प्या. मग मी तुमचं आवरून देते. कपडे बदलू या.. मग आपण 'ति'ची फ करू.. घरातून बाहेरच निघून जाऊ. गंमतच होईल मग.. हो नं.

**अप्पा** : तू बालवाडीचा कोर्स केलायस का?

**विभावरी** : छे, हो.

**अप्पा** : मग तू माझ्याशी, एखाद्या छोट्या मुलाशी नाहीतर एखाद्या मतिमंदाशी बोलावं तसं का बोलतेस?

**विभावरी** : असं कसं करेन मी.

**अप्पा** : मग ते काय होतं? (वेडावत) 'ति'ची फ करू.. गंमतच होईल.

**विभावरी** : समजुतीचा सूर होता तो. मला एवढा खटकेलसं वाटलं नव्हतं, सॉरी.

**अप्पा** : कानांना बोचत होतं. माझ्या वयाची झाल्यावर कळेल तुला. लवकरच गाठेल तुला म्हातारपण. कोणालाच नको असतं ते. अजिबातच नको असेल तुलाही.

**विभावरी** : पुन्हा असं नाही बोलणार. सॉरी.

**अप्पा** : (नक्कल) फ च करू 'ति'ची. गंमत येईल.. असो (इकडेतिकडे बघत) काहीतरी विचित्रच वाटतंय मला सगळं. काही बदललंय का गं?

**विभावरी** : कोणास ठाऊक? तुमच्या मुलालाच विचारा.

**अप्पा** : तो.. तो लेकाचा कटच करतोय बापाविरुद्ध. पण तू मात्र मला माफ कर. मगाशी जरा मी.. बहुतेक मागच्याही वेळेला.. काही विचित्र वागलो का मी?

**विभावरी** : जाऊं द्या. चला गोळ्या घ्या.. मग आवरू या.

**अप्पा** : बघ परत तोच सूर.. मतिमंदाशी बोलण्याचा.

**विभावरी** : छे हो.

**अप्पा** : माझ्या चांगलाच लक्षात आहे. माझी स्मरणशक्ती.. कुठला तो प्राणी, ह.. हत्तीसारखी आहे अगदी (नुसतंच पाणी पिऊन टाकतो. औषधं तशीच.)

**विभावरी** : गोळ्या घ्यायच्या राहिल्या, अप्पा.

**अप्पा** : अरे हो, खरंच की.

**विभावरी** : थांबा, मी पाणी घेऊन येते.

**अप्पा** : कशाला? मला सवय आहे. हे बघ हं. (जादूगारासारख्या हालचाली.) या बघ मी गोळ्या टाकल्या तोंडात. (गोळी टाकतो तोंडात.) बघ नीट. त्यावर हा घेतला मी चहा. (चहाचा कप तोंडाला लावतो.) घेतला घुटका.. गेल्या गोळ्या.. काम तमाम. (विभा टाळ्या वाजवते) परत बालवाडी (ती जीभ चावते.)

**विभावरी** : चला, आता बाहेर जाऊया.

**अप्पा** : कशाला?

**विभावरी** : कपडे तर बदलूया.

**अप्पा** : बरं ठीक आहे. जाऊन घेऊन ये बरं तूच. माझ्या कपाटातून. चांगलासा पायजमा आणि एखादा शर्ट.

**विभावरी** : बरं. (जाते. गूढ प्रकाश. अनिरुद्ध उगवतो.)

**अनिरुद्ध** : ए म्हाताऱ्या,

**अप्पा** : अनू, अनिरुद्ध.

**अनिरुद्ध** : आता फायनल विचारतोय, असं प्रत्येकाच्या गळ्याला तात लावत असे किती दिवस काढायचा बेत आहे?

**अप्पा** : मी.. मला.. माझा..

**अनिरुद्ध** : अरे, बोल ना.. काय, प्लॅन काये तुझा.. माझं वाटोळं केलंस.. आईला खाल्लंस, आता विश्याच्या मागे लागलायस. कधीतरी समजुतीनं वागशील असं समजणं.. हा मूर्खपणाय का आमचा?

**अप्पा** : काय बोलतोयस, कशाबद्दल?

**अनिरुद्ध** : तू आणि तुझ्या वृत्तीबद्दल. (त्यांना एक चापटी मारतो.)

**अप्पा** : हे.. हे काय चाललंय..? बापावर..? हे चालणार नाही.
**अनिरुद्ध** : कुणाला, कुणाला चालणार नाही?
**अप्पा** : अर्थातच मला.
**अनिरुद्ध** : काय करशील? परत तुला फटकावलं तर काय करणारेस?
**अप्पा** : मी.. मी..
**अनिरुद्ध** : असं बकरीगत काय बेंबटतोयस..? बोल की स्पष्ट.
**अप्पा** : पलटवार करेन .. कुस्ती खेळेन तुझ्याशी.
**अनिरुद्ध** : मला उगा भरीला पाडू नको. नीट ऐक. इतरांना वैताग देणं बंद कर. म्हातारा आहेस. वयानुसार वाग. गपगुमान बस. सांगतील तसं वाग. (पुन्हा एक चापटी .)
**अप्पा** : तुला पुन्हा बजावतोय. हा आचरटपणा थांबव.
**अनिरुद्ध** : आचरटपणा तू चालवलायस. तू कुणाचंच ऐकत नाहीस. तर तुझं कोणी का ऐकावं? मी थांबवेन हे सगळं. पण तूसुद्धा.. कळलंय तुला काय ते.. नीट वाग.. नाहीतर...
**अप्पा** : काय करशील? बोल नं, काय करशील?
**अनिरुद्ध** : तुला जे वाटतंय तेच.
(हात उगारून पुढे होतो. अप्पा चेहरा झाकून घेतात. कावेरी व स्वाती येतात.)
**कावेरी** : (जरब) अनिरुद्ध, हात आवर.. नाहीतर इकडचं तोंड तिकडं करेन.
**अप्पा** : कावेरी.. स्वाती...
**अनिरुद्ध** : आई, तुला..
**कावेरी** : चुप!
**स्वाती** : बाबा, तू असं कसं...
**कावेरी** : काम झालं असेल तर नीघ इथून.
(तेवढ्यात पहिल्या अंकातल्या पहिल्या प्रवेशातला गायक आत्माराम तिथे येतो. त्याच्या हातात आता पेटी नाही. स्वाती अप्पांना बेडवर बसवते.)
**अनिरुद्ध** : या बुवा.. तुमचीच कमी होती.. पण आज एकटेच?
**आत्माराम** : म्हणजे?
**अनिरुद्ध** : तुमची ती साथीदारीण, ती पेटी कुठंय?
**आत्माराम** : आज गायला नाही, निरोप घ्यायला आलोय.
**अनिरुद्ध** : का हो, कंटाळला तुम्हीही या आमच्या म्हाताऱ्याला?
**कावेरी** : अनू...
**आत्माराम** : नाही हो. आजकाल त्यांचं मनच नसतं. गाण्यातही. मला बोलावलंही नाही त्यांनी बऱ्याच दिवसांत.
**अप्पा** : (स्वतःच्या तंद्रीत) शिशिराची कळा पसरलीये सगळ्यावर. आता पानगळीशिवाय काय उरलंय बाकी...
**स्वाती** : आजोबा...

**कावेरी** : (इकडेतिकडे बघत) थोडंसं सामान उरले बाकी.

**अनिरुद्ध** : तेही उचलून टाकूया.

**आत्माराम** : झाडून टाकू सगळी झडलेली पानं. स्वच्छ करूया सारं.. कोरं.. करकरीत...

**अप्पा** : काळसैतान, काळराक्षस..

**कावेरी** : चला हलवूया पटपट हात पाय. बुवा, म्हणा एखादं गाणं. तालावर करूया सगळी सफाई.

(आत्माराम गाऊ लागतो. बाकीचे त्याला साथ देत टाळ्या वाजवत सामान हलवू लागतात, उचलून न्यायला लागतात.)

**आत्माराम** : चढली शिशिर ऋतूची कळा, आली सृष्टीवरी अवकळा...

**कावेरी** : सुटले माघामधले सोसाट्याचे वारे, गोठले हिमाद्रीत गंगाजल की सारे...

(अप्पा बसलेला बेड सोडून उरलेले सगळे थोडेसे सामान गाण्याच्या तालावर सगळेजण घेऊन निघून जात असताना विश्वंभरच्या हाका ऐकू येतात, 'अप्पा, अप्पा'. अप्पा आपल्या तंद्रीतच बेडवर बसलेले आहेत. हळूहळू अंधार.)

(आता एक कोलाजसारखा प्रवेश. रंगमंचाचा पुढचा भाग उजळतो. सगळ्यात अगोदर उजवीकडचा कोपरा उजळेल. तिथे विश्वंभर आणि सुकन्या उभे आहेत. सुकन्या अंगावर ॲप्रन घालते आहे. विश्वंभर तिच्याकडे बघतो आहे.)

**विश्वंभर** : काय करू? मी काय करू ?

**सुकन्या** : कसलाही विचार न करता निघून जा. अप्पा आता आमच्या या परिहार केंद्रात दाखल झाले आहेत आणि त्यांची काळजी व्यवस्थित घेऊ आमच्या बाकीच्या पेशंटसारखी.

**विश्वंभर** : त्यांना तर सगळ्यातच अनिरुद्धच दिसतोय.

**सुकन्या** : ही त्यांची शेवटची लढाई आहे. त्यांची स्मरणशक्ती आणि बुद्धीची त्यांच्या आजाराबरोबर चाललेली. थोडेच दिवसांत आजार पूर्ण जिंकेल. स्मरणशक्ती नाहीशी होईल. आत्ता विझताना दिवा मोठा होतोय म्हणून ही तडफड.

**विश्वंभर** : मला त्यांना असं सोडून जाताना अपराधी वाटते.

**सुकन्या** : तू आमच्या इथला स्व-मदतगट एकदा बघून घे. सेल्फ हेल्प ग्रुपची एक मीटिंग अटेंड केल्यानंतर तुला कळेल, तुझ्यासारखे बरेच जण आहेत आणि तुझा निर्णय बरोबर आहे.

(मधला भाग उजळतो. सुकन्या तिकडे जाते. एक माणूस फोनवर बोलत येतो. तिच्याकडे फोन देऊ लागतो.)

**माणूस** : आमच्या डॉक्टरांना बोलायचे तुमच्याशी.

**सुकन्या** : येस डॉक्टर, तुम्हाला माहितीच आहे त्यांची कंडिशन. त्यांना आत्ता इथे ॲग्रेसिव्ह ट्रीटमेंट आम्ही देणार नाही. डोपामाईनची फार तर एखादी गोळी देऊ त्यांना. सलाईनमधून डोपामाईन देता येणार नाही. आमचे हे परिहार केंद्र असल्यामुळे आम्ही ते उपचार करणार नाही. त्याचा काही उपयोग नाही. त्याऐवजी आम्ही त्यांच्यावर फिजिओथेरपी आणि म्युझिक थेरपीचा वापर करू. मोत्ज़ार्टचं संगीत त्यांना ऐकवू.

(एक सिम्फनी चालू होते आणि डावीकडचा कोपरा उजळतो. तिथे चार माणसे बसलेली

आहेत. त्याच्यात विश्वंभर आहे. ही स्व-मदतगटाची मीटिंग चालू आहे).

**एक** : माझी आई जाऊन एक वर्ष झालं. या केंद्राच्या मदतीने तिचे शेवटचे दिवस सुखाचे गेले. किमान आमचे ते दिवस सुखाचे गेले.

**एक बाई** : माझे वडील काल गेले. खरंतर मी त्यांच्या मरणाची वाट बघत होते. पण आता मला वाईट वाटते की मी त्यांचं मरण म्हणजे सुटका असे समजत होते. पण ते खरं नाही का? हे केंद्र खूप चांगले आहे. आपल्या पेशंटची तर ते काळजी घेतंच. पण योग्य काय, अयोग्य काय हे आपल्याला दाखवून देऊन आपली अपराधी भावना ते कमी करतात. माझीही अपराधी भावना हळूहळू कमी होत जाईल, हा मला विश्वास आहे आणि अशा प्रकारे डिमेन्शियाच्या पेशंटला अशा प्रकारच्या केंद्रातच ठेवणे योग्य आहे, हे मला पटले आहे. लोकांना मी ते पटवून देण्याचा प्रयत्न करणार आहे. या केंद्रासाठी जमेल तेवढे काम करणे हीच माझ्या वडिलांसाठी श्रद्धांजली ठरेल (हळूहळू अंधार.)

## अंक दुसरा
## प्रवेश पाचवा

(प्रकाश. तीच खोली. फक्त आता सगळं सामान पूर्ण नाहीसं. फक्त एक बेड. सामान्य प्रकाश. बेडवर अप्पा तसेच बसलेले. विमनस्क. कुठेतरी अज्ञातात नजर लावून बसलेले. त्यांच्या अंगावर आता हॉस्पिटलसारखी बंडी व पायजमा. त्यांचे कपडे खूप मळलेले आहेत. अनिरुद्धसारखाच एक माणूस वॉर्ड बॉयसारखे पांढरे कपडे आणि टोपी घालून हातात झाडू व बेडपॅन घेऊन येतो.)

**गणपत** : अलबेला आला .. आला गणपत आला. (त्याचे लक्ष अप्पांकडे जाते. हातातले सामान कोपऱ्यात ठेवून बेरकी मुद्रेने अप्पांकडे जातो.) ए म्हाताऱ्या, (अप्पांचे लक्ष नाही.) म्हाताऱ्या, (त्यांच्या खांद्याला धरून हलवतो.)

**अप्पा** : अं (नजर अजूनही कुठल्यातरी विचित्र जागी स्थिर. गणपतची दखल नाही.)

**गणपत** : म्हाताऱ्या, पॉटी आली का?

**अप्पा** : अं

**गणपत** : अं.. अं.. काय, लेका, विचारतोय, पॉटी आली का?इथं पॉट देऊ का धरून नेऊ संडासात?

**अप्पा** : अं...

**गणपत** : परत अं.. अं.. अरे येड्या.. झाडयाला लागली, संडासला लागली ती वेळेत सांगत जा.. नाहीतर.. तुझ्यागत सगळीच येडी असतात हितं.. करतात बेड खराब.. फुकट आमच्या डोक्याला ताप.. सांगशील ना? (तो परत आप्पांना हलवतो तशी ते त्याच्याकडे बघतात.)

**अप्पा** : अं.. अं.. नको.. अनू.. नको.. आं.. आं.. आई गं (जोरात ओरडायला लागतात. गणपत भांबावून मागं जातो. सुकन्या डॉक्टरी ॲप्रन घालून तसंच स्वातीसारखी एक

मुलगी नर्सच्या वेषात धावत येतात.)

**सुकन्या** : काय केलंस तू अप्पांना, गणपत?

**गणपत** : काय नाय डॉक्टर. एक तर म्हातारा.

**मुलगी** : गणपत..

**गणपत** : सॉरी मॅडम.. पन हे अप्पा. बघा ना कपडे किती खराब झालेत. म्हटलं बदलूया तर एकदम आरडायलाच लागले.

**मुलगी** : ते मी बघते, तुला काय करायचंय.. तुझं तू काम कर.

**गणपत** : ए, उजे, तू जास्त बकबक करू नगं, शाने. नर्स है तू. डॉक्टरीन बाय नं मी बघू काय ते.

**सुकन्या** : पेशंटची सुविधा सगळ्यात महत्त्वाची. मेंदूविकार असलेले हे पेशंट. त्यांच्या कलानं घ्यावं लागतं. हे अप्पा. विस्मृती झालीये त्यांना. कसेही कुठेही बसतात. होतात मग त्यांचे कपडे खराब. तू काय केलंस त्यांना म्हणून ते इतके घाबरलेत?

**गणपत** : काय नाय हो बाय.. त्यांचं नव्हतं ध्यान. मी विचारत होतो तरी लक्ष दिना झाले. मग जस्ट हात लावला खांद्याला तर वरडायलाच लागले.

**सुकन्या** : बरं, झालं का तुझं..? नीघ आता येथून. (तो निघून जातो) अप्पा, घाबरू नका.. शांत बसा.

**अप्पा** : म.. मला भीती वाटते.. अनू.. तो मला..

**सुकन्या** : गेलाय तो आता.

**अप्पा** : आणि ही?

**सुकन्या** : ही नर्स उज्ज्वला.. तुमचं स्पंजिंग करायला आलीये.. कपडे बदलायला.

**अप्पा** : आत्ता.. न .. न..नको.

**सुकन्या** : बरं.. उज्ज्वला थोड्या वेळानं ये. (उज्ज्वला जाते.)

**अप्पा** : हे.. हे काय चाललंय.. माझ्या घरात? हा बेड असा कसा.. हॉस्पिटलसारखा.. विशू कुठंय आणि तू तू त्याची मैत्रीण.. माझ्यासाठी खोली नं शोधणार होतीस? तू अशी डॉक्टरसारखी पैरण घालून कशी उभी आहेस?

**सुकन्या** : कारण मी डॉक्टरच आहे, अप्पा; आणि तुम्हीही घरी नाही. माझ्या आरोग्यधामात आहात. 'च्यवन जरा आरोग्यधाम' इथेच शोधली मी तुमच्यासाठी खोली.

**अप्पा** : आणि विश्वंभर?

**सुकन्या** : तो ऑस्ट्रियात आहे.

**अप्पा** : म्हणून मला हॉस्पिटलमध्ये ठेवायचं ठरवलंय का?

**सुकन्या** : ठरवलं नाही. प्रत्यक्षात तुम्ही हॉस्पिटलमध्येच आहात.

**अप्पा** : कधीपासून?

**सुकन्या** : कितीतरी महिने झाले.

**अप्पा** : महिने? कितीतरी? आणि मला कोणी सांगायची तसदीही घेतली नाही. अरे, काय चाललंय काय? ती नर्स येणार होती नं.. मदतनीस माझ्यासाठी घरी.. ती स्वातीसारखी

दिसणारी.. त्या दिवशी.. तीच.. तीच तर होती माझ्यासोबत.

**सुकन्या** : हो. होती. पण आता तुम्ही इथं आहात. आधी औषधं घ्या बरं.

**अप्पा** : औषधं.. औषधाची वेळ.. पण माझं घड्याळ हरवलंय.. औषधांची वेळ अगदी काटेकोरपणे पाळायलाच हवी का? एखादं मिनिट इकडेतिकडे. (विराम. सावरायचा प्रयत्न) किती वाजले? काय वेळ झाली?

**सुकन्या** : औषधं घ्यायची वेळ.

**अप्पा** : माझं घड्याळ.. कुठंय? कुणाला काही कल्पना? विश्वंभर.. विशू.. विश्या

**सुकन्या** : अप्पा, विशू इथं नाही.

**अप्पा** : कुठंय?

**सुकन्या** : ऑस्ट्रिया..

**अप्पा** : त्याला म्हणावं जपून. बर्फ फार पडतो. थंडी असते. त्यात हा लहानपणापासून शेंबडा. डॉक्टर, त्याला औषध द्याल? अजिबात झेपत नाही हो त्याला थंडी. त्याला जायचंय परदेशी.

**सुकन्या** : गेले कित्येक महिने तो तिकडेच आहे. दोनदा भेटूनही गेला तो तुम्हांला. कालच पत्र आलंय त्याचं. मी वाचून दाखवलं तुम्हाला.

**अप्पा** : हा काय वेडेपणा?

**सुकन्या** : हे बघा. (ॲप्रनच्या खिशातून पत्र काढून दाखवते. अप्पांचा ते वाचायचा प्रयत्न) दररोजची आहेत ही प्रश्नोत्तरे. अप्पा, थोडा ताण द्यायचा प्रयत्न करा मेंदूवर.. तुमचा मुलगा विश्वंभर.. आपला विशू.. पत्र लिहितो.. वेळ मिळाला की येतो.. समोरच्या पार्कात घेऊन जातो तुम्हाला.

**अप्पा** : आणि अनिरुद्ध, स्वाती? मगाशी तर इथे होते. तूपण होतीसच की कावेरी?

**सुकन्या** : मी सुकन्या अप्पा. डॉक्टर सुकन्या, तो वॉर्ड बॉय गणपत आणि ती नर्स उज्ज्वला. आपण दररोज भेटतोच.

**अप्पा** : माझं मन गंडवतंय मला. त्याची सगळी पाटी कोरी झालीये. तुला सांगतो, पोरी. काय तू?

**सुकन्या** : मी सुकन्या.

**अप्पा** : हां.. ती डॉक्टर.. तर डॉक्टर, एक काळसैतान, काळराक्षस शिरलाय माझ्यात. तुफानासारखा, त्या तुफानानं घर केलंय माझ्या देहाच्या तंबूत आणि त्या तंबूतल्या मेंदूला हाकलून लावलंय. मेंदू अरब आणि हा सैतान, हे तुफान म्हणजे उंट आहे. पण तू.. कोण आहेस?

**सुकन्या** : मी सुकन्या

**अप्पा** : खरंच.. तू सुकन्या.. ती.. ती उज्ज्वला.. तो गणपत.. असंच ना?

**सुकन्या** : हो.

**अप्पा** : मग.. मी कोण आहे?

**सुकन्या** : अप्पा.

**अप्पा** : अप्पा, अप्पा.. म्हणजे नेमकं .. ते.. ते माझं.. काय म्हणायचं.

**सुकन्या** : ओ.. तुमचं नाव.. अप्पा.. काय बरं.. केस पेपरवर आहे लिहिलेलं.. हं.. आठवलं.. तुमचं नाव विनायक.

**अप्पा** : विनायक?

**सुकन्या** : हो.

**अप्पा** : नक्की? खात्री आहे तुझी?

**सुकन्या** : हो. (आश्चर्यचकित)

**अप्पा** : वा. नाव तर छान आहे

**सुकन्या** : खरंच. छान आहे. विनायक.. गणपती

**अप्पा** : माझ्या आईनं ठेवलेलं.. आमच्या घरात की नाही गणपती होता.. उजव्या सोंडेचा.. पितळी. तुला माहितीच आहे.. तिला फार होतं.. ओळखतेस तिला?

**सुकन्या** : कोणाला?

**अप्पा** : असं काय? माझ्या आईला.

**सुकन्या** : नाही हो.

**अप्पा** : तुला सांगतो.. माझ्या आईला.. गणपतीचं.. आमच्या घरी गणपती बसतही असे.. तिनं बजावलेलं मला, ती म्हणजे ना.. आई.. घरात गणपतीचं करायलाच हवं मी.. कुठेही असलो तरी.. गणपतीत घरी यायलाच लागे मला.. . मी इथेय कळलं ना.. येईल ती धावत.. (उज्ज्वला स्पंजिंगचं सामान घेऊन येते.) हे बघ.. ही, ही आलीच..

**सुकन्या** : हिला ओळखलं तुम्ही? उज्ज्वलाला.

**अप्पा** : मला शाळेतून घरी न्यायला यायची.. ही ही माझी आई.. आई.. आई गं.

**उज्ज्वला** : (गोंधळलेली) मॅम. (सुकन्या तिला 'चालू दे' अशी खूण करते.)

**अप्पा** : आई.. आई.. मला घेऊन जा.. या शाळेतून घरी घेऊन जा. (एकदम रडायला लागतात)

**सुकन्या** : अप्पा, अप्पा.. असं काय.. काही दुखतंय का?

**उज्ज्वला** : कोणी छडी मारली का तुम्हाला शाळेत?

**अप्पा** : आई, आई गं..

**उज्ज्वला** : सांगा.. बोला, काय होतंय?

**अप्पा** : मला भीती वाटतेय.

**उज्ज्वला** : कसली?

**अप्पा** : मला..आतून वाटतंय.. की माझी सगळी पानं गळून पडतायत.. एका मागोमाग एक.

**सुकन्या** : तुमची पानं?

**अप्पा** : तुफान घुसलंय ना ते आत. काळराक्षस. उन्मळून पडतंय सगळं माझ्यातलं. फांद्या, शाखा, तो झंझावात पाचोळा करतोय सगळ्याचा.. . माझं घड्याळ मनगटावर आहे

अजून.. मला प्रवास करायचाय.. वेळेवर.. घड्याळाच्या मदतीनं.. पण जायचंय कुठं.. कुठे चाललोय.. काहीच कळत नाही.

**उज्ज्वला** : चला, अगोदर कपडे बदलू.

**सुकन्या** : कपडे बदलून जा तुम्ही पार्कात. तेवढाच बदल. ठीके?

**अप्पा** : चालेल.

**सुकन्या** : बागेतली ती गर्द वनराई, सगळी झाडं, पानं बघून या परत इथं.

**अप्पा** : इथंच परत यायचं? या शाळेत.

**सुकन्या** : हो. शाळेत यायलाच हवं. शिकायलाच हवं. त्यानंच तर पडझड कदाचित थांबवता येईल. काळराक्षसाशी लढता येईल. हो नं.

**अप्पा** : आपण गणपती आणायचा आई?

**उज्ज्वला** : आपण मंदिरात जाऊन दर्शन घेऊ या.

**अप्पा** : नाही. घरी गणपती बसवायचा. आईनं सांगितलंय.. आई.. मला घरी जायचंय.. शाळेत नाही यायचं परत.. घेऊन चल मला घरी. (लहान मुलासारखे हात पसरतो.) घे.. गं.

**सुकन्या** : असं काय करावं ते.

**अप्पा** : चला.

**सुकन्या** : आधी कपडे बदला.

**अप्पा** : नको नको.

**सुकन्या** : हे काय लहान मुलासारखं? आधी कपडे बदला. मग बाहेर जा. थोड्याच वेळात बरं वाटेल. तुम्ही बरे व्हाल. (अप्पांना हुंदका) पुरे आता. शांत व्हा..( उज्ज्वलाचे बोट सोडून अप्पा हातात तोंड खूपसून रडू लागतात. सुकन्या त्यांना जवळ घेते) श्.. श्.. असं नाही करायचं.. गप.. गप व्हा.
(तिच्या कुशीत झोपून देत ते शांत होतात. हळुवारपणे ती त्यांना थोपटते आहे.)

**अप्पा** : म.. मला.. जायचं नाही.

**सुकन्या** : बागेत जा. गर्द वनराई बघा. पानांनी गच्च भरलेली झाडे.

**अप्पा** : ती पानं गळून पडतात. झाडं मग ते झाड.. नागडं.. इ

**सुकन्या** : तुम्हाला आत्ता काय करायचंय?

**अप्पा** : मला झोपायचंय.

**सुकन्या** : या वेळेला?

**अप्पा** : घड्याळं सगळी मोडून पडलीत. वेळेचं काय घेऊन बसलीस. मला झोपायचं आहे.

**सुकन्या** : बरं. झोपा. आम्ही जातो. (उज्ज्वला निघून जाते. सुकन्या त्यांच्यापासून उठून निघून जाणार तोच ते तिचा साडीचा पदर पकडतात)

**अप्पा** : नको, नको जाऊ.

**सुकन्या** : अहो, मला काम आहे. इथं थांबून करू काय?

**अप्पा** : म्हण म्हण..

**सुकन्या** : काय म्हणू?

**अप्पा** : गाणं.. मला झोप.. आई...

**सुकन्या** : मला गाणं म्हणता येत नाही.


**अप्पा** : झ झोप.. ग गाणं.. आई..

**सुकन्या** : विश्वंभरची अवस्था कळतीये आता..

**अप्पा** : (तिचा पदर ओढत) झ.. झ.. ग.. म्ह..

**सुकन्या** : (बसून परत त्यांना थोपटत)
शिशिर ऋतूच्या पुनरागमे, एकेक पान गळावया
का लागता मज येतसे नकळे उगाच रडावया
पानात जी निजली इथे इवली सुकोमल पाखरे
जातील ती आता कुठे निष्पर्ण झाडीत कापरे
पुसतो सुहास, स्मरूनि या, तुज आसवें, जरी लागले
एकेक पान गळावया..
(आवंढा दाटून येतोय. म्हणवत नाहीये. अप्पा झोपलेत. स्तब्धता. शांतता. विराम. त्यांच्यावर केंद्रित झालेला प्रकाश. हळूहळू पडदा सरकत येतो. प्रवेश पाचवा, अंक दुसरा आणि नाटक समाप्त)

❑





# क्लरिस लिस्पेक्टर

## महेश्वर लव्हेकर



क्लरिस लिस्पेक्टर (१९२०-१९७७)

हर्मन हेसची कादंबरी स्टेपनवुल्फ वाचनात आली आणि क्लरिस लिस्पेक्टरने लेखक होण्याचे ठरवले. एका नामांकित संस्थेतून कायद्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तिने काही काळ पत्रकारिता केली. याच दरम्यान तिच्या कथा नियतकालिकांत प्रसिद्ध होऊ लागल्या होत्या. ती तेवीस वर्षांची असताना तिची पहिली कादंबरी 'निअर टू दि वाईल्ड हार्ट' प्रसिद्ध झाली आणि प्रचंड नावाजलीही गेली. ही कादंबरी विवाह का करू नये याच्या कारणांची मोडकीतोडकी कैफियत होती. या कादंबरीतील एक स्त्रीपात्र म्हणते – 'विवाह केल्यावर एकच गोष्ट तुमच्या हाती राहते ती म्हणजे मृत्यूची प्रतीक्षा करणे.' मात्र कादंबरी लिहून झाली आणि प्रसिद्ध झाली यादरम्यान क्लरिस स्वतः विवाहबद्ध झाली होती. डिप्लोमॅट असलेल्या पतीसोबत ती अनेक देशांत राहिली, मात्र ही पत्नीची भूमिका पार पाडणे आणि ब्राझील सोडून इतरत्र राहणे तिच्यासाठी कठीणच होते. १९५९ साली तिचा घटस्फोट झाला आणि ती आपल्या दोन मुलांसोबत ब्राझीलला परतली. तिने ९ कादंबऱ्या, ८५ कथा, बालसाहित्याची ५ पुस्तके लिहिली आणि शिवाय वृत्तपत्रांतून स्तंभलेखनही केले. तिच्या कथा, कादंबऱ्यांतील कथानक चटकन लक्षात येत नाही मात्र तिच्या लिखाणातील लयीचा अंत:प्रवाह, खास तिचीच असलेली अनवट वाटणारी भाषा ही वैशिष्ट्ये लगेच जाणवतात. तिच्या कथा, कादंबऱ्यांतील निवेदकांना मानवी अस्तित्वाची रहस्ये जाणून घेण्याची असोशी आहे. तिच्या कादंबरीतील एक निवेदिका म्हणते – 'जी

व्यक्ती सर्वार्थाने जगते, ती इतरांसाठी जगत असते. 'तिच्या एका दुसऱ्या कादंबरीतील निवेदिका म्हणते – 'मला स्वतःविषयी थोडक्यात आणि नेमकेपणाने नाही सांगता येणार, कारण मी एक खुर्ची आणि दोन सफरचंदं यांनी मिळून बनलेली आहे आणि त्यांची सांगड घालता येणं शक्य नाही.' या निवेदिकेला आत्मशोध घ्यायचा आहे. तिला जाणवतं की आपलं व्यक्तिमत्त्व एक संयुग आहे आणि जे वाटतं ते नेहमीच नेमकेपणाने शब्दांवाटे व्यक्त करणे, पोचवणे शक्य नाही. सफरचंद ज्ञानाचे आणि खुर्ची घराविषयी असलेल्या ओढीचे द्योतक मानले तरी तिच्या निवेदिका या दोहोंच्या बेरजेच्या पुढे निघून जातात. तिच्या निवेदिकांना नेमके शब्द गवसण्यासाठी झगडावं लागतं आणि भाषेच्या, परिस्थितीच्या मर्यादा असूनही त्या जोरकसपणे व्यक्त होतात. तिची एक निवेदिका म्हणते – 'जगण्यात कसलं आलंय धैर्य. खरं धैर्य आहे आपण जगतोय हे माहिती असण्यात.' तिने लिहिलंय–'मी इतकी रहस्यमय आहे की मला माझं स्वतःचंही आकलन होत नाही.'

## दि फिफ्थ स्टोरी या कथेचा अनुवाद
## पाचवी गोष्ट

या गोष्टीला 'पुतळे' हे शीर्षक देता येईल. दुसरं देण्याजोगं शीर्षक 'खून.' 'झुरळांना कसे मारावे' हे आणखी एक शीर्षक. हे असं असल्याने मी किमान तीन गोष्टी सांगणार आहे. या तिन्ही गोष्टी खऱ्या आहेत, कारण त्या एकमेकींना छेद देत नाहीत. गोष्ट एक असली तरी तिच्या एक हजार एक गोष्टी होऊ शकतात, तुम्ही मला एक हजार एक रात्री देऊ केल्या तर.

'झुरळांना कसे मारावे 'या पहिल्या गोष्टीची सुरुवात अशी होते : मी झुरळांविषयी तक्रारीच्या सुरात बोलत होते. एका स्त्रीने माझे बोलणे ऐकले. तिने मला झुरळांना मारण्याची कृती सांगितली. साखर, पीठ आणि प्लास्टर सम प्रमाणात घेऊन मळायचे आणि एकजीव करायचे. पीठ आणि साखर झुरळांना आकर्षित करून घेण्यासाठी आणि प्लास्टर त्यांच्या पोटात आग पडावी म्हणून. मी हे केलं. झुरळं मरून गेली.

दुसरी गोष्ट खरं तर पहिली गोष्ट आहे आणि तिचं शीर्षक आहे 'खून'. ही गोष्ट अशी सुरू होते: एका स्त्रीने माझे बोलणे ऐकले. त्यानंतर गोष्टीत येतं तिचं मला झुरळांना मारायची कृती सांगणं आणि त्यानंतर खून. वास्तव हे आहे, की माझं झुरळांविषयी तक्रारीच्या सुरातलं बोलणं तसं वरवरचं होतं. झुरळं काही माझी नव्हती, ती तळमजल्यावर होती आणि इमारतीच्या पाइपांवर चढून ती आमच्या घरात यायची. मात्र एकदा मी हे मिश्रण तयार केलं आणि झुरळं माझीही झाली. झुरळं माझी झाली तेव्हापासून मी या मिश्रणातील घटकांचे प्रमाण आणि वजन काटेकोरपणे आणि एकाग्रतेने तपासू लागले. ज्याचं नेमकं स्वरूप आणि कारण सांगता येणार नाही, असा संताप मनात धुमसत होता. दिवसा झुरळं अदृश्य व्हायची. त्यावेळी घराच्या निवांततेला कुरतडणाऱ्या या छुप्या शापाचा अंदाजही कोणाला करता आला नसता. झुरळं अदृश्य शापाप्रमाणे दिवसा झोप काढायची, तेव्हा मी त्यांना संध्याकाळी द्यायचे विष तयार करायचे. मृत्यूला सामोरे जाण्याचे आवाहन करणारे हे मिश्रण मी काटेकोरपणे बनवायचे. उत्साह, भय आणि छुपा शाप मला उद्युक्त करायचे हे करायला. डोक्यात एकच थंड विचार असायचा: अस्तित्वात असलेल्या एकूणएक झुरळाला मारून टाकायचा. आम्ही शिणलेल्या अवस्थेत स्वप्नं पाहत असतो तेव्हा झुरळं पाइपांवरून वर चढत असतात. आणि आता तर कृतीही तयार होती, पांढरीफेक.

झुरळांसाठी तयार केलेली पावडर. ते एखादे नैसर्गिक द्रव्यच वाटेल अशा हुशारीने मी फरशीवर पसरवून टाकली. घरात संपूर्ण शांतता होती. पलंगावर पडून मी कल्पना करत होते, की झुरळं एकेक करून रांगत लाँड्री ठेवलेल्या खोलीत जात होती. या खोलीतला अंधारही झोपी गेला होता. दोरीवरचा एक टॉवेल तेवढा टक्क जागा होता. कित्येक तासांनी मी दचकून जागी झाले, तेव्हा उठायला किती उशीर झाला हे लक्षात आले. पहाट होऊन गेली होती. मी किचनमधून लाँड्रीच्या खोलीत गेले. ते तिथे जमिनीवर पडले होते, टणक, भलेमोठे. रात्रीतून मी त्यांना मारून टाकलं होतं. आमचं नाव घेऊनच दिवस उजाडत होता. दूरवरच्या झोपडपट्टीतला कोणी कोंबडा बांग देत होता.


आता सुरू होणारी तिसरी गोष्ट ही पुतळ्यांविषयीची आहे. या गोष्टीची सुरुवात होते मी झुरळांविषयी तक्रारीच्या सुरात बोलत होते, तिथून. मग ती स्त्री येते. आणि ही गोष्ट पुढे सरकत मी पहाटेच्या सुमारास, धड जागी नाही आणि धड झोपेत नाही अशा अवस्थेत, किचनवाटे पुढे जाते, तिथवर पोचते. खोलीतली फरशी पाहून जाणवतं की, ही फरशी माझ्याहूनही जास्त पेंगुळलेली आहे. पहाटेच्या अंधारात, जांभळट प्रकाशात मला माझ्या पायथ्याशी सावल्या आणि पांढरे आकार दिसतात: विखुरलेले कितीतरी पुतळे, निश्चल. झुरळं ताठर झाली आहेत– आतून आणि बाहेरून. काही उताणी. काही मध्येच थबकलेली, आता कधीच पूर्णत्वाला जाणार नसलेली एखादी कृती करताकरता. काहींच्या तोंडात पांढऱ्या अन्नाचे कण. दुसऱ्या दिवशी पोंपेईत उजाडलेला दिवस पाहणारी मी पहिली व्यक्ती होते. आदली रात्र कशी सरली आणि अंधारात सामूहिक खेळ कसा खेळला गेला याविषयी मला सगळे माहीत आहे. काही झुरळांच्या शरीरातले प्लास्टर अगदी सावकाश घट्ट, टणक होत गेले असावे एखाद्या महत्त्वाच्या प्रक्रियेत होते तसे, आणि त्यांनी अधिकाधिक कष्टप्रद होत जाणाऱ्या हालचालींवाटे, अधाशीपणे, शरीराबाहेर पडण्याचा प्रयत्न करतेवेळीच रात्रीच्या क्रीडेतील आनंद अधिक उत्कटतेने उपभोगला असावा. पण जोवर या अनाकलनीय, निरागस धक्क्यामुळे त्यांचा दगड होत नाही तोवरच. त्यांच्या डोळ्यांत रोष आणि निर्भर्त्सनेचा भाव आहे. इतर काही झुरळांवर आक्रमण झालंय त्यांच्या गाभ्यांतून. त्यांना त्यांचा गाभाच भयग्रस्त झालाय याची पुसटशीही कल्पना नाही. अचानक त्यांना ठाम आकार आलाय. मुखातून पूर्णपणे बाहेर पडण्यापूर्वीच एखादा शब्द अर्धवटच राहून जावा तसा: तू आहेस तर आणि मी... जे भाबडे होते, ते रात्रभर प्रेमाची गाणी गात होते. मात्र तो त्या तिथे असलेला, ज्याच्या तपकिरी मिश्यांना पावडर लागलंय, त्याच्या फार उशिरा हे लक्षात आलं असेल की, निरपेक्ष भाबडेपणाने उपभोग कसा घ्यायचा हे माहीत नसल्यामुळेच त्याचा असा दगड झालाय. मी माझ्या आत फार खोलवर जाऊन पाहायचो. फार खोलवर जाऊन पाहिल्यामुळे... मानवी दूरस्थपणे निरीक्षण करतो, मी नष्ट होत जाणाऱ्या विश्वाचं. दिवस उजाडतो. क्वचित एखाद्या झुरळाच्या मिश्या वाऱ्याच्या झुळुकीने थरारतात. याआधीच्या गोष्टीतला कोंबडा बांग देतो.

चवथ्या कथानकात आगमन होतं घरात नुकत्याच सुरू झालेल्या पर्वाचं. गोष्टीची सुरुवात कशी होते ते आपल्याला माहितीय: मी झुरळांविषयी तक्रारीच्या सुरात बोलत होते. गोष्ट माझ्या दृष्टीस प्लास्टरचे पुतळे पडतात तिथवर पोचते. हे मृत पुतळे आहेत. पण मग मी पाइपांकडे पाहते, ज्यांवरून आजच रात्री जिवंत झुरळांची फौज सावकाश चालत येईल. असं झालं तर मी प्रत्येक रात्री झुरळांना मारून टाकणारं मिश्रण परत परत तयार करेल का? रात्री ठरावीक विधी केल्याशिवाय झोप न लागणाऱ्या व्यक्तीसारखं. आणि दररोज पहाट झाली की मंत्रचळ झाल्यासारखी घामेजलेल्या रात्रीतून निर्माण

केलेल्या पुतळ्यांना बघण्यासाठी अधीर होईल का? चेटकिणीच्या दुहेरी आयुष्याचं चित्र डोळ्यांसमोर आलं तेव्हा मी थरारले. खुनशी आनंदही झाला. कोरडं होत चाललेलं प्लास्टर पाहूनही मी थरारले: जगायची सक्ती, माझ्या आतल्या साच्याच्या ठिकऱ्या उडवणारी. मनात आलं, दोन वाटांपैकी एक वाट निवडायचा हा कठोर क्षण आहे, या वाटा परस्परांचा निरोप घेतायत आणि कुठलीही वाट निवडली तरी मी खूप काही गमावून बसणार आहे : मी किंवा माझा आत्मा. मी निवड केली. 'तू हे पुण्यकर्मच केलं आहेस,' मी मनातल्या मनात स्वतःला दाद देते : 'हे घर आता कीटकविरहित झालंय.'

पाचव्या गोष्टीचं शीर्षक आहे 'लेबनीझ अँड ट्रान्सेंडन्स ऑफ लव्ह इन पॉलीनेशिया'. या गोष्टीची सुरुवात अशी होते : मी झुरळांविषयी तक्रारीच्या सुरात बोलत होते.

❑





# तत्त्वभान दर्शन




'वर्णमुद्रा' प्रकाशित आणि श्रीनिवास हेमाडेलिखित 'तत्त्वभान'विषयी प्रा. डॉ. सुरेंद्र दरेकर यांनी लिहिलेल्या एकूण दहा परिचय-लेखांपैकी हा तिसरा लेख या अंकात देत आहोत.

**मनोज सुरेंद्र पाठक**

## तत्त्वभानच्या निमित्ताने – ३
## तरी तर्कु तोचि फरशु नीतिभेदु अंकुशु

मानवी जीवनातील 'विचारशीलता व तिला नियमानुरूप आकारित व वैधरीत्या अर्थसंबद्ध करणारे शास्त्र ते तर्कशास्त्र' अशी तर्कशास्त्राची साधारण व्याख्या करता येईल. याचाच अर्थ 'शिस्तबद्ध पद्धतीने विचार कसा करावा, याचे चिकित्सक मीमांसाशास्त्र म्हणजे तर्कशास्त्र' म्हणावे लागेल.

सर्व मानव्य तसेच नैसर्गिक शास्त्रांची नामावली घेतली तर त्यामागे 'लॉजी' (logy) हे अंत्यक लावण्यामागे त्या त्या विषयाच्या शास्त्रीय सैद्धांतिक मांडणीतील आणि विवेचनातील तर्कसंगतता' हेच कारण असते. ह्या व्युत्पत्तीचा ऊहापोह या लेखात केला आहे, परंतु विचाराच्या नियमांची चर्चा किंवा

तर्कशास्त्राची स्वरूपमीमांसा करण्याचा मोह टाळलेला आहे. जिज्ञासूंनी त्याचा मागोवा घेण्यासाठी संबंधित शास्त्राची कास धरावी असाही हेतू त्यामागे असू शकेल.

श्रीनिवास हेमाडे यांना ढोबळमानाने भारतीय तर्कशास्त्र व आधुनिक पाश्चात्त्य तर्कशास्त्र यातील अनुबंध मांडत प्रामुख्याने तौलनिक विवेचन करण्यात रस असल्याने ते लगेच पाश्चात्य तर्क व भारतीय अनुमान यातील साम्यभेदाकडे वळतात. येथे तर्काचे साधे नाव अंदाज किंवा अनुमान असे प्रतिपादन लेखक करतो. मात्र जगण्याच्या सुकरतेसाठी किंवा इच्छापूर्तीसाठी रोजच्या जगण्याच्या व्यवहाराशी संलग्न असलेल्या अटकळी, आडाखे बांधण्याची मानवी सहजवृत्ती सांगणे; आणि माणूस करत असलेले अनुमान यात त्यांनी साम्य कल्पिले आहे. पण साम्याचे थोडे अधिक स्पष्टीकरण हवे होते असे वाटते.

पुढे जाऊन त्या साम्याची तर्काशी घातलेली सांगडही अधिक स्पष्ट व्हावेसे वाटते. याचे कारण अनुमानाचे अंदाजाशी साम्य दिसत असले तरी ते भारतीय दर्शनात 'प्रमाण' (ज्ञानाच्या अनेक साधनांपैकी एक साधन) मानलेले आहे. गंभीर अर्थाने पाहता 'प्रमाण'चा व्यावहारिक ठोकताळ्याशी फारसा संबंध पोचत नाही. कोणतेही 'प्रमाण' (ज्ञानसाधन) घडू शकणाऱ्या संभाव्य घटनेप्रमाणेच घडलेल्या घटितालाही लावता येते, हे त्यामागचे कारण आहे. या दृष्टीने ते इंग्रजी forecast वा statistical inference पेक्षा मूलतःच वेगळे ठरते. (सांख्यिकीय अनुमानातही तथ्याच्या संच वर्गानुसार निवडीसाठी नमुनांतर्गत (sample size) चलांना मुक्तांश (degrees of freedom) देणारा जर्मन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ कार्ल गॉस (Johann Carl Friedrich Gauss 1778-1855) चा Number theory सिद्धांत. आता त्यातील अनुमानाचा भाग द्विमानतेचे स्वरूप घेऊन संगणकीय भाषेतच प्रविष्ट झाला आहे.) अनुमानाला प्रमाणदृष्ट्या न्यायाची जोड मिळाल्यावर या प्रमाणाची युक्तायुक्तता सिद्ध करता येते.

हे येथे सांगायचे कारण 'तर्क' या शब्दाने सुरू होणारे वैदिक परंपरेला अनुसरणारे काही ग्रंथ. अन्नंभटाचा 'तर्कसंग्रह', केशवमिश्राचा 'तर्कभाषा', तसेच अवैदिक परंपरेतील यशोविजय याचा 'जैनतर्कभाषा' आणि मोक्षाकर गुप्त याचा बौद्धतर्कभाषा हे प्रमुख ग्रंथ. हे मुख्यतः प्रमाणाची चर्चा करणारे ग्रंथ आहेत. या खेरीज 'न्याय' व 'प्रमाणा'ची वेगळी बाजू मांडणारे उद्योतकर, दिङ्नाग व चार्वाक तत्त्ववेत्तेदेखील आहेतच. असो.

या लेखात लेखक श्रीनिवास हेमाडे अनुमानाच्या अंगाने भारतीय तर्कशास्त्राच्या विकासाची रूपरेषा मांडत काही निष्कर्ष काढतात. या दृष्टीने लेखाच्या अखेरच्या भागातील दोन मुद्दे विचारणीय आहेत. ते म्हणतात की वैदिक विचारांचा प्रभाव व दबाव एवढा जोमदार होता की केवळ वैदिक न्यायदर्शनाला 'भारतीय तर्कशास्त्र' हा दर्जा प्राप्त झाला. हे विधान थोडे विपर्यस्त वाटते. कारण या संदर्भात वैदिक आणि अवैदिक परंपरेत स्वतंत्रपणे विभिन्न प्रमाणशास्त्रीय (epistemological) संप्रदाय निर्माण झाले ही गोष्ट खरी. पण त्या परस्परांमध्ये अनुबंध नव्हता किंवा आदानप्रदान नव्हते, असे नाही; ते होतेच होते.


'भारतीय तर्कशास्त्र' ही एकसंध उपपत्ती नसून अनेक वाटा व वळणे घेत विकसित झालेला विचारव्यूह आहे. किंबहुना त्याची व्यामिश्रता व गतिशीलता हेच त्याचे बलस्थान आहे असेही म्हणता येईल. परंतु हे मान्य करूनही पाश्चात्य तर्कशास्त्राशी भारतीय तर्कशास्त्राची तुलना करण्यात अनेक अडचणी येतात. याचा सविस्तर विचार बिमल कृष्ण मतिलाल व जे. के. मोहंती या दोन तर्कपंडितांनी

केलेला आहे. मात्र यातील प्रमुख अडचण मानसिकतेची (psychologism) आहे.

आधुनिक मतानुसार तर्कशास्त्राला विचार वा विधानातील तार्किक आकारिक संबंधाशी कर्तव्य असून विचार करण्याच्या प्रक्रियेशी नव्हे. अनुमानाकडे विचार करण्याची कार्यकारणबद्ध प्रक्रिया पाहण्यातून ते मानसिकतावादाने दोषग्रस्त होते. लेखक श्रीनिवास हेमाडे लेखाच्या समारोपात भारतात प्राचीन काळापासून ज्ञानाला साध्याऐवजी साधन समजले जाण्यातून अद्वैत व मोक्ष हेच तात्त्विक विचारविश्वाला केंद्रवर्ती ठरून तर्कांची उपेक्षा झाली आणि तर्क 'अप्रतिष्ठित' ठरला, हे महाभारतातील दाखले देऊन मांडतात. पण मुळात हा वाद अंतर्गत प्रमाणातील तुलनेच्या सापेक्षतेने असून तो निरपेक्ष अर्थाने कसा विकसित झाला याचा उलगडा अनेकांनी केलेला आहे. या दृष्टीने केशव लक्ष्मण दप्तरी यांचे तत्त्वमीमांसापद्धती' व 'धर्मविवादस्वरूप' ग्रंथ महत्त्वाचे आहेत. 'आजचा सुधारक' सप्टेंबर २००० या अंकात यासंबंधाने माहिती मिळेल. तसेच प्रदीप गोखले यांचा भारतीय तर्कशास्त्राची वाटचाल:एक चिकित्सक आढावा हा मोठा निबंधही महत्त्वपूर्ण आहे.

अर्थातच श्रीनिवास हेमाडे यांचा लेखामागचा उद्देश केवळ सामान्य स्तरावरील परिचायक स्वरूपाचा आहे, विषयाची ओळख करून देणे एवढ्याच पुरता आहे. त्यामुळे माझे उपरोक्त विवेचन, त्यांच्या मांडणीवरील आक्षेप लेखक श्रीनिवास हेमाडे टीका स्वरूपात न घेता पूरकतेने घेतील, अशी आशा आहे. त्यामुळे 'तर्कशास्त्र परिचय' हा त्यांचा हेतू बऱ्याच प्रमाणात साध्य होईल असे वाटते.

❑





# No Man's Land च्या दिशेने : तत्त्वभान

राहुल राजश्री पोपट

B.Sc. Biotechnology (जैवतंत्रज्ञान)च्या दुसऱ्या वर्षाला असताना याच विषयात पदवीनंतर पुढं M.Sc. करायचं आणि शक्य झाल्यास Ph.D.पर्यंत शिक्षण घ्यायचं असं डायरीत लिहिलेलं स्पष्टपणे आठवत आहे. आता ती डायरी मात्र काही सापडत नाहीये. तेव्हा Ph.D. म्हणजे आपण शिकत असलेल्या शिक्षण क्षेत्रातील उच्च-पदवी इतकंच काय ते माहीत होतं. माहीत असलाच तर Ph.D. चा फुलफॉर्म Doctor of Philosophy आहे इतकंच माहीत असेल. पण Philosophy म्हणजे नेमकं काय हे माहीत असण्याची शक्यता किंवा जाणून घेण्याची उत्सुकता त्यावेळेस नव्हतीच. खूप शिकलं पाहिजे हे एवढंच काय ते वाटायचं.

पुढं M.Sc. Biophysics साठी मुंबई विद्यापीठात प्रवेश घेतला. तेव्हा M.Sc. करीत असताना एका डिप्लोमा कोर्समध्येसुद्धा प्रवेश घेतला. त्या कोर्सचं नाव होतं- Post Graduate Diploma in Philosophy of Communal Harmony and Social Peace. यूपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना हा डिप्लोमा केलेला असेल तर विशेष प्राधान्य देण्यात येईल, असं काहीतरी ऐकिवात होतं म्हणून ॲडमिशन घेतलेलं. तेव्हा देखील Philosophy या विषयाचं महत्त्व आणि उपयोजन माहीत नव्हतं. M.Sc. Biophysics २००९ साली पूर्ण झालं.

घरच्या आर्थिक परिस्थितीमुळं पुढची दोन वर्षं नोकरी करावी लागली. मागे शिक्षणासंदर्भात जो प्लॅन आखला होता तो काही काम करणार नाही असं स्पष्ट झालं; पण मनात नेहमी पुढच्या

शिक्षणाबद्दल विचार येत राहायचा. मग २०११ मध्ये Ph.D. करण्यासाठी संधी चालून आली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात Ph.D. साठी ॲडमिशन घेतली. साधारणतः एक वर्षं काम केलं; पण पुढं काही कारणास्तव Ph.D. अर्ध्यावर सोडून द्यावी लागली. पण पुन्हा एकदा २०१२ मध्ये Biophysics विषयात Ph.D. करण्याची संधी मिळाली. ॲडमिशन झाली.

कोर्सवर्क करत असताना हाफकिन इंस्टिट्यूटमध्ये डॉ. दीपक मोदी यांचं लेक्चर होतं. तेव्हा त्यांनी सर्वात आधी आम्हाला प्रश्न विचारला– What is Philosophy? (तत्त्वज्ञान म्हणजे काय?). डॉ. दीपक मोदी सरांनी दिलेलं स्पष्टीकरण मला पुसटसंदेखील आठवत नाहीये. कारण मी प्रश्नातच गुंग झालेलो. माझ्या डोक्यात विचारचक्र सुरू झालेलं की, आपण Ph.D. ला ॲडमिशन तर घेतलं खरं पण Philosophy या शब्दाचा नक्की गर्भितार्थ काय हेच आपल्याला धड माहीत नाही. त्या प्रश्नाच्या गोंगाटात सरांचं उत्तर ऐकायचं राहूनच गेलेलं. आताही तीन–चार वर्षं काम केलं आणि Ph.D. ने दुसऱ्यांदा हुलकावणी दिली. अनेक गोष्टी त्यामागे आहेत. त्या आठवणींत शिरण्यात आता रसंही वाटत नाही. पुढे मग एका प्रकाशनसंस्थेत पाच वर्षं (२०१७–२०२२) Biology Content Writer म्हणून काम केलं.

आता म्हणजे तब्बल दहा–बारा वर्षांनी मी स्वतःच 'तत्त्वज्ञान म्हणजे काय? ते का महत्त्वाचं आहे? त्या विषयाचं उपयोजन काय?' या प्रश्नांची उत्तरं मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागलो.

याचदरम्यान तत्त्वज्ञान विषयाकडे उत्सुकतेने वळायचं पहिलं कारण ठरलं ते म्हणजे शरद बाविस्कर सरांचं 'भुरा' हे आत्मकथन. त्यात एका ठिकाणी सरांनी म्हटलं आहे– युरोपमध्ये तत्त्वज्ञान हा विषय शिकत असताना लक्षात आलं की, तिथं तत्त्वज्ञान सगळ्यात महत्त्वाची शाखा आहे. फ्रान्समध्ये तर 'बाकालोरिआ' (Baccalaureate) च्या म्हणजे आपल्याकडील बारावीच्या परीक्षेत तत्त्वज्ञानाच्या परीक्षेला त्यांच्या थोर वैचारिक परंपरेला साजेल असा मान दिला जातो (पान क्र. १९). पुढं पूर्ण पुस्तकभर बाविस्कर सरांनी जगण्याचा आणि शिक्षणाचा अर्थच तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून मांडला आहे.

मला प्रश्न पडला की, तत्त्वज्ञानासारखा महत्त्वाचा विषय आपल्याकडे इतका दुर्लक्षित का राहावा? मग मी महाराष्ट्र शिक्षण मंडळाने प्रकाशित केलेली अकरावी–बारावीची तत्त्वज्ञानाची पुस्तकं बेसिक्स कळावीत म्हणून वाचायला घेतली. ही पुस्तकं वाचत असतानाच मग श्रीनिवास हेमाडे सरांनी लिहिलेलं 'तत्त्वभान' पुस्तक प्रकाशित होत आहे, हे फेसबुकवरील कुणीतरी शेअर केलेल्या पोस्टवरून कळलं. क्षणाचाही विलंब न करता लगेचच प्रकाशनपूर्व एक प्रत बुक केली.

पुस्तक हाती येताच तत्त्वभानचे निमंत्रण हा लेख वाचला. एकदा वाचून झाल्यावर एक–दोन दिवसांनी तो लेख पुन्हा वाचला. खरं सांगायचं तर 'निमंत्रण' आणि 'आमंत्रण' या दोन शब्दांतील फरक तेव्हा कुठे समजला. मनाशी ठरवलं की, हे पुस्तक सावकाश वाचायचं आणि तत्त्वज्ञान विषयातील संज्ञा, संकल्पना नीट समजून घेत पुढं जायचं. कारण शिकण्यासाठी तत्त्वज्ञान हा विषय माझ्यासाठी पूर्णपणे नवीन.

नवशिक्या तत्त्वज्ञान–प्रेमिकांना समजेल अशा रूपात तत्त्वज्ञानातील संकल्पना समजावून सांगणे हाच या ग्रंथाचा मुख्य हेतू आहे हे वाचून आणखी आनंद झाला. Philosophy या शब्दाचा उगम त्याचा भारतीय भाषांमधील तत्त्वज्ञान आणि दर्शन या अर्थाने दोघांमधील फरक काय इथपासून सुरुवात होऊन पुढे एक एक लेख वाचत असताना जगभरातील आजवर होऊन गेलेल्या तत्त्ववेत्त्यांची आणि त्यांच्या

तत्त्वज्ञानाची ओळख होत गेली. वाचत असताना जिथं जिथं प्रश्न उभे राहिले, ज्या संकल्पना अजून स्पष्ट करून घ्यायची गरज वाटते त्याची नोंद पुस्तकात करीत गेलो. तत्त्वज्ञानाचा संसार ज्ञान, अस्तित्व, तर्क, सौंदर्य आणि नीती या पाच मूलभूत संकल्पनांच्या आधारे चालू असतो आणि त्यांचा एकमेकांशी कसा संबंध असतो याची कल्पना आली. तत्त्वज्ञानातील ज्ञानशास्त्र, अस्तित्वशास्त्र, तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र आणि नीतिशास्त्र या ज्ञानशाखांची तोंडओळख झाली.

माझं आत्तापर्यंतचं शिक्षण विज्ञान विषयात झाल्यामुळं पुस्तकात दिलेले दोन लेख 'वैज्ञानिक पद्धतीचा उदय आणि भारतीय विज्ञान व वैज्ञानिक पद्धती!' हे भारतातील विज्ञान शिक्षण आणि वैज्ञानिक प्रगती या अनुषंगाने अतिशय महत्त्वाचे वाटले. 'भारतीय विज्ञान व वैज्ञानिक पद्धती' या लेखात सरांनी खूप महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे– विद्यमान भारतीय शिक्षण पद्धतीत विज्ञान शिकविले जाते म्हणजे सिद्धांत शिकविले जातात; पण वैज्ञानिक दृष्टी दिली जात नाही. प्रत्येक भारतीय नागरिकात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, हे भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार (विभाग ४ अ, कलम ५१ अ) सरकारी धोरणांचे कर्तव्य आहे. वैज्ञानिक पद्धती प्रश्न विचारण्यापासून सुरू होते, पण आपली परीक्षा पद्धती मुलांचे प्रश्न विचारणे बंद करून टाकते. पाठांतरावर भर देणारे पोपट तयार करणे, हे शालेय पोपट विज्ञान शिक्षण व्यवस्था आणि पालक मंडळीही पाळतात (तत्त्वभान, पान क्र.८१). भारतात विज्ञानमूलक विचारांची प्रत्यक्ष वैज्ञानिक पद्धती का होऊ शकली नाही आणि विज्ञान–विकास का होऊ शकला नाही? या प्रश्नाच्या संदर्भात सरांनी अनेक मुद्दे चर्चिले असून देबीप्रसाद चट्टोपाध्याय यांचं मत उद्धृत केलं आहे. देबीप्रसाद यांच्या मते वर्ण–जाती–लिंगभेदभाव हाच विज्ञान–विकासातील मुख्य अडथळा ठरला. देबीप्रसाद चट्टोपाध्याय यांच्याच 'What is Living and What is Dead in Indian Philosophy' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील एक महत्त्वाचं वाक्य 'तत्त्वभान' मध्ये दिलेलं आहे: भारताच्या विद्यमान तात्त्विक गरजा समोर ठेवून आपल्या दार्शनिक परंपरांचे विश्लेषण करणे आवश्यक आहे आणि आपल्या विद्यमान तात्त्विक गरजा म्हणजे इहवाद, बुद्धिवाद आणि विज्ञाननिष्ठा. हे सर्व मुद्दे लक्षात घेता आपल्याला आपल्या विज्ञान शिक्षणाच्या दिशेने कशी पावलं उचलायला हवीत हे ध्यानात येते.

माझ्या मते भारतात बहुतांश वेळा तत्त्वज्ञान हे धर्माशी जोडण्यात येते आणि धर्माचा संबंध जोडण्यात येतो पारलौकिक तत्त्वांशी (ईश्वर, आत्मा, पूर्वजन्म, पुनर्जन्म, कर्मविपाक सिद्धांत, इत्यादि). किंबहुना, तत्त्वज्ञान म्हणजे पारलौकिक तत्त्वांसंबंधित चिंतन असाच मर्यादित अर्थ घेण्यात आला असावा म्हणूनही कदाचित तत्त्वज्ञान विषय आपल्याकडे दुर्लक्षित राहिला किंवा तसा तो राहू देण्यात आला, असंही म्हटलं तरी हरकत नाही.

पुस्तक वाचताना सर्वात महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे तत्त्वज्ञान विषयाची ओळख करून देत असताना मानवी आयुष्याच्या वास्तवाशी निगडित समस्यांशी असलेली नाळ मात्र कुठंही तोडण्यात आली नाही. मतदात्यांचा मोक्ष, तात्त्विक दृष्टिकोन–लोकशाहीसाठी, शेतीचे नीतिशास्त्र, पर्यावरण नीतिशास्त्र हे आणि इतरही अनेक लेख वास्तवाशी आपला संबंध तुटू देत नाहीत. तत्त्वज्ञानाची मानवी आयुष्याच्या वास्तवाशी असलेली नाळ तोडता येऊ शकत नाही, म्हणूनही तत्त्वज्ञान विषय पुढं शिकत राहण्याचा आणि ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्याचा मनात निश्चय झाला आहे.

खरं तर पुस्तकातील प्रत्येक लेखावर चिंतन करून आणखी लिहिता येईल. पण सध्या असलेली तत्त्वज्ञान विषयाची प्राथमिक समज ही आज माझ्या ज्ञानाची मर्यादा आहे. म्हणून जे विचार मनात आले

ते संक्षिप्त स्वरूपात मांडावेसे वाटले. तत्त्वज्ञानाची सर्वसमावेशक भूमिका पुस्तकातील मतदात्यांचा मोक्ष या लेखात दिली आहे आणि ती मला मनःपूर्वक पटली आहे :

तत्त्वज्ञान किंवा दर्शन कोणतेही असले, कोणत्याही देशात कोणत्याही काळात विकसित झालेले असले तरी 'जग आणि माणूस समजावून घेणे' ही सर्वसमावेशक व्यापक भूमिका प्रत्येक तत्त्वज्ञानामागे असते. माणूस जिवंत असताना त्या त्या काळातील विद्यमान जगाची रचना, त्याचे स्वरूप आणि पुढील अपेक्षित विकासाची दिशा समजावून घेणे, हा त्या त्या काळातील राजकीय व सामाजिक कार्यक्रम असतो (तत्त्वभान, पान क्र. ९१).

या भूमिकेतूनच तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणं माझ्या दृष्टीने महत्त्वाचं आहे.

पुस्तकामध्ये सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ते बर्ट्रंड रसल् यांचं एक उद्धृत दिलं आहे ते पुढीलप्रमाणे : 'तत्त्वज्ञान हा 'No Man's Land' दर्जाचा असा एक निर्मनुष्य प्रदेश' आहे की ज्यावर धर्म आणि विज्ञान या दोहोंकडून सतत हल्ले होत असतात. तत्त्वज्ञान या 'No Man's Land' शी परिचय करून दिल्याबद्दल श्रीनिवास हेमाडे सरांचे या पुस्तकाबद्दल आभार मानावेत तितके कमीच आहेत.

मनःपूर्वक धन्यवाद सर!

❑




**राहुल पुंगलियाच्या कविता (१)**
**राहुल पुंगलिया**
**किंमत : ₹ ३२५/–**
**सवलतीत ₹ २५०/– ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

**संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा**
**९९२३७२४५५०**
**नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसअ‍ॅप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.**

**अकाउंट डिटेल्स :**
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

**किंवा**



# 'अधिसत्ता' ह्या कवितासंग्रहाच्या निमित्ताने

## चं. प्र. देशपांडे




नमस्कार! या कार्यक्रमाला आल्याचा मोठा लाभ झाला असे मी म्हणेन.

वक्ते सगळेच चांगले बोलले, परंतु त्यातील एक राहुल पुंगलिया जे बोलले त्याचा लेख तयार करून घेतला, तर तो मराठी साहित्याला केवळ आजच नव्हे तर कायमचा उपयोगी पडेल. कायम म्हणजे पाच-दहा वर्षं फारतर, पाच-दहा वर्षांनंतर सगळं खलासच होणार आहे. कारण काय आहे की, जसं स्पेशलायझेशन बाबत हेमाडे सर म्हणाले तसं- की, कविता ही जर त्या कवीपुरतीच मर्यादित राहिली तर ती तिथेच राहते. ती संपूर्ण मानवजातीला रेलेव्हंट होते का, प्रस्तुत होते का? होत असेल तर ती कविता असते, नाही तर मग ते आत्मनिवेदनासारखं काहीतरी असतं. सर्वांना प्रस्तुत असणाऱ्या साहित्याची निर्मितीच थांबली तर राहणार काय ?

आपल्याकडे वातावरण गेली काही वर्षं असं आहे आणि ते साहजिकही होतं म्हणा, कारण की अपरिचित अशा अनुभवांची कविता आली, वंचित समूहातून, दलित वर्गातून कविता आली, तिचं स्वागतही झालं. पण कालांतराने तो भर ओसरला. आता तुम्ही काय करणार? कविता अमूक अनुभव व्यक्त करते म्हणून ती श्रेष्ठ का? म्हणजे एखादा कवी धारावी झोपडपट्टीत राहतो, आणि तिथला अनुभव तो आपल्या कवितेतून मांडतो म्हणून ती कविता श्रेष्ठ म्हणायची का? आणि एखाद्या मध्यमवर्गीयाने लिहिलेली, किंवा ब्राह्मणाने लिहिलेली आहे म्हणून ती फालतू असते का? आपल्याकडे दुसरेही काही प्रश्न असतात की, कालबाह्य आणि कालसापेक्ष कलाकृती. खानोलकरांच्या एका कादंबरीमधला एक प्रसंग सांगतो, त्यामध्ये एक बाई दुकानदाराला 'दोन पैशांचे धणे द्या हो' म्हणते. आता दोन पैसे हे आज

विचार केला तर कधीचेच कालबाह्य झालेले आहेत. आता दोन पैशांत धणे काय, काहीच मिळत नाही, मग आता त्या कादंबरीचं काय? गेली का ती कामातून? झाली कालबाह्य? प्रश्न असा आहे की, त्या कादंबरीतून तो लेखक काय अनुभव मांडतो आहे, कवितेचं किंवा कादंबरीचं मटेरियल काय आहे, याच्यावर तिची श्रेष्ठता ठरत नाही. आता माझ्या एका नाटकात लँडलाईन टेलिफोन आहे. असा फोन आता कुणी वापरत नाही, मग आमचा तो दिग्दर्शक म्हणाला की, मी ते बदलतो आणि तिथे मोबाईल फोन वापरतो. मी म्हणालो की, अरे असे बदल तुम्ही करत गेलात तर मला ते संपूर्ण नाटकच तुम्हांला नव्याने लिहून द्यावं लागेल. असं नसतं, ऐतिहासिक नाटकातील, पौराणिक नाटकातील वेषभूषा तुम्ही बदलता का? परदेशातील तुम्ही 'सिक्स कॅरेक्टर्स इन सर्च ऑफ ऑथर' करता, किंवा 'वेटिंग फॉर गोदो' करता, तेव्हा त्यातील काय मॅच होत असतं तुमच्या आताच्या काळाशी? काहीच होत नाही.

ह्या स्पेशलायझेशनला धरून एक मुद्दा तुम्हांला मी सांगतो, आपल्या एका साहित्यसंमेलनाचा एक अध्यक्ष म्हणाला की, आता आपल्या ग्रामीण साहित्याने अभिजन साहित्याला आव्हान दिले आहे. अरे हा काय प्रकार आहे? कुस्त्या लावतो आहेस का वेड्या? कलेमध्ये आव्हान, प्रतिआव्हान हा काय मूर्खपणा आहे? अरे, तू संमेलनाचा अध्यक्ष आहेस, जरा काही तरी डोकं वापर. हे असं बोलणारे लोक आपल्या साहित्यसंमेलनांचे अध्यक्ष होतात. मी ह्यापूर्वी तीन साहित्य संमेलन अध्यक्षांचं भविष्य तीन महिने आधीच फेसबुकवर जाहीर केलेलं आहे, की हा गृहस्थ तिथे साहित्याविषयी एक ओळही बोलणार नाही. हे तिथे फक्त राजकीय बडबड करतील. हे असे लोक कशासाठी अध्यक्ष होतात? त्यांचं पहिलं वाक्य म्हणजे, साहित्याला राजकारण वर्ज्य नसतं! पुढचं सगळं भाषण राजकारण ह्या विषयावर ते करतात. साहित्य तिथंच राहतं, कारण त्यातील विविध प्रवाह, रिअलिझम, सर्रिअलिझम काही म्हणता काही ह्यांना माहिती नसतं आणि त्यात त्यांना इंटरेस्टही नसतो. अँटिपोएट्री का आली, ह्याचा त्यांना विचारच करायचा नसतो. त्यांना केवळ समाजपरिवर्तन करणे, प्रबोधन करणे एवढंच कलेचं काम वाटत असतं. असं वाटणं हे फार बाळबोध आहे हो. म्हणून पुंगलियांनी जो मुद्दा मांडला की, ज्या कलेचा उपयोग करता येतो ती कला मौल्यवान नसते, हे पटतं. उपयोगासाठी कला वापरणाऱ्यांना कलेशी काय घेणे असणार?

म्हणून हेमाडेसरांनी मांडलेला स्पेशलायझेशनचा मुद्दा आणि हा उपयुक्ततेचा मुद्दा विचारात घेतला तर, एखाद्या कलाकृतीचं वैश्विक पातळीवर रेलेव्हंट असणं हेच तिचं मौल्यवान ठरणं असतं. चिंधडे सरांनी आपल्याला जागतिक कवितेविषयी प्लेटो, होमरविषयी सांगितलं. आपला हा कार्यक्रम त्यामुळे निश्चितच दर्जेदार झाला. आता असं पाहा की, हे जे भूमिकावाले लोक असतात, त्यांचं सुरुवातीला ते सगळं चाललं. त्यांनी त्या बळावर काही पदं, जागा पटकावून घेतल्या. अर्थातच त्याचा परिणाम सबंध कलाक्षेत्रावर झाला. तो होणारच. आता अलीकडे पाहा, दलित लेखकसुद्धा फेसबुकवर पोस्ट देतात की मराठी साहित्यातून समीक्षक नावाचा प्रकारच हद्दपार झाला आहे. समीक्षकाला आपण काय करायचं आहे हेच समजत नाही. भूमिका घ्या, म्हणजे काय घ्या? भूमिका म्हणजे मी जी राजकीय विचारसरणी मानतो तीच तुम्हीसुद्धा माना. त्याला म्हणतात ते भूमिका! पुन्हा हीच माणसं असंही म्हणत असतात की, लिहिणारा प्रत्येकजण हा भूमिका घेऊनच लिहीत असतो, मग हे जर असं असेल तर, तुम्ही का म्हणता की भूमिका घ्या? भूमिका असतेच नं? तुम्हीच मान्य करता नं ? तर ते असं असतं की, भूमिका घ्या म्हणजे आम्ही म्हणतो ती भूमिका घ्या. इतकं संकुचित करून टाकलं आहे ह्यांनी कलेला. ह्यापलीकडे त्यांना डोकं चालवायचं नाही आणि दुसऱ्या कुणाला ते चालवू द्यायचं नाही.

ह्याचा परिणाम असा झाला की, समीक्षा गेली. मग साहित्याचं मूल्य म्हणजे काय? कशावरून ठरवायचं? 'अधिसत्ता' असा वजनदार शब्द वापरला म्हणजे ती कविता चांगलीच असेल असं समजायचं का? ते मी नंतर सांगेन. परंतु कशावरून ठरवायचं की एखादा कवितासंग्रह चांगला आहे किंवा एखादा वाईट आहे, ह्याची चर्चाच बंद झाली आहे समाजातील. ते निकष ठरवायचेच नाहीत. मग सुरू काय आहे? फक्त परिवर्तनवाद आणि भूमिका! ते कसे वाईट, आम्ही कसे चांगले. अरे, तुम्ही जर कलेतून तुमची मतं मांडायला लागलात, कवितेतून तुमचे अनुभव केवळ व्यक्त करायला लागलात तर ती खुजी होते. कविता लिहिणं म्हणजे केवळ माझं वैयक्तिक दुःखं तुमच्या डोक्यात उतरवणं असं होत नाही. आता तो कुणीतरी सापाच्या विषवाला पकडला. ते विष माफक प्रमाणात टोचून घेतलं की त्याची नशा दीर्घकाळ टिकते म्हणतात. तर मग कवितेतून हे करायचं आहे का? केवळ वैयक्तिक अनुभवाची, वैयक्तिक सुखदुःखाची कविता ही कलेच्या पातळीवर पोचत नाही. गटांसाठी कविता असा काही प्रकार असू शकतो? ही कविता ह्या ग्रुपसाठी, ती अनुभूती फक्त एखाद्या विशिष्ट समूहाचीच, म्हणून फक्त त्यांच्यासाठी असं होऊ शकतं का? कलामूल्य ह्या विषयावर विचारच करायचा नाही, त्याविषयी बोलायचंही नाही. मला एका लहान गावात मराठीचे प्राध्यापक असलेले एक गृहस्थ भेटले. मी विचारलं त्यांना की, काय असतं? येतात का मुलं मराठी साहित्याला? ते म्हणाले की, येतात, पण त्यांना साहित्य शिकवायचं म्हणजे काय शिकवायचं हा प्रश्न पडतो, इतकी रद्दी पुस्तकं अभ्यासाला लावलेली असतात. कोटा ठरवून पुस्तकं लावतात. मराठवाड्यातील हे हे लोक घ्या. एवढे दलित असलेच पाहिजेत, ब्राह्मण एवढे घ्या, ही मूल्ये असतात. मग ह्या मूल्यांवर आधारित तुम्ही पुस्तकं अभ्यासाला लावणार. हे असं होत राहिलं तर त्या भाषेची बरबादी अटळ असते. आणि पाच-दहा वर्षांत सगळं खलासच होणार आहे, असं जे मी आधी म्हणालो होतो, ते हेच आहे.

समाजातील पुरोगामी, बुद्धिमान, बुद्धिप्रामाण्यवादी लोकांनीसुद्धा ही कलाप्रक्रिया काय असते, हे समजून घेण्याकडेच पाठ फिरवली आहे.

आज तसं जास्त बोलायचं नव्हतं, कवितासंग्रहावर बोलण्याइतका तो मी पूर्ण वाचला नाही अजून, कारण कालच मला पीडीएफ मिळालं, त्यातील काही कविता मी वाचल्या.

आता ह्या संग्रहात काही ईश्वरविषयक कविता आहेत. हा कवी कधी त्या ईश्वराला हरामखोरही म्हणतो, कधी त्याला तळहातावरील फोडासारखा जपायचे आहे, असेही म्हणतो. आता ज्या अर्थी हा कवी दहा-बारा कविता ईश्वराविषयी लिहितो तेव्हा ईश्वर ही काहीतरी एक भानगड आहे, हे त्याच्या डोक्यात आहे. अंधश्रद्धा निर्मूलनवाले जे लोक असतात, किंवा त्यासंबंधी जो कायदा आहे, त्यामध्ये ईश्वरावरची अंधश्रद्धा बसत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगला पाहिजे असे आपण म्हणतो, तर मग त्यात हे बसतं का? जो कुणी मी वैज्ञानिक दृष्टिकोनवाला आहे असे म्हणतो, त्याने मनोजच्या ह्या कविता वाचाव्यात. तो संपर्क कसा होईल, हा प्रश्न मी उपस्थित करतो आहे. जर का कवी आपापल्या व्यक्तित्वाचीच कविता लिहीत राहिला तर दुसऱ्या पर्सनॅलिटीचा त्याच्याशी संबंध काय असतो? आणि जर असला तर तो कुठे येतो? असे काही प्रश्न मी उपस्थित करतो आहे.

मनोजच्या ह्या ज्या काही कविता मी वाचल्या- तर मनोज हा ढोंगी मनुष्य आहे. मी कसला कवी, माझं काही नाही, मी हे लिहिलं पण ती कविताच आहे का, मला नाही माहीत, असं तो म्हणतो तर तसं नाही, मनोज बनेल आहे, कविता खरंच चांगल्या आहेत. त्याच्या ईश्वरविषयक कविता ह्या कुठल्या धार्मिक मासिकात छापून येणाऱ्या भक्तीपर कविता नाहीयेत, तर वैयक्तिक अनुभवात, एकटेपणात

त्याचा जो ईश्वर ह्या संकल्पनेचा कन्सर्न आहे त्याची कविता झाली आहे. आता एखाद्या परिवर्तनवाद्याला जसं वाटतं की, हे असं असं असायला हवं, हे बदलायला हवं इत्यादी. तर तो झाला त्याच्या पर्सनॅलिटीचा भाग. ज्यावेळी तो इतरांनी मानला पाहिजे, सहन केला पाहिजे, अशी अपेक्षा असते, तर मग मनोजच्या पर्सनॅलिटीचा हा भाग त्यांनी सहन का करू नये? हे प्रश्न आहेत. मी ह्याची उत्तरे देणार नाही. मी प्रश्न उपस्थित करून, तुम्ही ती आपापली शोधावीत असे म्हणतो. ह्याचा अर्थ, कवितेतून, कलेतून असं काय प्रतीत होत असतं की, जे केवळ त्या कलावंताची पर्सनॅलिटीच सांगणारं नसतं तर, एस्केप फ्रॉम पर्सनॅलिटी सांगणारंसुद्धा असतं. फर्नांडो पेसोआविषयी गाओ झिंग झियान म्हणाला– त्याचं जे भाषण आहे, झिंग झियानचं नोबेल पुरस्कार घेतानाचं, ती आजची गीता आहे आपली–सगळ्या लिहिणारांची, असं मी म्हणेन. त्यात तो म्हणाला आहे की, पेसोआ हा विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ कवी आहे. मी पेसोआ वाचल्यावर मला झिंग झियानचं ते म्हणणं पटलं. तर तो पेसोआ, ज्याने बाहत्तर टोपणनावांनी लिहिलं, तो म्हणतो की, हे मी नाही तर ज्या टोपणनावाने ते लिहिलंय त्या व्यक्तित्वानेच ते लिहिलंय. ह्याचा अर्थ असा की, कविता किंवा कला ही केवळ प्रतिक्रियेत नसते. मला दुःख झालं, मनोजने माझा अपमान केला, म्हणून मी आता मनोजवर कविता लिहितो, ही कविता नसते. केवळ प्रतिक्रिया ही कविता होऊ शकत नाही आणि मराठीत तर गेल्या कित्येक वर्षांपासून केवळ अशीच कविता लिहिली जाते आहे. आणि म्हणूनच ती खुजी आहे. आपण नेहमी रडतो की, आपलं साहित्य जागतिक स्तरावर पोचत नाही. कला, साहित्य हा आपला हौसेचा, सणसमारंभाचा मामला होऊन बसला आहे. आपण अशा ठिकाणी जातो आणि काहीतरी महान सांस्कृतिक कार्य पार पाडून आलो आहोत, असे समजतो. प्रत्यक्षात आहे ते काय आहे? तुमच्यात कुणाला निरोप देताना हात थरथरला का? आता वयोमानानुसार माझा थरथरतो ते सोडा, ते नाही म्हणत मी. हात थरथरला म्हणजे त्या कलेतून असं काहीतरी प्रतीत झालं की तिनं जगण्याला स्पर्श केला. 'वेटिंग फॉर गोदो'सारखं नाटक जगभरात का जातं? तुरुंगातल्या कैद्यांपासून ते जगातील महान नाट्यसमीक्षकांपर्यंत ते महत्त्वाचं का होऊन बसतं, असा विचार करायला आणि हे प्रश्न विचारायला मराठीत बंदी आहे.

'एक शून्य बाजीराव' हे मराठीतील एक श्रेष्ठ नाटक आहे, म्हणजे मी ते तसं समजतो. ह्या नाटकाचे महाराष्ट्रात किती प्रयोग व्हावेत? नऊ प्रयोगांत ते नाटक संपलं. सत्यकथेने त्या नाटकावर विशेषांक काढला, तेव्हा त्यावर तत्कालीन अनेक महत्त्वाच्या लेखकांनी लिहिलं. आज अशी काही परिस्थिती दिसत नाही. सगळं विस्कळीत फुटकळ असं सुरू आहे काहीतरी. कळत नाही, अजून आपल्या पुरोगाम्यांना आधुनिक म्हणजे काय हेच कळलेलं नाही तर उत्तराधुनिक म्हणजे काय हे समजण्याचा तर प्रश्नच येत नाही. एका पुरोगाम्याच्या पुस्तकाला दुसऱ्या एका पुरोगाम्याने प्रस्तावना लिहिली. त्यात तो म्हणाला की, हे लिखाण उत्तराधुनिक आहे. मी त्याला विचारले की, हे मान्य आहे का तुला? उत्तराधुनिक म्हणजे– कशालाच अर्थ नाही, कशातच काही तथ्य नाही, वैश्विक असं काही नसतं, सखोल वगैरे काही नसतं, सगळं उथळ आणि फालतू असतं, त्यामुळे आहे ते स्वीकारून त्यात राहायचं. हे म्हणणं आहे उत्तराधुनिकतेचं. मग हे मान्य आहे का? तुम्ही तर पुरोगामी आहात बाबांनो. तुम्ही स्वप्नं पाहणारे आहात, तुम्हांला प्रगती करायची आहे. तुम्ही तरी एकमेकांना उत्तराधुनिक नका म्हणू. पण काही समजूनच घ्यायचं नाही मुळातून. हे जे स्वतःचं त्यांनी करून घेतलं आहे, तसंच अख्ख्या महाराष्ट्राचं व्हावं ही त्यांची इच्छा आहे. तो त्यांचा प्रयत्न आहे. ती माणसं, साक्षरता खूप वाढली आहे,

लिहिणारे वाढले आहेत, मराठीची चिंता करण्याची गरज नाही, तिची आता भरभराट होणारच आहे, म्हणत असतात. अरे बाबांनो, ही अशी भरभराट होत नसते. ह्यासोबत काहीतरी सांस्कृतिक प्रक्रिया घडून यायला हवी असते, सांस्कृतिक प्रक्रिया म्हणजे दिवाळीचा सण किंवा गणपती उत्सव नव्हे. सांस्कृतिक प्रक्रिया म्हणजे, आपलं चाललेलं आयुष्य समजून घेण्याची प्रक्रिया. ते न करता, मतं मांडणं, त्या मतांचा प्रचार करणं आणि तीच मतं इतरांनी स्वीकारली पाहिजेत, अशी अपेक्षा करणं हे सुरू आहे. मराठीभाषक जगात दहा–बारा कोटी आहेत, त्यामुळे ती भाषा काही लुप्त वगैरे होणार नाही, ती राहीलच. जगात ती ज्या काही आठव्या–दहाव्या स्थानावर आहे, तिथेच राहील. परंतु त्या भाषेची लायकी काय असणार आहे? त्या भाषेतून तुम्ही काय वाचणार आहात? काय लिहिणार आहात?

आता पुन्हा थोडं मनोजकडे वळतो. त्याच्या ईश्वरविषयक कविता ज्या आहेत, त्यात तो स्वत:ला अडकवून घेत नाही तर, त्याकडे सर्व बाजूंनी तो पाहतो आहे. तो त्याचं मत तुमच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करत नाहीये. एखाद्या अनुभवाला तो प्रयोगशाळेत नेऊन तपासून घेत नाहीये, तर त्या वेळचं त्याचं वाटणं हे तो मांडतो आहे, ज्याविषयी त्याला स्वत:लाही काही खात्री वाटत नाही. तो त्याचे मत वा भावना तुमच्या गळी उतरवत नाहीये. त्यामुळे त्या कवितेचा आशय विस्तारतो. प्रत्येक कवीच्या अनुभवाचं एक क्षेत्र असतं, त्याचा एक विषय असतो. कवितेचं अनुभवक्षेत्र काही मोठं नसतं, ते लहानच असतं, पण कवी त्या अनुभवातून मांडतो काय हे अमर्याद असतं. म्हणजे माझ्या व्यक्तिमत्त्वाचं जे केंद्र आहे, ते तसंच जगातल्या अनेक कलावंतांच्या व्यक्तिमत्वाचंसुद्धा केंद्र असतं, परंतु मराठीतील भंगार वातावरणात जगभरातील असे मोठमोठे कलावंत हे कुचकामी ठरतात, कारण काय तर ते बुद्धिप्रामाण्यवादी नसतात. आता हेमाडे सरांसमोर तत्त्वज्ञ ह्या विषयावर मी बोलणं योग्य नाही, परंतु जसं त्यांनी प्लेटोचं उदाहरण दिलं की, तो तत्त्वज्ञ होताच, तसेच कवितासुद्धा लिहीत होता. कवीचं स्वत:चं एक तत्त्वज्ञान असतं, परंतु तो ते शिस्तबद्ध पद्धतीने पायऱ्यापायऱ्यांनी मांडत नसतो. कवीचं तत्त्वज्ञान हे त्याच्या आकलनात असतं, त्यातून ते प्रतीत होत असतं. तो ते तत्त्वज्ञान म्हणून मांडतही नसतो, आणि शेवटी तत्त्वज्ञान म्हणजे तरी काय, माझ्यापलीकडं ह्या जगण्यात आणखी काही आहे का? की, मी असा असा घडलो, माझ्या कॉम्प्युटरच्या कमांड ह्या अशा अशा आहेत आणि म्हणून मी असा असा असणार आहे. हेच आहे का मग आयुष्य? हा तुरुंग? असे प्रश्न कलावंताला पडत असतात. पडले पाहिजेत. परंतु मराठीतील कलावंतांना हे प्रश्न पडतात का? पडत नाहीत, पडणारही नाहीत. जागतिकीकरणामुळे कोणत्या समाजघटकांना काय फायदा झाला, कोणाला झाला नाही, आणि जागतिकीकरणाऐवजी काय व्हायला हवे, ह्याविषयीची मतमतांतरे मांडून, आपली मते बरोबर समजणे ह्यापलीकडे काही नाही. बाकी ह्यापलीकडे आपल्याला माणसाच्या जगण्यात काही रुची असणार आहे की नाही?

पीटर शेल्डाल नावाचा एक कवी आहे, मला त्याची कविता फार आवडते. तो म्हणतो– बाळगत नाही मी माझी मते काही तासांहून जास्त काळ. आता मग ह्या मनुष्याचं काय करणार आहात तुम्ही? रद्द करायचं त्याला, कारण की, तो काही भूमिकाच घेत नाही म्हणून? असं सगळं सुरू आहे. असो, मनोजच्या संग्रहाच्या निमित्ताने हे काही विचार मी मांडले, त्यात कदाचित काही चुकलंही असेल तर ते लक्षात आणून द्या, पण पुन्हा एकदा सांगतो की, इथे येण्याचा व्यक्तिश: मला फार लाभ झाला. चांगलं ऐकायला मिळालं. विशेष म्हणजे पुंगलियांचं जे भाषण आहे, त्याचा लेख तयार करून घेतला पाहिजे. ते म्हणतात की जगण्याच्या प्रश्नांचे साहित्य आणि त्याचे महत्त्व वाटणारे लोक कमी कमी होत चाललेले आहेत. हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मराठी साहित्याचे जर कुठे चौक असतील, तर त्या चौकाचौकात या

भाषणाचा तो लेख लावला पाहिजे. लोकांना सांगितले पाहिजे की, मराठीचं काही भलं करायचं असेल तर, हे वाचा आधी, नाही तर वाट लागेल. मराठीतील सूक्ष्म अर्थांच्या छटा असलेलं असं काही तुम्ही वाचणार नसाल, अभ्यासणार नसाल, तर त्या भाषेचं काय होणार मग? क्रमवारीत नोंद म्हणून ती शिल्लक राहील केवळ. असो. थोडावेळ तुमच्यासोबत गप्पा मारता आल्यामुळे आनंद झाला. धन्यवाद!

❑

(भावार्थ, पुणे येथे दिनांक २१/३/२४ रोजी केलेल्या भाषणाचे शब्दांकन)





**तत्त्वभान**
**श्रीनिवास हेमाडे**
**किंमत : ₹ ६८०/-**
**सवलतीत ₹ ६००/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**

संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा




**खट्टरकाकांचे विनोद-आख्यान**
**हरिमोहन झा**
**अनुवाद : वसंत केशव पाटील**
**किंमत : ₹ ४२४/-**
**सवलतीत ₹ ३५०/- ला पोस्टेजसह घरपोच मिळेल.**


संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स,
शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५०
हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच
कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# 'नदीष्ट'
## नंदिनी देशमुख



नदी आपल्या धुंदीत वाहते. वाटेत तिला गावे भेटत जातात. निरनिराळी, वेगवेगळ्या स्वभावांची. त्यांची नदीशी सलगी होते... मैत्री होते, घट्ट बिलगावे अशी. नदीत पाय सोडून बसल्यावर जाणवते की, नदी त्यांची आप्त, इष्ट नात्याची होऊन गेली आहे. नदीच्या पोटात अनंत माया आहे; तशी काही गुपितेही आहेत. कधीतरी भरल्या मायेपोटी ती बाहेर येतात. त्या समयाची वाट पाहावी लागत नाही. ते आपोआप घडून येते, नकळत... अचानक. नदीवर पूल असतो. त्याचे पायसुद्धा नदीतच बुडलेले असतात. तोही नदीला समजून घेत असतो. तिच्या डोहात असलेली जीवघेणी घुसमट त्यालाही थोडीफार चाटून गेलेली असते. पुलाचे पाय खूप खोलवर जाऊ नाही शकत. पण त्यांना दूरवरून दिसते, नदीतल्या भोवऱ्याची भोवंडून गेलेली गर्द नशा... त्यांचे काळीज गलबलते, मन डहुळते. जागच्या जागीच डगमगतात ते, नंतर पुन्हा स्थिरावतात.

'नदीष्ट' कादंबरीतील अशीच काही मायाळू माणसं, त्यांच्या अद्‌भुत विश्वात जगणारी असून ती केव्हातरी अकस्मात आपल्याशी आगळा अनुबंध जोडतात. सगुणाचे काठोकाठ भरलेले अंतःकरण खुले होते, नदीच्या आश्वासक लाटांच्या मनसोक्त हुंकारांमुळे. भरून आलेले मन मोकळे होऊन जाते; समोरच्या व्यक्तीच्या प्रामाणिक प्रतिसादाच्या खात्रीने! या जगात फक्त दोनच प्रकारच्या माणसांना जगण्याची मुभा दिली जाते. पुरुष आणि स्त्री. त्याशिवाय वेगळे असणारे अस्तित्वच नाकारले जाते. तोंड लपवून किडामुंगीपेक्षा वाईट जगणं वाट्याला येते. साधारण मनुष्यांप्रमाणे भर गर्दीत सन्मानाने तर जाऊ द्या, एखाद्या झुरळासारखं उडून जाऊन टाळताही येत नाही. आपले असणे एखाद्या कळकट

गाठोड्यासारखे वागवावे लागते. धड फेकूनही देता येत नाही, तसंच काखोटीला मारणंही नको वाटते. कसातरी मार्ग काढत पाय ओढत जावे लागते. भिकाजीचे जीवन असते अतिसामान्य माणसासारखे; पण एका अनपेक्षित, अघटित प्रसंगामुळे ते जीवन त्याच्यासाठी गुन्हेगाराचे दुःसह, अपराधी जगणे होऊन जाते. त्याला स्वतःलाही तोंड दाखवता येत नाही, त्याविषयी दुसऱ्यांना काय सांगणार? अशा अनेक 'वाउगेचि ओझे' बाळगून जगत राहणाऱ्या जिवांची जड झालेली आयुष्ये या नदीच्या पुढ्यात पडून राहिलेली आहेत. त्यांचे गाऱ्हाणे नदी ऐकते, क्वचित त्यांची समजूतही घालते. पुन्हा वाहू लागते, तिचा प्रवाह अडून राहत नाही. त्या प्रवाहपतितांना अंतःकरणात सामावून घेत ती पुढचा प्रवास चालू ठेवते. पाणी वाहत पुढे जात राहते, तरीही नदीचे पात्र त्याच जागी खिळून आहे असं आपल्याला दिसत राहते. आयुष्य पुढे जात असले तरी अनुभूती मात्र एकाच ठिकाणी साचून राहिलेल्या असतात.

जिवाची पर्वा न करता साप, नाग यांना शिकस्तीने धरून ठेवणारा, युक्तीने व चपळाईने त्यांना आपल्या जिवाची बाजी लावून पकडणारा, प्रसंगी जिवाशी खेळून सापाला घट्ट दाबून ठेवत, सोडून जाऊ न देता हुलकावणी देत, चकवत, बरणीत बंद करणारा प्रसाद... त्याचं जगणं किती अनिश्चित, एखाद्या सापासारखंच सळसळत क्षणात नाहीसे होऊ शकणारे. अशा एकेक विलक्षण मानवी जगातल्या विचित्र घडामोडींच्या आयुष्यांचे ताळेबंद काढायला जावे तर आपले डोके सुन्न होऊन थांबेल. अशा हकिकती अख्ख्या जन्मात कधी ऐकल्या, पाहिल्या नसतील, त्या वाचताना मेंदू बधीर तरी होतो किंवा साक्षात् झिणझिण्या येतात. अशीही माणसं, असंही जगणं असतं?

पांढरपेशांना लहानपणीच आयुष्याची शिकवण देणं सुरू होतं. शिक्षण, नोकरी, लग्न, मुलंबाळं, घर, संसार, मुलांचा अभ्यास, खेळ, छंद, सिनेमा, फिरणे, खादाडी, मुलांची लग्ने, नोकऱ्या, परदेशप्रवास, म्हातारपण या सगळ्यांची पाहूनच सवय झालेली असते तरी मोठ्यांचे ऐकून घ्यावं, जाणावं, समजावं, पचवावं, तसंच वागावं... यांसाठी सतत शिकवणे चालत असतं. सगुणा, भिकाजी किंवा प्रसाद या माणसांची आयुष्ये अशा कोणाच्या शिकवण्या-सांगण्याने सरळमार्गी होतील? त्यांची तेच वाट शोधत, धडपडत, ठेचकाळत, कुठल्या तरी रस्त्याला लागतात. जशी वेळ येईल, प्रसंग सामोरा येईल तसं तोंड देत जगतात... चूक का बरोबर हा मुद्दाच नसतो तिथे, सुचेल ते ओढून नेतात. ना आई-वडिलांचा सहवास, ना भावंडांची सोबत, ना कुणी जोडीदाराची साथसंगत, ना मार्गदर्शकांचा पाठिंबा. जगण्याला थेटच भिडतात आणि त्यातूनच एकेक वाटा त्यांना सापडत जातात. सुख, दुःख, वेदना, आनंद या सगळ्या भावना जिरून जातात जगताना. त्यांचे अनुभव कसे खट्कन पुढे येऊन ठाकल्यासारखे अंगावर येतात.

हे काही अनवट पथ, निराळ्या अर्थी चाकोरीबाहेरची जीवने मराठी साहित्यात चितारलेली कधी माहीत नाहीत. लेखकाने हे आगळ्या व्यक्तींचे अनुभव स्वतः नक्कीच जवळून पाहिले असावेत असे वाटण्यासारखी चित्रमय वर्णने लिहिलेली आहेत. त्यांची कासाविशी, व्याकुळता स्वतःलाच जाळून काढल्याइतकी खरीखुरी वाटावी इतकी कादंबरीची भाषा विदारक अनुभूती देऊन जाते. लेखकाने हा मनोव्यापारांचा प्रवास हळूहळू उलगडत आणला आहे आणि आपल्यापाशी त्याचे हृद्गत तो मुक्तपणे मांडत आहे. ओघवत्या भाषेतले त्याचे मुक्तछंदातले दीर्घ लेखन आपल्यातल्या मानवतेला झटका आणि फटका देणारे आहे.

लेखकाप्रमाणे वाचकही पुरा त्यात अडकून जातो. तोही सगुणाला स्वतःचीच दोस्त मानायला लागतो, कारण तीही नदीष्ट असते. सगुणाच्या घरच्यांना भेटून सगुणाचे हालहवाल सांगावे असे

लेखकाबरोबर आपल्यालाही वाटायला लागते. पण मग भीतीही मनात येते. घरच्यांनी ओळख दाखवली नाही तर? आपले ऐकून घेतलं नाही तर? हाकलून दिलं तर? समाज सगुणाला माणूस का नाही समजत? सगुणालाही पोट आहे, तिचं शरीर माणसाचंच आहे. पोट भरण्यासाठी हातपाय चालवण्याचा हक्क सगुणालाही आहे, मग का नाही वापरायचा तिने तो? समाजात सन्मानाने का जगता येत नाही अशा अनेक सगुणांना? त्यांच्यावर देशभर हिंडायची वेळ का येते? ठरावीक गावांमधल्या विशिष्ट ठिकाणीच त्यांची वस्ती का असते? स्वाभिमान सोडून भीक मागत का फिरावं लागतं त्यांना? स्वतःचा स्वतंत्र चेहरा का नसावा त्यांना? अपंगांना जसे मदत करून वा सवलती देऊन समाजात सामावून घेतले जाते, तसे या तृतीयपंथीयांना का नाही? तेही आपल्या सर्वसामान्यांसारखे आयुष्य का जगू नाही शकत?

एवढे भारंभार प्रश्न लेखक मनोज बोरगावकर यांच्या लेखनामुळे वाचकाच्या मनात उत्पन्न होतात, त्याला भंडावून सोडतात, त्याचा पिच्छा पुरवतात. नदीपाशी येऊन तिच्या कुशीत शिरूनही उत्तरं पुढ्यात येत नाहीत. नियती, नशीब, दैव, दुर्भाग्य या सगळ्या माणसाने शोधलेल्या सबबी आहेत. मनात आणलं तर माणूस इकडचे जग तिकडे करू शकेल. त्याची इच्छाशक्ती सगुणा, प्रसाद किंवा भिकाजी यांच्यासाठी कार्यरत झाली तर तसे होईलही. माणूस इतर माणसांना स्वतः सारखे कधी समजेल? माणसाने माणसाशी माणसासम वागणे, हे प्रत्यक्षात कधी दिसेल? प्रत्येकाच्या आत्म्यात चेतनातत्त्व एकच असूनही हे असे बाह्य/शारीरिक भेदाभेद महत्त्वाचे का गणले जातात? लेखनातले हे अध्याहृत असलेले मुद्दे वाचकाच्या मनात घोंगावत राहतात, अस्वस्थता निर्माण करतात. लेखकाच्या साध्यासरळ कथनशैलीतून वाचकाला जबरदस्त आणि बिनतोड अशी चमत्कारिक निरुत्तरता प्रत्ययाला येते. वाचक त्या प्रश्नांपासून धड पळूनही जाऊ शकत नाही, ते प्रश्न त्याचा पाठलाग करतच राहतात. निसर्गाची किमया माणूस का ओलांडू धजत नाही?

काही देशांमध्ये तृतीयपंथीयांना कायद्यांद्वारे सुरक्षित व सुखी जीवन जगण्याची तरतूद असते, तशी भारतानेही केली असली तरी भारतीय जनतेची मानसिकता अशी विचित्र आहे की ती या निरागस जिवांना शांततेने जगू देत नाही. त्यांचा असा काय अपराध असतो की साधं-सोपं जिणं त्यांना दुश्वार झालेलं असतं? अत्यंत संवेदनशील मनाच्या या निवेदकाला त्यांच्याबद्दलची काळजी नेहमी वेढून राहिलेली असते. प्रसाद आणि भिकाजी यांच्यासारखे जीव कसेतरी तग धरून जगत असतात. भिकाजीच्या भूतकाळाचे सावट त्याच्या अख्ख्या आयुष्यावर पडलेले असते. प्रसादचा भविष्यकाळ त्याला भिववून सोडत असतो आणि सगुणाचा वर्तमानकाळ एवढंच तिचं जगणं होऊन गेलेलं असतं. भूतकाळ आठवून सुखावण्याचीही तिला परवानगी नसते, भविष्यकाळाचा तर विचारही मनात आणवत नाही. आजचा दिवस कसाबसा जातोय, हेच उद्दिष्ट पार पाडल्यासारखं ती जगत असते. इतर साधारण मनुष्याप्रमाणे सगुणा आयुष्याचा कोणी एक जोडीदार निवडून त्याच्या साथीने जीवन घालवायचे ठरवूच शकत नाही. तिला तिच्यासारख्याच अनेकांच्या घोळक्यात राहून समूहजीवन जगणे प्राप्त असते. कुटुंबाने तिला हुडकून काढून घरी आणले असते, आधार दिला असता तर असे रस्त्यावरचे भटके जीवन जगायची वेळ तिच्यावर का येती? अशा सगुणांसाठी देशाने कायदे करण्याची, समाजाने समजून घेण्याची आणि कुटुंबाने तिचे मानसिक बळ वाढवण्याची गरज आहे.

पुस्तकाची लेखनशैली वरवर सरळ भासली तरी ती तितकी सरळ नाही. तिच्या रेषांच्या अधेमधे जे दिसते ते अंतःकरणात करुणा जागवणारे व हरवलेले कितीतरी मोलाचे असे काही सापडू शकते.

निवेदक नदीत पोहण्यासाठी रोजच पहाटे किंवा क्वचित संध्याकाळी येत असतो. तेव्हा सगुणा किंवा भिकाजी त्याला त्या जागी भेटतात. त्यांचे जगणे नदीच्या पाण्यासारखे स्वच्छ व वाहत नसल्याची त्यांना खंत असते, ती कायमच राहणार असते. त्याचे दुःख निवेदकही बाळगून असतो. त्यासाठी काही करावे असे त्यालाही वाटत असते, पण काय ते मात्र समजत नसते. त्याची असमर्थता त्याला आणखी दुखवत असते, पण याला काही इलाज नसतो. निवेदक त्यांच्या दुःखात डुंबल्यासारखा नदीत डुंबतो आणि काही वेळानंतर नाइलाजाने त्याला बाहेर यावेच लागते. जणू काही त्यांचा हताशपणा आणि दौर्बल्य नदीत मिसळून गेले आहे, नदीबरोबर तेही वाहत जात आहे. ते संपत नाही, तात्पुरते दृष्टिआड होते आहे. पुन्हा नंतर कधी ते भेटेलच, सतत ते असल्याची जाणीव मात्र अखंड होत राहणार आहे.

रोज नदीजवळ आल्यावर सगुणाला आठवणे हा दिनक्रमच होऊन गेलेला आहे. सगुणाची निवेदकाशी भेट तशी आगगाडीच्या डब्यात, चढता-उत्तरताना, फलाटावर ओझरती होत असे पण सर्वांसमोर त्याला आपल्याशी बोलायची वेळ येऊ नये अशी काळजी सगुणाच घेत असे. स्वतः साठी त्याने समाजाचा त्रास का सहन करावा, या विचाराने सगुणाच 'नदीकडे भेट' हे हळूच सांगून दूर जात असे आणि मग नदीजवळ अगदी मनभर बोलून मन मोकळे करत असे. भेटीची उत्सुकता निवेदकालाही असे. आज आणखी काय ते अचंबित करणारे ऐकायचे आहे, असे त्याला वाटत असे. स्वतःबद्दल निवेदक कधीही काहीही बोलत नाही. त्याच्या मनात नेहमीच नदी आणि केवळ तिथेच भेटणारी ही तीन असाधारण माणसे याबद्दलचे विचार सतत घोळत असतात. त्याची मती तिथेच कुंठित झाल्याप्रमाणे तोही पुन्हा पुन्हा नदीपात्राकडे धावत राहतो. नदीत भोवरे तयार होतात, तसेच त्याचे ते विचार भोवऱ्याप्रमाणे गरगरत राहतात. पोहताना नदीतल्या खोल डोहसदृश भागात निवेदकाने जाऊ नये, त्यात तो हरवून जाऊ नये यासाठी सगुणा सतर्क राहून त्याला काठावर येण्यासाठी विनवणी करत असे. सगुणाच्या मनातली ही त्याच्या जपणुकीची जागरुकता त्याला भानावर आणत असे. एका दृष्टीने सगुणामधल्या आत्मतत्त्वाची पोषकता निवेदकाला स्वतःच्या जिवंत प्रतिमेसाठी लाभदायी ठरत जाते, त्याचे आत्मतत्त्व त्यामुळे बलवान होत जाते.

अशा प्रकारची ही मराठीतली पहिलीच कादंबरी असावी. येणाऱ्या काळात अशा लेखनाला अन्योन्य असे महत्त्व प्राप्त होणार हे निःसंशय! त्या दृष्टीने 'नदीष्ट' मैलाचा दगड ठरू शकेल एवढे मोल खचितच या लेखनाला मिळू शकते.

या लेखनात अनेक हिंदी व उर्दू शब्द येतात. नांदेड जिल्ह्यातील बोली त्यात कित्येकदा वाचायला मिळते. कृत्रिम संवादांपेक्षा नितळ निवेदन स्वच्छपणे समजून घेता येते. नदीच्या वाहत्या पाण्याच्या सान्निध्यातही निखळ सत्याचे दर्शन त्याच्या स्पष्ट प्रतिबिंबासह सामोरे येते. नदी हे या पुस्तकातले महत्त्वाचे पात्र तर आहेच पण नदीकाठ हाही एक जिवंत व्यक्तिरेखेसमान असावा, इतके त्याचे चित्रदर्शी वर्णन प्रत्ययकारी आहे. जगण्यातले प्रवाहीपण नदी शिकवते. पुढे जाता जाता क्षणभर टेकून देवाणघेवाण करावी, हे नदीकाठ सांगतो.

चालणे अखंड, जगणे अखंड... नदी वाहत राहते हे इष्ट, नदीसारखे पुढे जात राहावे हेच इष्ट! इती नदीष्ट!!

ग्रंथाली प्रकाशनाने मनोज बोरगावकरांसारख्या नवोदित लेखकाचे हे विलक्षण लेखन प्रकाशित केल्याबद्दल त्यांचे व लेखकाचेही आभार मानले पाहिजेत.

(पूर्वप्रकाशित, पंचधारा, जून २०२२)

पुस्तक – नदीष्ट (कादंबरी)
प्रकाशक – ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
लेखक – मनोज बोरगावकर
पृष्ठे १६४, किंमत २००रु.


❑




पूर्वप्रभा आणि पश्चिम आभा
शिरीष चिंधडे
४२४/–
पुस्तक आढावा–ओळखपर लेख




लकडी पूल ते लंडन पूल
शिरीष चिंधडे
४८४/– प्रवासवर्णन




जगावेगळी जीवने
शिरीष चिंधडे
३२४/– निबंध




सृजनस्रोत
शिरीष चिंधडे
४२४/– ओळखपर लेख

संपर्क : वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, जिल्हा बुलढाणा
९९२३७२४५५०
नमूद केलेला मोबाईल नंबर ९९२३७२४५५० हाच व्हॉटसॲप नंबर आहे, पत्ता त्यावरच कळवता येईल.

अकाउंट डिटेल्स :
VARNAMUDRA PUBLISHERS
HDFC CURRENT A/C No.
50200047627114
IFSC : HDFC0002817
BRANCH : SHEGAON
**OR**
GPAY
9923724550 MANOJ PATHAK

किंवा



# चित्रपटांतील स्त्री प्रतिनिधित्व, मानधन आणि प्रेक्षकपसंतीचे मानसशास्त्र

अद्वैता देशमुख

अपवादामुळे नियम आणखीच स्पष्ट होतात असे म्हणतात. अगदी तसेच विद्या बालन आणि नंतर काही प्रमाणात दीपिका पदुकोण व कंगना राणावत यांच्या उठून दिसणाऱ्या कारकीर्दीमुळे सध्याचे स्त्री कलाकारांचे चित्रपटक्षेत्रातील एकंदर दुय्यम स्थान अधोरेखित झाले. आवडो किंवा न आवडो, चित्रपटांचा जीवनावर आणि जनमानसावर होणारा परिणाम नाकारता येत नाही. कला ही समाजाचे प्रतिबिंब दाखवते, त्याच वेळी समाजाला पुढे नेण्याचीही कामगिरी करण्याची क्षमता तिच्यात असते, हे तितकेच खरे. त्यामुळे स्त्रीवादाची सद्यस्थिती आणि समकालीन प्रश्न झिरपत झिरपत या क्षेत्रातही उमटलेले दिसतात. जगभरात समान कामाबद्दल दिल्या जाणाऱ्या मानधनात स्त्री–पुरुषांमध्ये अजूनही आश्चर्यकारक दरी आहे (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम ग्लोबल जेंडर गॅप अहवाल, २०२०). चित्रपटक्षेत्रातील आकडेवारी पाहिली तर स्टॅटिस्टा वेबसाईटवरील माहितीनुसार, २०१९ साली सर्वाधिक मानधन मिळालेल्या दहा कलाकारांच्या यादीमध्ये केवळ एक नाव महिलेचे आहे (आलिया भट). तसेच सर्वाधिक मानधन मिळालेल्या दहा पुरुष व दहा स्त्री कलाकारांची यादी वेगवेगळी पाहिली असता, पहिल्या स्थानावरील पुरुष कलाकाराच्या एक चतुर्थांश मानधन पहिल्या स्थानावरील स्त्री कलाकाराला मिळालेले आहे. सरासरी मानधनांमध्येही (६९.४ कोटी रुपये व २३.५ कोटी रुपये) जवळजवळ तिपटीचा फरक आहे. (हेही पहा) तारकांच्या आणि आता ताऱ्यांच्याही मुलाखतींमध्ये

याबद्दल नाराजी व्यक्त केली जाते. ॲक्ट्रेसेस राउंडटेबल, (२०१८). विशेषतः कहानी, पिकू व क्वीनसारख्या चित्रपटांपासून. परंतु पुरुषकेंद्री कथांच्या तुलनेत ते उणेच आहे.

पुरेशा स्त्रीकेंद्री कथा पडद्यावर न येण्याला कारणीभूत म्हणून बहुतांशी बॉलिवुडच्या निर्मात्यांकडे बोट दाखवले जाते. पण निर्माते व गुंतवणूकदार हे बाजारपेठेचा भाग आहेत आणि इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणेच चित्रपटांचीही बाजारपेठ चालते. म्हणजे निर्मिती ही मागणीनुसार केली जाते आणि स्त्रीकेंद्री चित्रपटांचा एकूण मागणीतील हिस्साच कमी आहे. याचा अर्थ सामान्य प्रेक्षकही परिस्थितीला जबाबदार आहे. प्रेक्षक स्त्रीकेंद्री चित्रपटांना कमी पसंती देतात, त्यातून मिळणारे उत्पन्न तुलनेने कमी असते, त्यामुळे भविष्यात अशा चित्रपटांकडून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अंदाजही कमीच असतात व परिणामी त्यांमध्ये गुंतवणूक कमी केली जाते. अर्थातच अशा चित्रपटांच्या नायिकांना मानधनही कमी असते. या दुष्टचक्राचा पुढचा भाग म्हणजे पडद्यावर स्त्रीकेंद्री चित्रपट कमी येतात आणि असे चित्रपट पाहण्याची इच्छा/शक्यता असणाऱ्या प्रेक्षकांनाही नाइलाजाने असलेल्या पर्यायांमधूनच निवड करावी लागते. याचे पडसाद पुन्हा पुढील बजेट व गुंतवणूक अंदाजांमध्ये उमटतात. कोव्हीडमुळे सध्या चित्रपटगृहे बंद असली तरी चित्रपट व मनोरंजनाच्या इतर माध्यमांमध्येही प्रवाह साधारण असेच आहेत. इथे दोन महत्त्वाचे मुद्दे असे की स्त्रीकेंद्री चित्रपटांची प्रेक्षकसंख्या कमी आहे, तसेच 'सुपरस्टार' श्रेणीत मोडणाऱ्या व ज्यांच्यावर पैसा लावण्यात कमी जोखीम असते, अशा थिएटरमध्ये गर्दी खेचून आणणाऱ्या कलाकारांमध्ये पुरुष अधिक आहेत.

आता प्रेक्षकपसंतीच्या टप्प्यावर मानसशास्त्रीय दृष्टीने या प्रश्नाचा अभ्यास करता येऊ शकतो. अगदी प्राथमिक बाब ही आहेच की थिएटरमध्ये जाऊन किंवा ऑनलाइन प्लॅटफॉर्मची वर्गणी भरून फिल्म्स पाहणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या आर्थिक व गमनशीलतेवरील (मोबिलिटी) मर्यादांमुळे कमी असते. पण याशिवाय इथे प्रेक्षकांच्या लिंगभावाशी संबंधित दोन सिद्धांत मला मांडायचे आहेत :

पुरुष प्रेक्षक पुरुषपात्रे / नायक असलेल्या चित्रपटांना अधिक प्राधान्य देतात.

स्त्री प्रेक्षक नायिकाप्रधान व नायकप्रधान चित्रपटांना समान प्राधान्य देतात किंवा निदान नायिकाप्रधान चित्रपटांना त्यांचे असलेले प्राधान्य पुरुषांच्या प्राधान्याइतके तीव्र नसते.

हे सिद्धांत तपासून पाहण्यासाठी एक साधा अभ्यास केला. ओळखीतल्या वेगवेगळ्या वयोगटातील दहा पुरुष व दहा स्त्रियांना मागील वीस वर्षांतील त्यांचे सर्वांत आवडते/सर्वांत लक्षात राहिलेले पाच चित्रपट विचारले. पाचपेक्षा अधिक सांगण्याची मोकळीकही दिली. या चित्रपटांची नायिकाप्रधान (मुख्य भूमिका स्त्री) व नायकप्रधान (मुख्य भूमिका पुरुष) अशी वर्गवारी केली. त्याचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

| | **महिला निरीक्षक** | **पुरुष निरीक्षक** |
|---|---|---|
| सांगितलेल्या चित्रपटांची एकूण संख्या | ५२ | ७६ |
| त्यापैकी नायिकाप्रधान चित्रपटांची संख्या | २० | १० |
| त्यापैकी नायकप्रधान चित्रपटांची संख्या | ३२ | ६६ |
| नायिकाप्रधान चित्रपटांची टक्केवारी | ३८.४६ | १३.१६ |
| नायकप्रधान चित्रपटांची टक्केवारी | ६१.५४ | ८६.८४ |

दोन्ही प्रेक्षकांनी सांगितलेल्या चित्रपटांमध्ये नायकप्रधान चित्रपटांची संख्या अधिक आहे, याचे कारणही मुळातच उपलब्ध चित्रपटांच्या परिस्थितीत मुलीही असे चित्रपट पाहणे कमीपणाचे समजू लागल्याचे मी पाहिले आहे. पण एकंदरच पुरुषकेंद्री कथा, चित्रपट, मालिका वाचणे व पाहणे याकरिता स्त्रियांना जितक्या नकारात्मक परिणामांना तोंड द्यावे लागते, त्याच्या कैक पटींनी लाज व न्यूनत्वाची भावना स्त्रीकेंद्री चित्रपट पाहणाऱ्या पुरुषांना अनुभवावी लागते. (येथे एक दूरान्वये संबंधित पण महत्त्वाची नोंद अशी की, पुरुषाला समाजाकडून होणारी ही शिक्षा या हेतूने होते की तो पुरुष असल्यामुळे स्त्रीसारखे वागणे त्याच्यासाठी हीन आहे, तो यापेक्षा अधिक उच्च महत्त्वाकांक्षा बाळगू शकतो. स्त्रीला समाजाकडून होणारी शिक्षा या हेतूने होते की, ती स्त्री असल्यामुळे तिने फार महत्त्वाकांक्षी नसावे व पुरुषी जबाबदाऱ्या तिच्या तोंडचा घास नव्हे. मुळात स्त्रीगुणांनाच कमी दर्जा दिला जातो.)

तिसरा मुद्दा हा चित्रपटांमधील आशयाचा कोणता प्रकार लोकप्रिय आहे, हा आहे. याचेही मूळ पुरुषप्रधान समाजातच असले, तरी सखोल अभ्यासाच्या दृष्टीने हा दुसऱ्या मुद्द्यापेक्षा अलग काढायला हवा. समाजात लोकप्रिय कथा, आशय व संकल्पना या नेहमी युद्ध, कलह, दुर्बलांचे रक्षण, सत्याचा विजय, कायद्याविरुद्ध जाऊन केलेले सत्कार्य, सामर्थ्यप्रदर्शन यांचा गौरव करतात. प्रेमकथांना ग्लॅमर आहे, पण त्यातही नायकाने 'पुरुष' ही भूमिका परिपूर्णपणे निभावली व नायिकेने 'परिपूर्ण स्त्री' होऊन दाखवले, तर प्रेमकथा अधिक लोकप्रिय होते. अन्यथा 'रॉमकॉम' (रोमँटिक कॉमेडी म्हणजेच हलकीफुलकी प्रेमकथा) पाहणे म्हणजे इतर प्रकारांच्या तुलनेत बिनमहत्त्वाचे मनोरंजन समजले जाते. आता अशा लोकप्रिय संकल्पना पुरुषपात्रासाठी अधिक अनुरूप असतात, कारण समाजाचे प्रतिबिंब चित्रपटात पडत असल्याने पोलीस, बॉडीगार्ड, राजकारणी, गुंड, डॉन, गुप्तहेर, वकील, शास्त्रज्ञ, उच्चपदस्थ अधिकारी, प्राध्यापक, राजे-सरदार रुजलेले आहे. पण टक्केवारी पाहता वरील दोन सिद्धांत खरे असल्याचे पटते. अर्थातच अभ्यास अत्यंत अल्प समूहावर केला आहे, ही उणीव आहे. पण मग या प्रेक्षकपसंतीमागची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला.

पहिला मुद्दा असा की, चित्रपट आवडण्यासाठी मुख्य पात्राशी भावनिक पातळीवर जोडले जाणे किंवा तदनुभूती वाटणे (सहानुभूतीच्या वरील पायरी/एम्पथी) आवश्यक आहे. येथे चित्रपटाच्या भावनांकाबरोबरच प्रेक्षकाची तदनुभूती वाटण्याची क्षमताही कामी येते आणि यात स्त्री-पुरुषांमध्ये फरक असल्याचे संशोधन सांगते. तदनुभूती क्षमतेचे विविध पैलू असून काही मेंदूरचनेशी संबंधित, काही लहानपणापासून झालेल्या वाढीशी आणि शिकवल्या गेलेल्या गोष्टींशी, तर काही स्वतःहून शिकून घेतलेल्या गोष्टींशी संबंधित असतात. सर्वच पैलूंमध्ये पुरुषांपेक्षा स्त्रियांची क्षमता अधिक असल्याचे आढळते (संदर्भ : 'जेंडर डिफरन्सेस इन एम्पथी: द रोल ऑफ द राइट हेमिस्फिअर'; 'रिकग्राइझिंग इमोशन्स इन अदर पीपलः सेक्स डिफरन्सेस इन सोशलायझेशन'). मूलसंगोपनात जैविकरीत्याच जास्त सहभाग असल्याने स्त्रियांच्या मेंदूची उत्क्रांतीच उच्च भावनांकास साजेशी झाली असण्याची शक्यता आहे. तसेच बाळपण संपून समाजात वावरू लागल्यावर पुरुषांपेक्षा स्त्रियांना 'दुसऱ्यांना समजून घेण्याचे महत्त्व अधिक शिकवले जाते आणि समंजस होण्यास जास्त प्रोत्साहनही मिळते. खऱ्या आयुष्यात स्त्रिया इतरांच्या भावना अधिक उत्तम समजू शकत असतील तर त्याप्रमाणे चित्रपटातील पात्र पुरुष असले तरी स्त्रिया त्याला चांगले समजून घेऊ शकतील. याउलट पुरुष प्रेक्षकांना आपल्यापेक्षा वेगळ्या पात्राला, म्हणजे स्त्रीपात्राला समजून घेणे व तिच्याशी 'कनेक्ट' होणे अवघड जाईल. यात पुरुषांना नावे ठेवण्याचा

किंवा कमी लेखण्याचा उद्देश नाही, तसेच हा कयास सर्वसामान्य पातळीवर बांधलेला असून अपवाद असण्याची शक्यता अगदीच मान्य आहे.

दुसरी गोष्ट सामाजिक अभिसंधान किंवा सोशल कंडिशनिंगशी संबंधित आहे. सामाजिक अभिसंधान म्हणजे समाज आणि समाजातील समूहांकडून मान्यता मिळेल अशा पद्धतीनेच वर्तन करण्याचे प्रशिक्षण समाजातील व्यक्तींना मिळण्याची प्रक्रिया. मोठ्याने भोकाड पसरणे वाईट असते, पाहुण्यांना आल्यावर खाण्यापिण्याचा आग्रह करणे चांगले असते इत्यादी गोष्टी मुले याच प्रक्रियेतून शिकतात. कशा वागण्याचा अभिमान वाटायला हवा, कशाची लाज आणि कशाचा आनंद वाटायला हवा हे यातूनच शिकवले जाते आणि लिंगभावानुसार व्यक्तीचे वर्तन कसे असावे, हेही. आता यामध्ये कळीचा मुद्दा असा की आपल्या लिंगभावानुसार अपेक्षित वर्तनापेक्षा वेगळे किंवा उलट असे काही वर्तन केल्यास, उदा. पुरुषाने अश्रू गाळले किंवा बाईने मारामारी केली, तर त्याचे नकारात्मक परिणाम किंवा एका अर्थाने जी शिक्षा मिळते, तिची तीव्रता कितपत असते?

साध्या पोशाखाच्या उदाहरणावरून कळते की, पुरुषी कपडे घालणाऱ्या स्त्रीला 'नॉर्मल' समजले जाते, पण एखाद्या पुरुषाने साडी किंवा स्कर्ट घातला तर त्याला किमान थट्टेला आणि कमाल धिंडीला सामोरे जावे लागेल. किकबॉक्सिंग शिकणाऱ्या एखाद्या शाळकरी मुलीला कोणी क्वचितच नावे ठेवतील; किंबहुना तिचे कौतुकच होईल, पण कथक / बॅले शिकणाऱ्या शाळकरी मुलाचा मित्रांकडून अपमान होण्याचीच शक्यता जास्त. (यात मित्रांचाही दोष नाही. वडीलधाऱ्यांच्या वर्तनातून व बोलण्यातून काय चांगले, काय वाईट याचे सूक्ष्म नियम ते आत्मसात करतात.) या समाजात वाढल्यावर 'स्त्रियांसाठी बनवलेले' असे चित्रपट पाहण्यास पुरुष पसंती देत नाहीत, यात नवल नाही. उलट मचिक फ्लिक्स' (मुलींसाठी बनवलेले चित्रपट) पाहणाऱ्या मुलांची होणारी चेष्टा बघून सुपरहीरो, प्रेरणादायी व्यक्ती अशा या कथांमध्ये वारंवार येणाऱ्या भूमिका महिलेपेक्षा पुरुषाने केलेल्या समाजाला (आणि चित्रपट बनवणाऱ्यांनाही) अधिक पटतात. क्वार्ट्स इंडियाने प्रसिद्ध केलेल्या एका लेखात उल्लेख आहे की, ४००० बॉलिवूड चित्रपटांच्या विश्लेषणानंतर असे आढळले की एकूण पोलिसांच्या भूमिकांपैकी ९०% पुरुषपात्रे होती, ८९% एक्झिक्युटिव्ह्ज, ७६% वकील, ७५% गँगस्टर, ७४% डॉक्टर, ६९% विद्यार्थी व ६५% गायक भूमिका पुरुष होत्या. विनोदी भूमिकांमध्येही पुरुष कलाकारांची संख्या अधिक असते. साहजिकच नायकप्रधान चित्रपट अधिक लोकप्रिय होतात.

चित्रपट तोंडी प्रसिद्धीने लोकप्रिय होतो. अशा प्रसिद्धीचे एक उदाहरण म्हणजे आयएमडीबी या लोकप्रिय संकेतस्थळावर प्रदर्शित होणाऱ्या सर्व चित्रपटांना प्रेक्षक गुण (रेटिंग) देऊ शकतात. या गुणांकनामधील लिंगभेदाविषयी एक महत्त्वाची बातमी वाचनात आली. ती अशी : २०१८ साली या वेबसाईटवर ४३७७ चित्रपट असे होते ज्यांना २५,००० पेक्षा अधिक प्रेक्षकांनी गुण दिले होते. गुण देणाऱ्या प्रेक्षकांपैकी किती महिला व किती पुरुष आहेत याची फोड करून तुलना केली गेली. नव्वद टक्के चित्रपटांमध्ये गुण देणाऱ्या पुरुषांची संख्या गुण देणाऱ्या स्त्रियांच्या किमान दुप्पट होती, ५१ टक्के चित्रपटांमध्ये पाचपट व १२ टक्के चित्रपटांमध्ये गुण देणारे पुरुष संख्येने स्त्रियांच्या दसपट होते. अर्थातच याचा परिणाम गुणांवर दिसून येतो आणि 'पुरुषी' विषय असलेल्या किंवा नायकप्रधान असलेल्या चित्रपटांना सर्वोच्च गुण मिळतात. दृश्य आणखी स्पष्ट करण्यासाठी सर्वोच्च स्थानांवरील काही चित्रपटांची यादी पाहा : शॉशंक रिडेम्प्शन, गॉडफादर, डार्क नाईट, लॉर्ड ऑफ द रिंग, शिंडलर्स लिस्ट, फाइट क्लब, ट्वेल्व्ह अँग्री मेन, इन्सेप्शन. सर्वोच्च गुण मिळालेल्या हिंदी चित्रपटयादीतील काही नावे :

हँकी पँकी, ब्लॅक फ्रायडे, आनंद, दंगल, थ्री इडियट्स, तारे जमीन पर, जाने भी दो यारों, उरी द सर्जिकल स्ट्राइक, तुंबाड व अंधाधुन. येथे यादीतील चित्रपटांच्या गुणवत्तेबद्दल शंकाच नाही, परंतु नायिकांचे प्रतिनिधित्व यात कमी असल्याचे अधोरेखित होत आहे. मालिकांच्या गुणांवरदेखील गुण देणाऱ्यांच्या लिंगभावाचा परिणाम होतो. नायिकाप्रधान मालिकांना पुरुषांनी कमी गुण दिल्यामुळे चांगले कथानक असूनही गुणांच्या यादीत या मालिका खालच्या स्थानांवर आहेत. अशा प्रकारे नायिकाप्रधान चित्रपट आणि स्त्रीकेंद्री विषय यांची उपलब्धता मर्यादितच राहते.

प्रेक्षकपसंतीमागची कारणे समजून घेतल्यावर हे लक्षात येते की, इतर समाजक्षेत्रांतील स्त्री-पुरुष समानतेच्या स्थितीचेच प्रतिबिंब चित्रपटक्षेत्रातही पडलेले आहे. जसजसा समाजात बदल घडतो आहे व घडेल, तसतसे लिंगभावावर आधारित अपेक्षित वर्तनाच्या व्याख्या बदलतील. नायिकेचा चित्रपट पाहणे, तिच्यापासून प्रेरित होणे किंवा तिच्या भावना समजून घेणे, याची क्षमताही पुरुषवर्गात विकसित होईल व असे चित्रपट पाहिल्याबद्दल पुरुषांना कुणी कमीही लेखणार नाही. चित्रपट निर्माते, लेखक व दिग्दर्शकांमध्ये स्त्रियांची संख्या वाढत जाईल तशी अधिकाधिक वास्तव स्त्रीपात्रे पडद्यावर येतील आणि प्रेक्षकांमध्येही स्त्रियांची संख्या वाढेल; परिणामी आणखी नायिकाप्रधान किंवा स्त्रीकेंद्री विषयही पडद्यावर येतील, आणि अभिनेत्रींना मिळणारे मानधनही बाजारपेठेच्या नियमानुसार उंचावले जाईल. या परिवर्तनाचे पडसाद सध्या पाहायला मिळणाऱ्या चित्रपट व मालिकांमध्ये उमटतच आहेत. सत्तरच्या दशकात एकूण चित्रपटांपैकी ७% नायिकाप्रधान होते, तर २०१५-२०१७ दरम्यान हे प्रमाण ११.९% इतके वाढलेले दिसते. बदलाचा वेग व प्रमाण वाढत जाईल, अशी आशा करूया !

टीप : या विषयावर आणखी खोलात अभ्यास करण्यासाठी काही प्रश्न विचारता येतील -

१. ॲक्शनपट, थरारपटाची नायिका असेल वा मारहाण व इतर 'हीरोगिरी' करत असेल तर अशा स्त्री भूमिकेला (उदा. 'झाशीची राणी'मधील कंगना राणावत, 'मर्दानी'मधील राणी मुखर्जी) पुरुष प्रेक्षक इतर स्त्रीपात्रांपेक्षा अधिक पसंती देतात का? पसंती पात्राला असते की विषयाला?

२. उघडपणे विचारल्यावर आपण स्त्रीपात्रांना वा पुरुषपात्रांना अधिक पसंती देतो, असे कुणालाही स्वतःविषयी वाटत नसते. समजा अशा सर्वेक्षणाचे निकाल जाहीर करून लोकांना त्यांचा कल दाखवून दिला व समान प्रतिनिधित्वाची माहिती थोडक्यात सांगितली, तर पसंतीत फरक पडू शकेल का? जाणीवपूर्वक नायिकाप्रधान चित्रपट पाहण्याची 'फॅशन' आणता येईल का?

३. चित्रपटांप्रमाणेच नाटक, मालिका व इतर मनोरंजनाच्या माध्यमांमध्ये प्रेक्षकपसंतीची परिस्थिती समानच आहे का? कोणते माध्यम अधिक पुरोगामी आहे व त्यामागची कारणे काय आहेत? हे समजून घेऊन इतर माध्यमांमध्येही अवलंबिता येईल का?

४. दुष्टचक्र मोडण्यासाठी निर्मात्यांकडून किंवा चित्रपटक्षेत्रातील धोरणांमध्ये काय प्रयत्न करता येतील? समान मानधनासाठी काही मार्गदर्शक धोरणे, नियम वा तत्त्वे निर्माण करून अमलात आणता येतील का?

❑

(पूर्वप्रकाशित)

# राहुल पुंगलिया यांच्या फेसबुक पोस्टचे टिपण

प्रख्यात नाटककार आणि मराठीतील महत्त्वाचे परंतु दुर्लक्षित कवी श्री. चं. प्र. देशपांडे यांनी मिथकावरील माझ्या एका लेखातील एक विधान आज सकाळी त्यांच्या फेसबुकभिंतीवरती उद्धृत केले. त्याला उदंड प्रतिक्रिया मिळाल्या. यातील सर्वच प्रतिक्रिया मूळ लेखातील संदर्भ पाहिल्याशिवाय होत्या.

त्यामधील बहुतेक प्रतिक्रिया त्या विधानाला, अर्थ समजून न घेता, उडवून लावणाऱ्या, ते विधान पटले असले तरी यात नवे काय आहे? अशी विचारणा करणाऱ्या, आणि प्रसंगी कुचेष्टा करणाऱ्या, उथळ अशा होत्या. त्यामुळे त्यांचा प्रतिवाद करणे गरजेचे नाही. तरीदेखील या प्रतिक्रिया मराठी वाङ्मयव्यवहारातील काही महत्त्वाचे कल दर्शवणाऱ्या आहेत. एक सामाजिक विदा म्हणून त्यांचे महत्त्व आहे. काही प्रतिक्रिया मात्र त्या विधानाला दिलेला प्रामाणिक प्रतिसाद होता. म्हणून या लिखाणाचा प्रपंच!

मिळालेल्या प्रतिक्रिया ज्या क्षुल्लक आणि थिल्लर होत्या, त्यांची वर्गवारी करणे शक्य आहे. ढोबळमानाने लोकशाहीवादी, सापेक्षतावादी आणि परंपरावादी या तीन प्रकारांत सर्व कमेंट्स बसतात.

१. लोकशाहीवादी मंडळींचे असे म्हणणे दिसते की, कवितेचे कुठल्याही प्रकारे नियमन करू नये. कवितेची व्याख्याच करू नये. आणि प्रमाण व अप्रमाण ठरवणारे निकष कवितेबाबतीत असू नयेत. कविता हे सर्वांसाठी मुक्त संचाराचे क्षेत्र असावे. कविता लिहिण्यासाठी काही पात्रतेची गरज नाही. चांगली किंवा वाईट कविता हे निकष असू शकत नाहीत. कविता हा संवाद किंवा अभिव्यक्तीचाच थोडासा वेगळा म्हणजे आडव्याऐवजी उभं लिहिलेला आणि अलंकृत असलेला प्रकार आहे. त्यामुळे

कवी त्याच्या भावना, वृत्ती व विचार सांगण्यासाठीच लिहितो आणि वाचकाने ते समजून घेणे निव्वळ क्रमप्राप्तच नाही तर तो त्याचा मूलभूत मानवी हक्क आहे.

आता, जर कविता संवाद किंवा अभिव्यक्ती असली, तर तो संवाद गद्यात आणि सर्वसामान्य माणसे करतात त्या पद्धतीने छापील माध्यमातून आडवा, थेट, अलंकार, प्रतिमा आणि काव्यातील प्रचलित शब्द न वापरता का केला जात नाही? हा संवाद अशा विचित्र उभ्या पद्धतीने का केला जातो? याचे उत्तर लोकशाहीवादी, मानवाधिकारवादी लोकांकडे नसते.

तसेच इतर कला जशा की शिल्पकला, चित्रकला, हिंदुस्तानी शास्त्रीय गायन व नृत्य यामध्ये हा व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा जयघोष का केला जात नाही? ज्ञान-विज्ञानाची क्षेत्रे व तंत्रकौशल्यात तर लोकशाहीचा, संवादाचा आणि अभिव्यक्तीचा आग्रह बिलकुलच धरला जात नाही. डॉक्टरच्या अनाकलनीय बोलण्यापुढे भयभीत रुग्ण मुंडी हलवतात. तिथे अर्थ समजावून घ्यायचा आग्रह धरत नाहीत. तसेच शास्त्रज्ञांच्या पायाशी लोळण घेतात. आपल्याला शष्प न कळले तरी कृष्णविवरांचे कौतुक करतात. सिंग्युलॅरिटीचा काही न कळता भक्तिभावाने उल्लेख करतात. शेअर मार्केट आणि वित्तीय भांडवल यांचे अर्थशास्त्र न कळतादेखील कवितेत हिरीरीने अर्थाची मागणी करणारे लोक भरपूर पैसे कमवतात. असे का याचेही उत्तर या लोकांकडे नसते.

विज्ञान व तंत्रज्ञान वस्तुनिष्ठ सत्य शोधून काढतात. ते सत्य आधीच नेहमीच (always, already) वास्तवात उपस्थित असते. ते सत्य कालनिरपेक्ष, कालातीत व व्यक्तिनिरपेक्ष असते असा भ्रामक समज विज्ञानवादी (विज्ञानांध, तंत्रांध) (scientitists) वैज्ञानिक व तंत्रज्ञांनी समाजामध्ये पसरवलेला आहे. वैज्ञानिक तथ्य सिद्धांतांवर आधारित असतात आणि सिद्धांत मानवनिर्मित व ऐतिहासिक कालबद्ध असतात हे गेल्या सहा-सात दशकांपूर्वीपासून विज्ञानाच्या तत्त्वज्ञांनी मान्य केले आहे. तंत्रज्ञान तर समाजामधील निवडक क्रयशक्तीत रूपांतरित होऊ शकणाऱ्या गरजा (म्हणजे गोष्टी विकत घ्यायला ज्यांच्या खिशात पैसा आहे फक्त अशांच्या गरजा) आणि भांडवलदारांना मिळू शकणारा नफा या दोन ध्रुवांत विकसित होत असते.

उपरोल्लिखित सर्व क्षेत्रे अतिशय प्रमाणित, नियमबद्ध आणि स्पष्ट व्याख्या केलेली असताना केवळ साहित्यक्षेत्राचे प्रमाणीकरण किंवा नियमन आणि साहित्याची विशेषतः कवितेची व्याख्या करायला प्रचंड विरोध का असतो? साहित्यामध्ये हवशा, नवशा आणि गवशांना मोकळं रान हवं, असा आग्रह का असतो? या प्रश्नाचे उत्तर द्यायला हवे.

या प्रश्नाच्या काही उत्तरांकडे बघूया. प्रथम म्हणजे, विज्ञान व तंत्रज्ञान हे मानवी संस्कृती व ज्ञानाचे आजच्या काळातील प्रभुत्वशाली विभाग आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या नियंत्रणाने पृथ्वीवरील भौतिक मालमत्ता, नैसर्गिक साधनसंपत्तीचे नियंत्रण व नियमन करता येते. विज्ञान-तंत्रज्ञानावरती ज्यांचे नियंत्रण ते समाजातील सत्ताधीश असतात. त्यामुळे या क्षेत्राचे खूप कठोर व बारकाईने लक्ष देऊन नियमन केले जाते. यामध्ये या क्षेत्रात कोणाला प्रवेश द्यायचा आणि कोणाला नाही, यापासून संशोधनाच्या दिशा, धोरणे व दर्जा, संशोधनातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी, मानके ठरवणे व प्रमाणीकरण या सगळ्या गोष्टी अनेक रखवालदार (watchdogs) एजन्सीज्‌कडून नियंत्रित केल्या जातात.

याउलट कला, धर्म, प्रसारमाध्यमे, राजकारण, संस्कृती ही क्षेत्रे सत्ताधाऱ्यांना पूरक ठरेल अशी समाजाची मानसिकता व वृत्ती घडवण्यासाठी वापरली जातात. विज्ञान, तंत्रज्ञान, उपजत बुद्धिमत्ता व

खडतर परिश्रम यांच्या जोरावर खूप थोड्यांनाच हासिल करता येते असे मिथक जिथे तयार केले जाते, त्याच समाजात प्रत्येकाला प्रशिक्षणाशिवाय कलेमध्ये अभिव्यक्त होता येते इतकेच नव्हे तर तो त्याचा/तिचा हक्कच आहे, कोणीही धर्म व श्रद्धेचा अधिकारी, पुरस्कर्ता वा भाष्यकार असू शकतो, कोणीही राजकारणामध्ये व सांस्कृतिक घडामोडींमध्ये अर्थपूर्ण व उपयुक्त सहभाग देऊ शकतो, असाही भ्रामक विश्वास निर्माण होतो. विज्ञानव्यवहाराची स्वायत्तता आपण नुसतीच मान्य केलेली नसते तर ती निर्विवाद असते, ती जणू काही पवित्रच समजली जाते. विज्ञान-तंत्रज्ञानामुळे तयार झालेले भीषण परिणाम आपण अटळ नियतीसारखे निमूटपणे स्वीकारतो. आजवर धर्माने ज्या दैववादात समाजाला प्रशिक्षित केले आहे, त्याचाच पुढील अवतार वैज्ञानिक नियतीवाद आहे.

साहित्य व कला मात्र स्वायत्त नसतात. त्या फक्त सामाजिक संदेशवहनाचे मनोरंजक माध्यम असतात. संशोधनांती व कठोर तर्कशुद्ध वैचारिक वितंडातून सापडलेली कठीण व कडवट, वैज्ञानिक, सामाजिक, राजकीय, तात्त्विक तथ्ये लोकांच्या गळी उतरवण्यासाठी साहित्यातील गोड गाण्यांचा, गोष्टींचा, म्हणजेच कविता, कथा, कादंबऱ्यांचा, नाटकांचा वापर करावयाचा असतो. असा समज झालेला आहे. म्हणजे साहित्य व कला यांच्यामधून सत्य व तथ्य शोधता येत नाही. सत्य व तथ्य आधीच शास्त्रज्ञ, वैज्ञानिक, तंत्रज्ञ, विचारवंत, सामाजिक चळवळी, समाजशास्त्रज्ञ शोधतात. कला व साहित्याने या (आधीच नेहमीच) शोधल्या गेलेल्या सत्य व तथ्याला धरून ठेवून त्याच्याशी सुसंगत कला निर्माण करावी, साहित्य निर्माण करावे, असा समाजाचा आग्रह असतो. यातूनच विद्रोही, प्रबोधनपर, विवेकवादी, वास्तववादी, सामाजिक बांधिलकीच्या, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, अस्मिता या मूल्यांची शिकवण देणाऱ्या, राष्ट्राभिमान, धर्माभिमान, भिन्नलैंगिकांचे हक्क वगैरे गोष्टी, मूल्ये बाणवणाऱ्या साहित्याचा जन्म होतो.

इथे सामान्य जनतेला मोकळीक दिल्याचा भास अत्यावश्यक असतो. हे स्वातंत्र्य आभासी असते. कारण अशाप्रकारे प्रसवलेल्या बहुतेक साहित्यिक अभिव्यक्ती सुमार दर्जाच्या म्हणून परिणामशून्य असतात. समाजातील दृश्य समस्यांच्या प्रचलित उत्तरांची अथक पुनरावृत्ती या प्रकारच्या कलेमधून होत असते.

याचे अजून एक उत्तर मला असे दिसते की, साहित्य हे मऊ क्षेत्र आहे म्हणजे ते सॉफ्ट फील्ड आहे. आणि मऊ लागले की, कोपराने खणा ही सहजवृत्ती असते. आपल्या नवसाक्षर समाजात साहित्य हे कमीत कमी श्रम, तयारी, व अभ्यासात अभिव्यक्त होण्यासाठी सोपे माध्यम आहे. लिहिता वाचता आले की कवी लेखक व नाटककार होता येते. आणि तरीदेखील ते सत्ताधाऱ्यांसाठी निरुपद्रवी असे क्षेत्र आहे. साहित्यक्षेत्रातील आक्रोश व टाहो चुचकारून, पुरस्कार देऊन मॅनेज करता येतात. ते व्यवस्थेला पाठबळच पुरवतात.

त्यामुळे साहित्याची स्वायत्त बांधणी आणि सर्वसामान्यांसाठी व सत्ताधाऱ्यांसाठी अनाकलनीयता, काठिण्य हे धोकादायक असणारे आहे. सर्वसामान्य माणसाला संवाद साधल्याचे व अभिव्यक्त केल्याचे फसवे समाधान साहित्य तत्काळ पुरवते. ते विद्रोहाचा कंड शमवते व तरीदेखील निरुपयोगीच असते. साहित्याला भाषेपेक्षा एक वेगळे सत्त्व, सत्ताशास्त्रीय स्थान व प्रयोजन आहे, अशी धारणा प्रस्थापित लोकांना नकोशी वाटते. त्यांना साहित्य एक छंद किंवा समाजातील सांस्कृतिक सजावट म्हणून असणे सुरक्षित वाटते. साहित्याचे संभाषित संवादी असले, अर्थपूर्ण असले तर त्यांचा अहंकार सुखावतो. त्यांना भाषेवरती, (आडव्याच नाही तर उभ्यादेखील आणि शिवाय आलंकारिक-

देखील,) नियंत्रण असल्याने सुरक्षित व आरामशीर वाटते.

त्यामुळे अनाकलनीय कवितेला ते प्रचंड घाबरतात. कारण ती कविता त्यांना धक्कादायक ठरू शकतील असे अर्थ आपल्या गर्भात बाळगते. त्यांचे नेहमीचे सुखासीन, रुटीन जगणे चालू राहील इतकेच चवीपुरते साहित्य त्यांना हवे असते. त्यांच्या दृष्टीने साहित्य, व्यक्ती व समाजगटासाठी भूषणास्पद 'सुसंस्कृत', 'कलासक्त' ही लेबले लावून देणारी गोष्ट असते. साहित्याच्या मूलगामी प्रश्नांना ते सामोरे जाऊ शकत नाहीत. ही मध्यमवर्गीय, सुमार माणसे साहित्याला स्वतःच्या खालच्या पातळीवरती खेचतात.

साहित्याबद्दल पद्धतशीर विधाने करून काही एक व्यवस्था बघण्याचा प्रयत्न केला म्हणजेच साहित्याचे आत्मावलोकन करून जाणीव वाढवायचा प्रयत्न केला तर ते बऱ्याच जणांना खपत नाही. हे क्षेत्र अनियंत्रित असावे, इथे काहीशी मोकळीक मिळावी अशी अपेक्षा आहे. इतर कुठेच अशी मोकळीक मिळत नाही. आधुनिक समाज वैज्ञानिक, तांत्रिक, प्रशासकीय आणि लष्करी पद्धतीने साकार झालेला आहे. समाजामधील स्वातंत्र्य नाममात्र आणि फसवे आहे. विज्ञाने व तंत्रज्ञाने संघटित सत्ताकारणाच्या गरजांनुसार आणि मागणीनुसार सत्य व वस्तुनिष्ठ तथ्यांचा शोध घेतात हे आता लपून राहिलेले नाही.

मालमत्ताधारक वर्गाच्या हिताचे, विकासाचे कार्यक्रम राबवताना सत्ताधाऱ्यांनी सर्वसामान्यांची सहमती मिळवण्यासाठी 'विशुद्ध ज्ञान', 'निर्विवाद, केवल सत्याचा शोध' हे आदर्श सिनिकली वापरलेले असतात. खरे तर सर्वच सामाजिक, राजकीय आदर्श हे गोरगरिबांच्या रक्त व घामाने डागाळलेले असतात. हे देखील आता सामान्य ज्ञान झालेले आहे आणि हे असेच चालणार असा अटळ दैववादी विश्वासही जनतेमध्ये तयार झाला आहे. आता कोणालाच कशाचेच आश्चर्य वाटत नाही.

या पार्श्वभूमीवर कलाक्षेत्र विविध अभिरुचींना पटेल असे मनोरंजन पुरवणारी एक यंत्रणा व बाजारपेठ झाली आहे. मराठी साहित्याबद्दल हे प्रकर्षाने जाणवते.जसा विज्ञानाचे कार्य आणि महत्त्व सर्वसामान्यांच्या गळी उतरवण्यासाठी, सत्य, ज्ञानासाठी ज्ञान, कुतूहल, वस्तुनिष्ठता इत्यादी मिथ्या मूल्यांचा, जे विज्ञानाच्या प्रत्यक्ष प्रॅक्टिसमध्ये म्हणजे आचरणात बिलकुल दिसत नाहीत, त्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो. त्याचप्रमाणे साहित्यातदेखील, अभिव्यक्ती, कलेचा आस्वाद, सौंदर्यानुभव, मानवतेच्या मूल्यांचा पुरस्कार, व्यक्तिनिष्ठता, भावनिकता, व्यक्तिस्वातंत्र्य, कल्पनाशक्ती, प्रतिभा, अंतर्मनाचा आविष्कार, प्रामाणिक संवाद इत्यादी मिथ्या मूल्यांचा आयडिओलॉजिकल वापर केला जातो. साहित्यातील नोकरदार (विद्यापीठीय व शासकीय) आणि विविध साहित्य व्यावसायिकांना (यांमध्ये प्रकाशक-विक्रेत्यांबरोबर लेखक, कवी, नाटककारदेखील आले) या आयडिओलॉजीला पूरक व्यवहार करावा लागतो. साहित्याच्या आयडिओलॉजीमुळे समाजामधील स्वातंत्र्याचा अभाव, लोकशाहीच्या रूपातील छुपी हुकूमशाही, दडपशाही, व्यक्तीच्या मनाचे व बुद्धीचे माध्यमे व ज्ञान-विज्ञान उद्योगाकडून केले गेलेले कंडिशनिंग (संस्कार), परात्मता, अनुभव, समाधान व आनंदाचे क्रयवस्तूमध्ये रूपांतर या गोष्टी झाकल्या जातात. साहित्य व्यावसायिक म्हणजे लेखक आणि साहित्याचे उपभोक्ते म्हणजे वाचक या दोघांनाही समकालीन घटनांना दिलेले थेट अपरिष्कृत प्रतिसाद म्हणजेच संवाद वाटू लागतो. त्यामुळे आज वाचक उपभोक्त्यांच्या भावनिक, वैचारिक गरजा भागवून घेण्याचे साहित्य हे साधन झाले आहे.

ज्यांचा आग्रह कवितेने संवादी असावे आणि अर्थनिर्णयन वाचकाच्या मर्जीने चालावे असा आहे,

ते भाषा हे संवादाचे पारदर्शक माध्यम आहे हे गृहीत धरतात. आधुनिक काळात आणि कदाचित आधुनिकपूर्व समाजांमध्ये देखील भाषा पारदर्शक नाही व बहुतेक कधीच नव्हती. थेट संवाद हे मिथक आहे, आणि होते. वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्ञान-विज्ञान व इतर क्षेत्रांत विविध विचारधारांचे प्रवाह (आयडिओलॉजिकल फोर्सेस) भाषेला अपारदर्शक व विशिष्ट कल असलेले, पक्षपाती माध्यम बनवतात. संवादाचे दोन्ही ध्रुव म्हणजे मी (सब्जेक्ट) आणि वास्तव या दोन्ही गोष्टी दूषित झाल्या आहेत. 'मी' आपल्या भावना व मनःस्थितीच्या प्रामाणिक अभिव्यक्तीचा प्रयत्न करून वा आत्ताच्या व्यामिश्रतेचे समग्रभान ठेवून भाषेला पुन्हा एकदा संवादी व पारदर्शक बनवू शकत नाही.

रोमॅण्टिक काळापासून आधुनिक साहित्य स्वतःचे रूप, घाट व माध्यम याबद्दल सजग झाले. अंतर्मुख झाले. मार्क्स, फ्रॉईड व नित्शे या आधुनिक तत्त्वज्ञांनी तथाकथित सत्य, तथ्य व वास्तवाच्या आभासमयतेची जाणीव करून दिली होती. भाषा हे वस्तुनिष्ठ सत्याचे पारदर्शी माध्यम नव्हे तर कथित वस्तुनिष्ठ सत्य, वास्तव भाषेमध्येच व भाषेमुळेच तयार होते, हे भान साहित्यिकांना आले. आपण ज्यावर मानसिक व सांस्कृतिकरीत्या अवलंबून असतो, त्या ज्ञान व विज्ञान परंपरा एक प्रकारची कथनेच आहेत. जसे साहित्य रचलेले व मिथ्या (fictional) असते, तसेच ज्ञान-विज्ञान देखील कोणाच्यातरी दृष्टिकोनातून/कोणाच्यातरी फायद्यापोटी/सत्तालालसेसाठी किंवा सामाजिक दबावामुळे रचले गेले असते, असा मर्मभेद अंतर्मुख आधुनिक साहित्यामुळे झाला. ज्ञान विज्ञान वस्तुनिष्ठ असते व साहित्य व्यक्तिनिष्ठ असते हे द्वैत यामुळे प्रश्नांकित झाले.

थोडक्यात साहित्यिकाने आपले 'मी'पण अबाधित व स्थिर आहे असे समजून, गृहीत धरून आपण वास्तवाचा वेध प्रयत्नाने घेऊ शकतो या भ्रमातून बाहेर यायला हवे. आधुनिक कवितेच्या सर्जनप्रक्रियेत व आस्वादप्रक्रियेत समीक्षात्मक, चिकित्सक व सर्जनशील वृत्तींची सरमिसळ झालेली आहे. त्यामुळे कविता म्हणजे उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार अशा संकल्पना आता कालबाह्य झालेल्या आहेत. कवितेचे निर्माण करताना त्याच कवितेची समीक्षा होत असते. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कवी करत असतो. आपल्याच कवितेच्या पायाखालचा आधार खेचणे अशी विघातक कृती करण्याची धूर्त लकब कवीला वापरावी लागते. त्यामुळे चांगली कविता ही संवाद व अर्थाच्या स्वतःच निर्माण केलेल्या शक्यतांचे विघटन करत पुढे जाते.

ही आत्मघाताची व आत्मचिकित्सेची भूमिका न घेणारे लिखाण सहजच विविध सत्तासंबंधांच्या आ वासून बसलेल्या घशांत सहजच जाते. शेवटी, जेव्हा या वाचकांना कवितेकडून अर्थाची अपेक्षा आहे, तेव्हा त्यांना निश्चित काय पाहिजे आहे ? तर त्यांना आधीच जे अर्थ कळलेले आहेत, जे शहाणपण आलेले आहे, कारण ही सगळी मोठी शहाणी माणसे आहेत, समाजसुधारक, विचारवंत व ज्ञानी वैज्ञानिकांनी जे शोधून काढलेले आहे, त्याचाच त्यांना कवितेमधून प्रत्यय हवा आहे. हे वस्तुनिष्ठ ज्ञान कवितेमधून त्यांना आत्मसात करायचे आहे. व्यक्तिनिष्ठ करायचे आहे. कळलेला अर्थ आधी आणि कळवून घ्यायची कविता नंतर असा हा अर्थनिर्णयनाचा उलटा प्रकार या बहुसंख्यांना अपेक्षित आहे. त्यांना न कळणाऱ्या कविता म्हणजे ज्या कविता कळण्यासाठी त्यांना धोका पत्करावा लागणार आहे, त्यांच्या आधीच असुरक्षित सैरभैर झालेल्या जीवनात ज्या कवितांमुळे भूकंप होणार आहेत, ज्या कविता पिशाच्चासारख्या त्यांना वारंवार पछाडणार आहेत, अशा कविता त्यांना नको आहेत.

कवितेने संस्कृत सुभाषितांसारखे वा ग्रामीण शहाणीव असलेल्या म्हणींसारखे त्यांच्या अगोदरच्या दृढ विश्वास व श्रद्धांना दुजोरा द्यावा, असे त्यांना वाटते. जादूगार जेव्हा त्याच्या काळ्या हॅटमध्ये हात

घालतो, तेव्हा सगळे अगोदरच माहीत असलेली एक धूर्त उत्कंठा प्रेक्षकांमध्ये असते. तो जेव्हा कान पकडून ससा बाहेर काढतो, तेव्हा ही लबाड बालके आश्चर्यचकित झाल्यासारखी टाळ्या पिटतात, हे आताचे कवितेच्या आस्वादाचे प्रारूप आहे.


चांगल्या कविता त्या असतात, ज्यांचा अर्थ सांगता येत नाही. कारण त्या आधीच्या सर्व अर्थसवयी झुगारून टाकतात. त्या कवितांचा अर्थ कळायला व समजायला नवीन भाषेचा जन्म व्हावा लागतो

कवितेसाठी धोकादायक बनलेल्या आणि अतिशय चित्तथरारक (एक्साईटिंग) अशा या काळात संस्कृत काव्यशास्त्रातील वाच्यार्थ, लक्षणा व व्यंजना फारसे उपयोगाचे असू शकायचे नाहीत. कारण या आलंकारिक कारागिरीमध्ये भाषेला गृहीत धरण्याची मुभा होती. आजसारखी व्यक्तित्व, भाषा व संस्कृतीवर पूर्ण अंमल गाजवू पाहणारी सामाजिक, आर्थिक व्यवस्था त्या काळात नव्हती. तेव्हा भाषेवरती कौशल्यपूर्वक काम करून कवितेला अनुरूप आणि विशिष्ट व्यंगात्मक, परोक्ष अर्थ निर्माणाच्या शक्यता  होत्या. आज भाषा (म्हणजेच सामाजिक व सांस्कृतिक तथ्ये व मूल्ये) इतकी निसरडी व बेभरंवशाची झाली आहे की, भाषा आपल्याला वापरते आहे का आपण भाषेला वापरत आहोत हे कळेनासे होते.

त्यामुळे चांगल्या कवितेत सुलभ संवादाच्या मिथकाला छेद दिला जातो. चं. प्र. देशपांडेंनी उद्धृत केलेल्या विधानाला काही सापेक्षतावादी किंवा बहुलतावादी प्रतिक्रिया आल्या. त्यांचे म्हणणे असे होते की, कविता अनेक प्रकारच्या आहेत आणि वाचकही अनेक प्रकारचे. त्यामुळे दोन्ही, कविता आणि त्यांचे अर्थ, अनेक असू शकतात. एकच एक अर्थ असावा अशा अपेक्षेची सक्ती नको. बाजारपेठेतील उत्पादन ग्राहकाने कसे वापरावे हे त्याचे तो ठरवतो. हे वस्तू वापरण्याचे स्वातंत्र्य भांडवली लोकशाहीमध्ये सुखद वाटते. साहित्यदेखील या प्रकारची वापराची वस्तू असल्यासारखी ही अपेक्षा आहे. साहित्य हेतूपूर्वक संवादसुलभतेला आव्हान देते. हीच साहित्याची सामाजिक बांधिलकी आहे. आणि असे साहित्य त्यामुळे सगळे आलबेल नाही याची जाणीव करून देते.

वरील विवेचन जर काही प्रमाणात ग्राह्य असले तर 'बहुसंख्य साहित्य जे संवादी व अर्थवाही आहे त्याचे स्थान व दर्जा (स्टेटस्) काय?' असा प्रश्न उभा राहतो. हे मुख्य प्रवाहातले साहित्य आहे. ते आपल्या समाजाच्या वैचारिक व राजकीय भूमिकेचे निदर्शक आहे. आजच्या घडीचे मध्यमवर्गीय (जरी त्यातील काही पूर्वाश्रमीचे दलित/वंचित असले तरी) साहित्याचे जनक व उपभोक्ते आहेत.त्यांनी आत्ताची अधिमान्यता असलेली, प्रभुत्वशाली सांस्कृतिक व्यवस्था स्वीकारलेली आहे. या व्यवस्थेत ते आपल्या परीने भर घालीत असतात. प्रचलित मुख्य प्रवाहातील साहित्याचा मूलभूत खोटेपणा त्यांच्या लक्षातही येणार नाही इतका अंगवळणी पडला आहे. किंवा ती स्थितिशरणता व अप्रामाणिकपणा ही या साहित्याची बेसलाईनच आहे.

❑



ग्लोबलायझेशन नंतरची मराठी कविता,
विचार आणि मुलाखती १९९९-२०१४
निवडक
अभिधा नंतर
संपादक
हेमंत दिवटे
मूल्य रु.९९९/-
सवलतीत
रु. ७५०/- मध्ये
घरपोच
मिळविण्यासाठी
QR कोड
स्कॅन करा
PAPERWALL
निवडक
अभिधा नंतर
संपादक
हेमंत दिवटे

# वर्णमुद्रा

## वर्णमुद्रा आगामी कवी, लेखक

१) गणेश कनाटे

२) दिनकर मनवर

३) गजू तायडे

४) जी. के. ऐनापुरे

५) नितीन अरुण कुळकर्णी

६) शैलेंद्र मेहता

७) प्रकाश हरी कार्लेकर

८) जयश्री दाणी

९) श्याम माधव धोंड

१०) पंकज कुरुलकर

११) वसंत आबाजी डहाके

१२) भरतसिंग पाटील

## । वर्णमुद्रा पब्लिशर्स ।

**(वर्णमुद्राची अलीकडची प्रकाशित २५ पुस्तके)**

५८) हृद, तुळसी परब, ४५०/-, कविता
५९) बिलामत, दिनकर दाभाडे, ५५०/-, कादंबरी
६०) झुरळ आणि इतर काहीबाही, प्रमोदकुमार अणेराव, ३२४/-,
६१) अभिजात, शैलेंद्र मेहता, ५२५/-, निबंध
६२) जगणं वाचणं, डॉ. राजेंद्र मलोसे, ४४४/-, कादंबरी
६३) हजार रक्तवर्णी सूर्य, राही डहाके, २४२/-, कविता
६४) जगावेगळी जीवने, शिरीष चिंधडे, ३२४/-, निबंध
६५) केवळ काही वाक्यं, उदयन वाजपेयी, अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार, ३०४/-, कविता
६६) तरंगत तरंगत जाऊ घरंगळत, हेमंत गोविंद जोगळेकर, २२४/- कविता
६७) अश्वत्थयुग्मांचे श्लोक, संतोष विठ्ठल घसिंग, ५७५/-, कविता
६८) दुराव्याची धूळ व्यापून, बाळकृष्ण सोनवणे, २५०/- कविता
६९) अपरंपारावरच्या कविता, रवींद्र लाखे, ३०४/-, कविता
७०) तत्त्वभान, श्रीनिवास हेमाडे, ६८०/-, निबंध
७१) गनिमी काव्याचे नमुने, विश्वास कणेकर, ३००/-, कविता
७२) पेसोआच्या कविता, महेश्वर लव्हेकर, ४२४/-, कविता
७३) वुहानचा वाफारा, विजय तांबे, ४२४/-, कथासंग्रह
७४) सृजनस्रोत, शिरीष चिंधडे, ४२४/-, ओळखपर लेख
७५) सगळेच पर्याय संपले आहेत, उषा हिंगोणेकर, ३७५/-, कविता
७६) काळोखाचा राजपुत्र, सुप्रिया आवारे, ३००/-, समीक्षा
७७) सायलेंट आणि इतर कविता, सागर अचलकर, १५०/-, कविता
७८) असीम प्रदेश, मुग्धा देशपांडे, १५०/-, कविता
७९) खट्टरकाकांचे विनोद-आख्यान, हरिमोहन झा, अनुवाद : वसंत पाटील, ४२४/-, लेख
८०) गळ्यावरचा निळा डाग, सुनंदा भोसेकर, २५०/- कविता

---

**मुख्य वितरक :** वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स शेगाव, जिल्हा बुलढाणा मो. : ९९२३७२४५५०
**उपवितरक :** १) पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मो. : ८६२४९७७०२९
२) मैत्री पब्लिकेशन, पुणे मो. : ९६५७२४०८२४
३) वाल्डन बुक स्टोअर, पुणे मो. : ९७६६९७५१६५
४) बुककट्टा अमरावती, मो. : ८३७८८९५९१६
**मुख्य कार्यालय :** वर्णमुद्रा पब्लिशर्स, पृथक, रामकृष्णनगर, शेगाव, जिल्हा बुलडाणा ४४४ २०३
**E mail :** varnamudra.editors@gmail.com Website : www.varnamudra.com Mo. : 9923724550

# अलीकडे प्रकाशित झालेली पुस्तके





१५०/– कविता




१५०/– कविता




४२४/– लेख




२५०/– कविता

वर्णमुद्रा इ–जर्नल जुलै–ऑगस्ट २०२४ हा अंक मालक, मुद्रक व प्रकाशक मनोज सुरेंद्र पाठक यांनी
वर्णमुद्राच्या वेबसाईटवर प्रकाशित केला असून, अंकाची मुद्रित प्रत
। पृथक । रामकृष्ण सोसायटी, एसबीआय कॉलनी, शेगाव, जिल्हा बुलढाणा – ४४४२०३ येथून केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली.
ईमेल : varnamudra.editors@gmail.com वेबसाईट : http://www.varnamudra.com/

मुख्य वितरक
वर्णमुद्रा पब्लिशर्स व डिस्ट्रिब्युटर्स, शेगाव, मोबाईल नंबर : ९९२३७२४५५०
वर्णमुद्राचे उपवितरक
पुस्तकवाला ॲण्ड कंपनी, पुणे मोबाईल नंबर : ८६२४९७७०२९
वाल्डन बुक स्टोअर, पुणे मोबाईल नंबर : ९७६६९७५१६५
मैत्री पब्लिकेशन, पुणे मोबाईल नंबर : ९६५७२४०८२४
बुककट्टा, अमरावती मोबाईल नंबर : ८३७८८९५९१६